साप्ताहिक

# माणूस

२३ जून ८४/दोन रुपये



साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : चौथा

¤

२३ जून १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

पुणे वार्ता

## अत्रे – गडकरी

परवा १३ जूनला आचार्य अत्र्यांचा १५ वा स्मृतिदिन होता. खरोखर, अत्र्यांना आठवायचे म्हणजे काय काय आठवायचे हा प्रश्नच पडतो. त्याचे प्रत्येक रूप प्रत्येक क्षणी वेगळे आहे. तरी पण प्रत्येक क्षण उत्कटतेने जगलेला हा माणूस आहे. सजीव आणि जोरदार लिहिणारा साहित्यिक, गर्दीत रमणारा आणि सभा गाजविणारा वक्ता, सामाजिक–राजकीय चळवळींमध्ये स्वत:ला झोकून देणारा आणि शाळामास्तरापासून ते सांस्कृतिक क्षेत्रातील सर्व क्षेत्रे पादाक्रांत करणारा, अशी अत्र्यांची विविध रूपे आहेत. सध्या ज्यांची जन्मशताब्दी चालू आहे ते राम गणेश गडकरी हे तर अत्र्यांचे गुरू ! हाच योग साधून अत्रे स्मारक समितीने साहित्य परिषदेमध्ये 'अत्रे व गडकरी' या विषयावर डॉ. व. दि. कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. गोपीनाथ तळवळकर अध्यक्षस्थानी होते.

पण अत्रे सांगायचे म्हणजे काय काय सांगायचे हाच प्रश्न बहुधा वक्त्यांना पडला असावा. एखादा आस्वाद्य पदार्थ समोर ठेवून नुसती चव घ्यायला सांगणं हे काही बरोबर नाही आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे बाहेर पडणारा पाऊस, त्यामुळे हुकमी श्रोते आणि विषय मांडणारे 'प्राध्यापक' अशा वेळी साहित्यक्षेत्रातल्या एखाद्या नवीन पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न न झाला तरच नवल ! त्यामुळेच व दि कुलकर्णींनी राम गणेश गडकऱ्यांच्या वाङ्मयप्रांतातील एका वेगळ्या कामगिरीची चर्चा केली !

गडकरी लेखक म्हणून श्रेष्ठ आहेत हे निर्विवाद. त्याच वेळी नाटककार म्हणूनही त्याचे नाव कोल्हटकर आणि खाडिलकरांबरोबर घेतलं जातं आणि अतिशयोक्ती, कोटिक्रम, उपहास यांनी भरलेलं गडकऱ्यांचं विनोदी लिखाणही खूप लोकप्रिय आहे.

परंतु याबरोबरच 'समीक्षक' म्हणूनही गडकऱ्यांचे स्थान वरचे आहे. त्यांच्या आयुष्यातील काही महत्त्वाचे प्रसंग आणि घटना यांचा हवाला देऊन कुलकर्णींनी त्याचे या क्षेत्रातील श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. आपल्या 'रागिणी' या कादंबरीला प्रस्तावना मागण्याची विनंती करणारे पत्र वा. म. जोशींनी गडकऱ्यांना लिहिले होते. या पत्राची माहिती देऊन कुलकर्णींनी सांगितले की, 'एखाद्या नाटकाला ही प्रस्तावना मागितलेली नसून, कादंबरीला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे ही कादंबरी एका नव्या जातीची होती आणि तिचे रसग्रहण व अचूक मूल्यमापन गडकरीच करू शकतील असा विश्वास त्यांना वाटत असला पाहिजे.

ते पुढे म्हणाले, 'एकाच नजरेत नेमके गुण व दोष ओळखण्याची त्यांची हातोटी होती. आपल्या डायरीमध्ये केलेल्या टिपणांमध्ये गडकऱ्यांनी शेक्सपियरसारख्या कलाकाराच्या नाट्यकृतीचे मूल्यमापन केले आहे. उत्कृष्ट संवाद असूनही कथानक पुढे जात नसेल तर ती नाट्यकृती अयशस्वीच होते. कित्येक चटकदार संवाद कथानकाच्या दृष्टीने उपयुक्त नसतात. नाटकाची प्रयोगक्षमता काय यावरच त्याचे यश अवलंबून आहे. त्याच्या डायरीत असे अनेक उल्लेख आढळतात.'

अशा प्रकारे गडकऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या 'कॉमेंटस्'च्या सहाय्याने त्यांच्या समीक्षेच्या प्रांतातील कामगिरीचे डॉ. कुलकर्णी यांनी वर्णन केले. गडकऱ्यांचे वैशिष्ट्य सांगताना ते म्हणाले, 'समीक्षकाला सहृदयता व बुद्धिमत्ता या दोन्हींची आवश्यकता असते. गडकऱ्यांजवळ या दोन्ही गोष्टी होत्या. एवढेच नव्हे तर कोणतीही कलाकृती चांगली-वाईट ठरवताना ती कोणी लिहिली यापेक्षा कशी लिहिली याला ते जास्त महत्त्व देतात. कोल्हटकर हे त्यांचे गुरू. आपले एक नाटक त्यांनी कोल्हटकरांना अर्पण केले होते त्यानंतर जेव्हा कोल्हटकरांनी स्वत: लिहिलेली एक संहिता गडकऱ्यांना वाचायला दिली, तेव्हा गडकरी म्हणाले, 'माझ्या सर्व दोषांसकट माझे नाटक मी तुमच्या चरणी अर्पण केले होते; पण त्यातील दोष इतक्या लवकर तुमच्या चरणातून मस्तकात शिरतील असे वाटले नव्हते.' गडकऱ्यांची दृष्टी अस्सल समीक्षकाची होती हे दाखवायला

हरण पुरेसे आहे. कथा, व्यक्तिरेखा आणि हेतू या तीन निकषावर गडकरी नाटकाची समीक्षा करीत असत. 'शाकुंतल' हे नाटक त्यांना अतिशय आवडले होते. त्याची रचना व एकंदर प्रभाव यावर मार्मिक विचार त्यांनी व्यक्त केलेले दिसून येतात.' निर-निराळी उदाहरणे देऊन कुलकर्ण्यांनी हा विचार मांडला. शाकुंतलबद्दल टागोराचे विचार आणि गडकऱ्याचे विचार यात काहीच फरक नसल्याचेही त्यांनी सांगितले.

व. दि. कुलकर्णींचा हा प्रयत्न वेगळा वाटला. कारण गडकरी जन्मशताब्दीच्या निमित्ताने अनेक आख्यायिका, आठवणी वाचायला मिळतात. दररोज एक नवीन आठवण सांगितली जाते या सगळ्यामधून त्यांच्यातला 'साहित्यिक' प्रकट होईलच असे नाही आणि हे साहजिकच आहे. शेवटी कलाकार हाही माणूसच असतो. त्यापेक्षा त्यांच्या लिखाणातून आणि पत्रव्यवहारातून साहित्यक्षेत्रातील त्यांच्या कामगिरीचा शोध घेणे जास्त उपयुक्त आहे. व. दि. नी अभ्यासपूर्ण तरीही प्रभावी भाषेमध्ये गड-कऱ्यांसबंधात हा एक नवीन पैलू मांडला. तरी पण भाषण ऐकल्यानंतर जाणवले की, 'अत्रे-गडकरी' या गुरुशिष्यांवरही बरेच काही त्यांना सांगता आले असते. दोघेही नाटककार, विनोदी लेखक म्हणून गाजलेले. गडकऱ्यांचा अत्र्यावर पुष्कळच प्रभाव होता. तरीपण 'गडकऱ्यांच्या शैलीचे मला अपचन झालेले नाही.' असे अत्र्यांनी लिहून ठेवले आहे. या दोघांच्या कामगिरीबद्दल सांगायला हवं होतं आणि समीक्षक गडकऱ्यांबरोबर 'विनोदी अत्रे' ऐकायला मिळतील ही श्रोत्यांचीही अपेक्षा होतीच.

अर्थात ही वेळेची गरज ओळखून अविनाश कारखानीस यानी 'अत्र्यांचे' दर्शन घडवलेच. तर शीघ्रकवि देशपांडे यांनी सर्व कार्य-क्रमाचा वृत्तांत काव्यात सादर केला. काव्य-मय भाषणे अनेक होतात; पण इथे भाषणां-चीही कविता केली गेली हे विशेष!

म. श्री. दीक्षित आणि रंगनाथ होनप यांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी साहित्यपरिषदेच्या ग्रंथा-लयात डोकावलो असता एका शेल्फाच्या पाठीमागे, कोपऱ्यात मान खाली घालून म. श्री. काही तरी लिहीत बसले होते. अजून थोड्या वेळाने यांचा सत्कार आहे आणि तोही षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त असे कोणाला सांगूनही खरे वाटले नसते. कार्यमग्नता हा त्यांचा स्थायीभाव आहे. गोपीनाथजी म्हणा-लेच की, 'मूल्यावर निष्ठा ठेवणारा हा माणूस आहे. साहित्यपरिषदेशी त्यांचे अतूट नाते आहे.'

एकंदर दोन व्याख्यानं, दोन सत्कार, एक नक्कल असा बहुढंगी कार्यक्रम झाला. काहीही झालं तरी सभागृहात रमणारं आणि भाष-णात रंगणार हे 'संध्याकाळचं पुणं' आहे. कार्यक्रम काहीही असो इथे तो 'चांगला' झालाच पाहिजे!

—निरंजन

# पुणेकरांच्या चेहऱ्यावरही स्मितरेषा – फिरक्या

औद्योगिक क्षेत्रात दिवसेंदिवस दहशतवाद आणि असुरक्षितता वाढत असतानाच काही औद्योगिक संस्थांतील लोक निर्व्याज करमणुकीसाठी एका संध्याकाळी एकत्र जमतात हा आशेचा किरण नव्हे का?

पुण्याजवळील पिंपरी–चिंचवड औद्योगिक पट्ट्यातील 'टेल्को' या कंपनीतील कामगारांची 'टेल्को कलासागर' ही अशीच एक सांस्कृतिक संघटना, जी कामगारांना केवळ पगार, भत्तेवाढ, बोनस यापलीकडेही एकत्र येऊन करण्यासारख्या ज्या अनेक गोष्टी असतात त्यांची जाणीव करुन देते मग ते कलासागरातले लेख असतात, चित्र–छायाचित्रप्रदर्शन असतं किंवा आणखी असंच काही.

या आठवड्यातल्या गुरुवारी म्हणजे औद्योगिक सुट्टीच्या दिवशी या टेल्को कलासागरने ग्रंथाली वाचक चळवळीच्या सहकार्याने टिळक स्मारक मंदिरात 'फिरक्या' व 'मुलगी झाली हो' हे मुक्त नाट्य असे दोन कार्यक्रम आपल्या सभासदाकरिता व मर्यादित स्वरूपात इतरासाठी सादर केले.

यापैकी 'फिरक्या' हा कार्यक्रम सुप्रसिद्ध क्रिकेट व फिल्मवेडे पत्रकार शिरीष कणेकर व ब्लॅक अँड व्हाइट टी. व्ही. चे बातमी-निवेदक अनंत भावे यांनी आपल्या खास स्टाइलीत पेश केला. भावे प्राध्यापक असून चौकोनी चष्मा नाही आणि दाढी असूनही विचारवंताचा आव आणीत नाहीत. अघळपघळ सदऱ्यानिशी माडी ठोकून बसणारा हा अवलिया प्राध्यापक आहे.

मा. भगवानसारखी अंगयष्टी असणारे आणि चित्रपट (हिंदी) व क्रिकेटवर धोधो बोलणारे शिरीष कणेकर अस्सल पुणेकरांच्या चेहऱ्यावरही स्मितरेषा ओढू शकले यातच सारं काही आलं की नाही...

फिरक्या या कार्यक्रमाला तसं कुठलंच बांधीव स्वरूप नाही. चहा–बिडी मारतामारता मारलेल्या गप्पांसारखं त्याचं स्वरूप अनौपचारिक आहे. त्यात उगाच प्रतिभा किंवा प्रतिमेचाही हव्यास नाही. लोक कंटाळेपर्यंत अथवा शेवटची गाडी मिळेल या बेताने या फिरक्या चालतात असं भाव्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केलं.

शिरीष कणेकर हे त्यांचे विद्यार्थी; पण फिरक्यात मात्र भावे 'प्रा. भावे' नसतात किंवा कणेकरानाही कुठला रोलनंबर नसतो. 'सर, सर' ची पालुपदे नसतात किंवा माझ्यामुळे तुला हे मिळाले असली उपकारात्मक गर्वोक्ती नसते. अनंत भावे आणि शिरीष कणेकर हे दोन मित्र आपले वय, मान, बाजूला ठेवून बिनधास्त गप्पा मारतायत असा टोटल फिल–

गप्पांची सुरुवात क्रिकेटने झाली आणि तिथूनच एकमेकांची विकेट घेत कणेकर व भावे फिरक्या ताणत गेले आणि प्रेक्षकांत हास्याचे फवारे झडू लागले. या फिरक्यातली भाषा, त्यातली अनुमाने किंवा प्रतिक्रिया इतक्या बेधडकपणे, उत्स्फूर्तपणे कानावर यायची की जणू काही आपल्या मनातलच ही माणसं बोलतायंत...

... गावस्करनंतर येट किरमाणी हे आमचं भारतीय क्रिकेटचं चित्र काय किंवा...

गावस्कर चौथ्या क्रमांकावर खेळायला आला तरी ओपनिंगला आल्यासारखाच. कारण पहिले दोघं शून्यावर बाद होणार ... अशी प्रतिक्रिया देणारे कणेकर तुमच्या–आमच्या मनातलंच बोलले की नाही ?

... आपल्या कर्णधाराची निवड व क्रिकेट या गोष्टीचा अर्थाअर्थी संबंध नसतो हे त्याचं विधान किंवा 'मी हूक किंवा पूल करणे भारतीय क्रिकेटला परवडणारे नाही' हे सुनीलने त्यांच्याजवळ काढलेले उद्गार आमच्या देशाच्या या महागड्या हौसेचे तीन तेरा वाजवतात...

... पाऊस आला म्हणून आता क्रिकेट बंद असं म्हणून भावे कणेकरांना चित्रपटाकडे वळवतात. कारण कणेकरांचं क्रिकेटवेड इतकं जबरदस्त आहे की या फिरक्यातसुद्धा ते 'पीच्' लवकर सोडायचे नाहीत !...

उसळत्या चेंडूसारखे उसळी मारून कणेकर शेवटच्या चेंडूपर्यंत लढत राहिले असते खैर ! (हिंदी चित्रपट सुरू झालं.) हिंदी सिनेमा आणि विशेषत: त्यातल्या गाण्यासंबंधातला कणेकरांचा खजाना अलीबाबाच्या वरताण आहे.

हिरो–हिरॉइनचे फॅन असणे समजू शकतो; पण सिनेपत्रकाराचे 'फॅन' असणारेही लोक आहेत आणि अशा सिनेपत्रकारात कणेकरांचा नंबर बराच वरचा आहे आणि आजकालच्या आग्लाळ सिनेपत्रकारितेतही आपल्या अफलातून मेमरीसकट मराठी सिनेपत्रकारितेच दालन मराठी चित्रपटसृष्टीपेक्षाही समृद्ध करणारा कणेकरांसारखा एखादाच अपवाद ! त्यामुळे मूळ मराठीत हिंदी सिनेमाविषयी ऐकायला मिळणं हा सुयोगच आणि कणेकरांनी तो सुयोग दुर्लभ योगात बदलला !

भाव्यांनी कणेकरांना पहिला प्रश्न विचारला की, इतकी वर्षे सातत्यानं चित्रपट अन् तेही हिंदी बघत आलात आणि कंटाळ्याचं तर सोडाच पण चवीनं पाहून त्यातलं वेगळेपण, गाणी इ. इ. लक्षात ठेवत आलात हे कसं काय जमलं तुम्हाला...? कणेकर लगेच पोझ घेऊन,... त्याचं काय आहे, कळायला लागल्यापासून आणि तुम्ही पिरियडला यायला लागल्यापासून आम्हाला दोनच पर्याय होते पिरियड की सिनेमा ? आणि अर्थातच दुसरा पर्यायच उत्तम !

### रसिक असाल तर ?

...तर हिंदी चित्रपट मी बघतो आणि चवीनं बघतो याचं कारण या चित्रपटातील सर्व नाती ही 'पवित्र नाती' असतात. (मग पडद्यावर ते किती का अपवित्र दाखवेनात) उदा. वडील किंवा बाप. हिरोला साधं पडसं झालं तरी '...जरा चार दिन अमरीका घुमके आव दिल बहल जाएगा.' इतका सुहृदय बाप केवळ चित्रपटच देऊ शकतो. नंतर आई म्हणजेच 'मा' ही मा म्हणजे सोशिकतेचा हिमालय आणि प्रेमाची गंगा असते...ही आई गेली अनेक वर्षे एक डायलॉग न चुकता न कंटाळता तितक्याच ममतेने म्हणत आलीय– '...जाव जल्दीसे हाथ मुंह धो ले और कुछ खा ले...' या संवादाशिवाय मा–बेटेत संवाद सुरूच होत नाही...आणि मग २५–३० वर्षांचा तो 'टोणगा' हाथ मुंह न धुताच खायला बसतो.

...गेली ४० वर्षे !... मग मा पुन्हा तोच डायलॉग कंटीन्यू करते... आज मैने तेरे लिए गाजर का हलवा बनाया है... हलव्याचे विविध प्रकार हिंदी सिनेमाला वर्ज आहेत त्यामुळे गेली ४० वर्षे गाजर का हलवा आपल्या जागेवरून हललेलाच नाही! अपवादात्मक परिस्थितीत 'आलू के पराठे' त्याची जागा घेऊ शकतात !

तर अशी ही 'मा' आपण पडद्यावरच अनुभवायची अन्यथा आपल्या घरी कुठलं स्त्रीरूप आल्या आल्या...हात पाय धुवा व हे गरम खाऊन घ्या...असं म्हणते ? उलट...आता हाडं खा माझी असं भयानक टोकाचं वाक्य ऐकाव लागतं त्यामुळं प्रेमळ, सोशिक आणि भांड्यातलं शेवटचं शीत हाताशी येऊनही मुलाला प्यारसे 'बेटे' म्हणणारी आई या जगात फक्त हिंदी स्क्रीनवरच पैदा होऊ शकते ! त्यामुळे हिंदी चित्रपटात सारे रंजोगम विसरून घुलमिल जाता येतं. तेही तुम्ही खरे रसिक आणि पुण्याचे नसाल तर ! पुण्याचे नसाल तर.. हे वाक्य कणेकरांनी अनेकदा वापरलं. पुण्याच्या टिपिकल पुणेरीपणाला त्यांनी अनेकदा उलटसुलट फटकारले आणि तेही पुण्यातच.

पुण्याचा रसिक हा बाल्कनीतल्या उच्चभ्रू प्रेक्षकासारखा चेहऱ्यावरची सुरकुती न हलवता बसणारा तर कणेकर अमिताभच्या डान्सवर बेभानपणे शिट्टी मारणाऱ्या वर्गातले ! असो.

...चित्रपटातल्या गाण्यांसबंधात भाव्यांनी कणेकरांना त्यांच्या अचाट मेमरीबद्दल कुतूहलाने विचारले ...कणेकर म्हणाले... समजा एखाद्या फुलाचा वास चालताना तुम्हाला आला आणि रोज तुम्ही त्या वाटेवरून जात असाल, रोज सुगंध दरवळत असेल ...तुम्ही खरे रसिक असाल (आणि पुण्याचे नसाल) तर एकदा तरी किमान हे झाडं कुठलं ? कलम आहे का ? एवढं तरी विचारालच ना ?

गाण्याचं ही तसंच आहे...रेडियोवर लागणाऱ्या गाण्यात गाण्याबरोबर गायक–गीतकार–संगीतकार–चित्रपट इ. इ. सागतातच. बर गाण आवडलं तर आपण पुन्हा पुन्हा ऐकतोच...आणि माझ्या बाबतीत असं झालंय अनेक गाण्यांशी निगडित अशा काही चित्रपटसृष्टीच्या आठवणी माझ्याजवळ 'रेकॉर्ड' आहेत... उदा. पी. एल. संतोषी. हा एके काळचा अतिशय श्रीमंत फिल्ममेकर. रेहाना या त्या वेळच्या नटीबरोबर त्याने सुपरहीट पिक्चर काढले...परतु दिवस पलटताच याची भयंकर अवस्था झाली. रेहानाच्या दारावर रात्रभर एखाद्या कुत्र्यासारख्या जिण्याने लाचार झालेल्या पी. एल. संतोषीने... 'तुम्हे क्या मालूम तुम्हारी याद मे हम कितना रोये' असलं गाणं लिहिलं मदनमोहन आणि लताने त्याचं सोनं केलं. १९४५ साली ४० हजाराचे सोन्याचे दागिने कॉस्च्यूमसाठी खरीदणारा पी. एल. संतोषी, मेहमूद नावाच्या नंतरच्या कॉमेडियनला ड्रायव्हर म्हणून घेणारा संतोषी अखेरच्या काळात झोपडपट्टीत रहात होता आणि मेहमूदकडे एक विनोद–५०० रु. या भावाने आयुष्य गुजरत मेला !...

...अशा अनंत हृदयस्पर्शी, रंजक आठवणी कणेकरांनी अभ्यासपूर्वक जमविण्यात आणि 'चल चित्रपटासारख्या' त्यात कायम मोशन ठेवलीय...

यानंतर कणेकरानी काही ' फॅन्स 'च्या गंमती सांगितल्या

त्यात...चाळीस वर्षापूर्वीच्या आवडत्या नटीबद्दल ( शीला रामाणी) अनुदार उद्गार काढले म्हणून मित्राला सुरा मारणारा फिल्मवेडा आहे तसाच देवानंदचे सर्व चित्रपट पाहून त्याची नोंद ठेवणारा, त्यातले डायलॉग वह्याच्या वह्या लिहून काढणारा आणि ' ओळखा पाहू ' मध्ये आलेला फोटो देवच्या अमुक चित्रातलाच आहे हे २५ कारणं देऊन पटवून देणारा व त्यासाठी ११८ स्मरणपत्रे पाठविणारा व ११९ व्या वेळी संपादक हो म्हणले यात दिग्विजय मानणारा देव वेडाही आहे...

फॅन्सचे हे किस्से झाल्यावर कणेकरानी जुन्याला नावं ठेवणाऱ्या आणि दिलीपकुमार अमिताभसारखी ॲक्टिंग करतो व बप्पी लाहिरीनी ' उचललेली ' चाल हीट होते असल्या विधानानी, उचलेगिरीनी सात्विक संतापाने आपण तापतो असे सांगितले...

...कणेकराचा गुस्सा आणखी वाढण्या— अगोदरच श्रोत्यानी फिरक्या गुंडाळल्या आणि या भकस मैफिलीची सांगता झाली. शैली आणि माहिती याच्या अपूर्वाईमुळे फिरक्या व्यवस्थित ताणल्या गेल्या.

यानंतर ' स्त्रीमुक्ती संघटना, मुंबई ' या संघटनेचे ' मुलगी झाली हो ' हे मुक्त नाट्य स्त्रीकलावंतानीच सादर केले. या मुक्त नाट्याचा हा ५६ वा प्रयोग. अतिशय नीटस व जबर आत्मविश्वासाने या स्त्रिया हा प्रयोग करतात आणि स्त्रियाना जागं करतात. हे सातत्य असच वाढो हेच कुणीही म्हणणार कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रंथालीचे पुण्यातील प्रमुख प्रभाकर नारायण परांजपे (अस नाव सांगणाऱ्या लोकाचं नाव आपण पूर्णच नाव घ्यायच असतं अस भावे म्हणाले होते) यांनी ग्रंथाची केवळ प्रकाशनसंस्था नव्हे तर लेखक–वाचक–प्रकाशक यात संवाद साधू पाहणारी आणि लोकाना पुस्तकावर प्रेम करायला लावून पुस्तक तयार करायलाच ' तयार ' करू पहाते असे प्रतिपादले. त्यासाठी अशा संवादमय कार्यक्रमाचे माध्यम !

—संजय पवार

# अनवट

## बिचारे दुर्लक्षित आयोग

केंद्र–राज्य संबंधाबाबत ठराविक कालावधीनंतर आढावा घेऊन त्यात काही बदल हवेत किंवा काय त्याच्यावर विचार व्हावा असे मत सरकारिया आयोगाने नुकतेच व्यक्त केले. केंद्र–राज्यसंबंधाबाबत घटनात्मक बाबींचा विचार करण्यासाठी न्या आर. एस. सरकारिया याच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला आहे. न्या सरकारिया यानी त्रिवेंद्रम येथे घेतलेल्या एका पत्रकारपरिषदेत त्यांनी आपल्या आयोगाच्या कामकाजाची जी माहिती दिली त्यावरून आपली राज्यसरकारे व बुद्धिवंत कोणत्याही प्रश्नावर किती उदासीन असतात ते दिसून येते.

आयोगाची स्थापना १९८३ च्या मार्चमध्ये झाली. दोन ते सात जून दरम्यान केरळमध्ये आयोगाची पहिली सार्वजनिक बैठक झाली. तीत मंत्री, राजकीय पक्षनेते, कायदेतज्ज्ञ आदि ७३ जणांशी विचारविनिमय झाला. तत्पूर्वी आयोगाने केंद्र–राज्यसंबंधावर १०९ प्रश्नांची प्रश्नावली तयार केली. ती बुद्धिवंत, कायदेतज्ज्ञ, पक्ष, राज्यसरकार इत्यादीकडे पाठविली. आतापर्यंत दीडशे जणांची उत्तरे आली; फारच थोड्या राजकीय पक्षानी याला प्रतिसाद दिला. मध्यप्रदेश व आता केरळ या दोनच राज्यानी आपली मते नोंदविली. अशा प्रकारात न्या. सरकारिया यांना पुढच्या वर्षीच्या एप्रिलपर्यंत याविषयीच्या सर्व बैठका समाप्त होतील अशी आशा आहे.

केंद्र–राज्य संबंधावर सध्या सेवेत असलेल्या न्यायाधीश मत नोंदविण्याबाबत मागेपुढे पाहतात असेही त्यानी निदर्शनाला आणून दिले.

आयोग नेमण्यात येतात; परंतु त्याला प्रथमतः संबंधिताकडून योग्य व आवश्यक प्रतिसाद मिळत नाही. दुसरे, आयोगाने अहवाल सादर केल्यावरही त्याची अंमलबजावणी होते याची शाश्वती नाही ! वृत्तपत्र, आयोग, वर्गीस समिती अहवाल, मंडल आयोग यांच्या बाबतचा अनुभव असाच होता.

## भगतानं दावला धूप

' कशात काय न फाटक्यात पाय '— तसे झाले भगताचे बिचारे. न्यूयॉर्कला काय गेले, काय बोलले ! अशा बोलण्याने देवी व देवपुत्र संतुष्ट होतील असे त्याना वाटले का काय ?'

हरकिशनलाल भगत खरे तर माहिती व प्रसारण मंत्री—आता त्याचेच दृष्टिकोन इतके स्पष्ट झाले, मग दूरदर्शन देवीदर्शन का होणार नाही.


' व्हिजन ऑफ एशिया ' या टेलिव्हिजनला मुलाखत देताना भारताचा भावी पंतप्रधान कोण अशा गुगली प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले,

' पुढच्या निवडणुकात कॉंग्रेस (आय) निःसंशय बहुमतात येईल. श्रीमती गांधीच या आमच्या नेत्या आहेत; पण वेळच पडली तर पक्ष राजीव गांधीचीच निवड करेल. जो नेता लोकाचे कल्याण...' वगैरे.

राजीव गांधीच का ? भगत उवाच, ' ते फार सौम्य, संतुलित व ज्ञानी आहेत. नेहरू कुटुंबातल्याप्रमाणेच ते कोणताही विचार किंवा दृष्टी समर्थपणे मांडू शकतात.'

म्हणजे नेहरूकुटुंब, इंदिरा गांधी यांचे श्रेष्ठत्व निर्विवाद आहेच तर ! पुढच्या निवडणुकीत रेडिओ–दूरदर्शन काय करणार ते दिसतेच. भगतांना अर्थात या भलावणी श्रेष्ठी (ग) च्या कौतुकाऐवजी कानपिचक्याच बसल्या असतील.

ही सर्व माणसे इतकी लाचार झालीत. निदान स्वप्नात तरी ते स्वतः पंतप्रधान झाल्याची कल्पना करत असतील काय?



# फर्गसन शताब्दी

पुण्यातील प्रसिद्ध फर्गसन महाविद्यालयाचे हे 'शताब्दी' महोत्सववर्ष आहे. ही घटना पुण्याला तर अभिमानास्पद आहेच; पण पुण्याबाहेर आणि भारताबाहेरही या क्षणाविषयी अभिमान बाळगणारे असंख्य लोक आहेत. त्या निमित्ताने फर्गसन महाविद्यालयाचे सध्याचे प्राचार्य बाळ गाडगीळ यांची ही मुलाखत.

## 'त्यांच्या' परंपरेला साजेसे आम्ही काही केलेच पाहिजे !

**–प्राचार्य गाडगीळ**

□

**प्रश्न :** आपल्या फर्गसन महाविद्यालयाला येत्या जानेवारी ८५ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत. अशा वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून आणि डे. ए. सोसायटीचे आजीव सदस्य म्हणून आपली या ऐतिहासिक क्षणाकडे पाहण्याची काय भावना आहे ?

**गाडगीळ :** 'ऐतिहासिक क्षण' हे शब्द आवडले. या क्षणांकडे पाहण्याच्या 'माझ्या भावना' असे तुम्ही म्हणता. माझ्याकडून एखादे भावपूर्ण किंवा भावनांनी भरलेले उत्तर तुम्ही अपेक्षित नाही ना ?

मी १९५७ साली या महाविद्यालयात आलो. १९६१ साली आजीव सदस्य झालो. १९७५ साली फर्गसनचा प्राचार्य झालो. म्हणजे २२।२३ वर्षे आजीव सदस्य व ९ वर्षे मी येथील प्राचार्य आहे.

तुम्ही म्हणता त्या क्षणाकडे मी अद्याप मागे वळून पाहू शकत नाही. कारण या लांबलेल्या एका क्षणातच मी गुंतून पडलो आहे. या क्षणातच मी एक प्रकारे जगतो आहे. मागे वळून पाहीन तेव्हा भावनाही व्यक्त करता येतील, थंड–कोरडे विचारही सांगता येतील; पण आज काही विचारच सांगतो.

आजीव सदस्य आणि प्राचार्य म्हणून हा सुवर्णाचा क्षण सिद्ध करण्यासाठी माझ्यावर खूप जबाबदाऱ्या आहेत याची मला जाणीव आहे. Bliss was it in that dawn to be alive, to be young was very heaven' ही वर्डस्वर्थची पंक्ती मी माझ्या माजी विद्यार्थी आणि हितचिंतकांना केलेल्या आवाहनात उद्धृत केली आहे. Bliss हे ठीक आहे; पण आम्ही त्यासाठी काय केले किंवा करीत आहोत हे महत्त्वाचे आहे. जोशीबुवा (श्री. ज. जोशी) म्हणतात ते वाक्य मला नेहमी आठवते, 'अहो, थट्टा आहे का काय? एवढं मोठं फर्गसन कॉलेज ! टिळक, आगरकर, चिपळूणकरांचे कॉलेज. तुम्ही तिथे काम करता. भाग्यवान आहात !'– भाग्यवान आहोतच; पण त्यांच्या परंपरेला साजेल असे काही आम्ही करायला नको का ? 'केलेच पाहिजे' – असे मला वाटते.

म्हणून या क्षणाकडे पाहताना मला असे वाटते की, आम्ही फारसे काही केलेले नाही. वाडवडिलांची मिळकत 'पुढे' चालविली; पण फार पुढे नेली नाही. शिक्षणाच्या नव्या दिशा पाहिल्या नाहीत, त्या पादाक्रांत करण्याचा प्रयत्न केला नाही. अडचणी खूप आहेत. हे खरे आहे. स्वातंत्र्य देशाला मिळाले; पण शिक्षणाला नाही. आता तर उच्च शिक्षण जवळजवळ 'शासकीय' निर्बंधात बसवून चालवावे लागते. स्वायत्तता मिळवून काही तरी वेगळे समाजोपयुक्त, तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढवील असे काही आम्ही करायला पाहिजे, असे आज मला वाटते. एका मित्राने मला विचारले की, या शताब्दी-समारंभाची भेट म्हणून तुम्ही एखादे अभियांत्रिकी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय असे काही तरी करायला पाहिजे... 'का

नाही ? जरूर करायला पाहिजे ' असेच मला वाटते. अडचणी असतील त्यावर उपायही असणारच.

सारांश माझ्या मनात एक प्रकारे नाकर्तेपणाची, परिस्थितीमुळे काही प्रमाणात निर्माण झालेल्या किंकर्तव्यतामूढतेची खंत आहे; पण आता आमच्या अस्तित्वाचे नवे शतक सुरू करताना नव्या जोमाने काही तरी नवे, चांगले करायला पाहिजे याची जाणीवही आहे.

**प्रश्न :** गेल्या शंभर वर्षात आपल्या महाविद्यालयाने जे काही शैक्षणिक विकासाचे टप्पे गाठले असतील त्यामधील काही महत्त्वाचे टप्पे आपण सांगू शकाल काय ?

**गाडगीळ :** हे महाविद्यालय फार जुने आहे हे तर खरेच आहे. शंभर वर्षाचा काळ एखाद्या संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने तसा खूपच आहे; पण प्रथम हे महाविद्यालय स्थापन झाले तेव्हा शिक्षण स्वस्त असावे हा एकच दृष्टिकोन समोर होता. त्याचे आम्ही पालन केले आणि डे. ए. सोसायटीने शिक्षणसंस्थांचा खूप विकासही केला आहे. आज या संस्थेची पाच महाविद्यालये महाराष्ट्राच्या निरनिराळ्या शहरांमध्ये आहेत. तसेच अनेक शाळांचीही स्थापना केलेली आहे. विस्तार या दृष्टीने हे सर्व ठीक आहे; पण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण जसे खेड्यापाड्यांमध्ये पोचविले तसे आम्ही करू शकलो नाही याची मात्र या वेळी मनात खंत आहे.

**प्रश्न :** कोणत्याही देशाला शिक्षणाशिवाय आणि शिस्तीशिवाय गती नसते. तेव्हा शिक्षण आणि शिस्त या दोन्ही दृष्टीने आपल्या महाविद्यालयाने कितपत प्रगती केली आहे ?

**गाडगीळ :** शिक्षण आणि शिस्त नसलेला देश हा देश कसला ? तो माणसांचा देश नव्हे, जनावरांचा मुलूख. शिक्षणाबरोबर शिस्त घेतलीत हे फार चांगले झाले. शिस्तीचे अनेक प्रकार आहेत तिची अनेक अंगं आहेत. या दोन्ही क्षेत्रात आम्ही काय प्रगती केली ? गणित, रसायन, वास्तव, वनस्पती व जीवशास्त्र, भूगर्भशास्त्र ही शास्त्रे व मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल इ. सामाजिक शास्त्रे, इंग्रजी, मराठी, फ्रेंच, जर्मन, संस्कृत, पाली, अर्धमागधी, गुजराती यांसारख्या भाषा यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण येथे दिले. वास्तवशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी, मराठी यांचे पदव्युत्तर शिक्षण देत आहोत. मानसशास्त्राची प्रयोगशाळा सुरू केली व मानसशास्त्राचे विशेष शिक्षण दिले. इलेक्ट्रॉनिक्स, फोटोग्राफी यांचे शिक्षण सुरू केले. एन्. टी. एस्. (नॅशनल टॅलेंट सर्च) साठी विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. वर्कशॉप (यंत्रशाळा) मध्ये लेथवर्क, ग्लासब्लोइंग अशा प्रकारचे शिक्षणक्रम चालविले. ज्ञानेश्वर विद्यापीठातर्फे चालू असलेल्या वैद्यकीय शिक्षणक्रमासाठी जागा दिली. नंतर हे काम आपल्यातर्फेच चालू ठेवायचे असा प्रयत्न होता; पण दुर्दैवाने तो अयशस्वी ठरला. cheapening and facilitating of education म्हणजे शिक्षण स्वस्त करणे आणि सुलभ करणे हे आमच्या संस्थापकाचे हेतू. आता शिक्षण स्वस्त वा महाग करणे आपल्या हातात नाही. शासनानेच फी निती घ्यायची हे ठरविले आहे; पण सर्व प्रकारचे शिक्षण सुलभ करणे हे काही आपल्याला जमले नाही. डेक्कन एज्युकेशन सोसायटी या आपल्या मातृसंस्थेने व्यवस्थापनाचा उच्च शिक्षणक्रम सुरू केला. I. M. D. R. तर्फे तो चालू आहे. तसेच T. I. P. (Technical Institute of Paints) ही एक छोटी संस्थाही अनेक वर्षे चालू आहे.

आपल्याला आणखी खूप करायचे बाकी आहे. त्याकरिता स्वायत्तता (autonomy) असावी असा आमचा आग्रह आहे. तसेच अनेक छोटेमोठे उपयुक्त ठरतील असे शिक्षणक्रम सुरू करायचे आहेत. त्यांना Nonformal courses असे म्हणतात. बाकी बरेचसे नेहमीचे (routine) असे शिक्षण चालू ठेवले. त्यात गुणवत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला; पण अनेक कारणांमुळे तो फार पुढे नेता येत नाही.

शिस्तीची पातळी आजकाल फार खाली गेली आहे. ती केवळ विद्यार्थ्यांमध्येच असे मला वाटत नाही. आम्ही शिक्षकही फार शिस्तीने चालतो असे नव्हे; पण शिक्षकांविषयी मी बोलत नाही. तो त्यांनीच आत्मपरीक्षणपूर्वक सोडविण्याचा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांमधली शिस्त बिघडली याला अनेक कारणे आहेत. आपले शिक्षणक्रम सोपे आहेत किंवा त्यापेक्षाही त्यातून पसार होणे हे सोपे आहे. तसेच संपादन केलेल्या पदव्यांना बाजारात फारशी मागणी व त्यामुळे भाव नाही. हेही एक कारण असणार. राजकारणामध्ये जी बेशिस्त आहे तसेच वेगवेगळ्या पातळ्यांवर राजकारणी लोकांत जो शिस्तीचा अभाव आहे त्याचा परिणाम विद्यार्थी–शिस्तीवरही झाल्याशिवाय राहिलेला नाही. निवडणुका आल्या की त्यांचे काम पुरे करून घेणाऱ्यांच्या अंगावर काटा उभा राहतो. स्नेहसमेलने काटछाट करून करावी लागतात. पूर्वीची मजा त्यात राहिलेली नाही. असे का ? मोठ्या माणसांकडून लहान मुले नेमक्या शिस्तीबाबतच्या (म्हणजे तिच्या अभावाबाबतच्या) गोष्टी शिकतात. त्यांना फारसा दोष देता येणार नाही.

बेशिस्तीवर माझ्या दृष्टीने इतर सर्वसामान्य उपायांखेरीज एक महत्त्वाचा उपाय आहे. तो म्हणजे परीक्षेत पास होण्याच्या अटी कडक केल्या पाहिजेत. सहजासहजी पदवी पदरात पाडून घेणे सोपे, असे असता कामा नये. त्यामुळे पदवीचे मूल्यही वाढेल आणि शिस्तही वाढेल.

**प्रश्न :** काही जुन्या आदर्श शिक्षणसंस्थामधून आजीव सदस्यत्वाची प्रथा आहे. या आजीव सदस्याची निवड आपल्या संस्थेतून कोणत्या निकषांवरून केली जाते ?

**गाडगीळ :** आजीव सदस्यांच्या प्रश्नावाबत उभयपक्षी लोक भावनाप्रधान बनले आहेत. म्हणून या बाबतीत मी खोलात शिरणार नाही. दोन्ही बाजूंविषयी थोडे–थोडे बोलता येईल.

आजीव सदस्यांची निवड करताना त्या त्या शिक्षकाचा शैक्षणिक

दर्जा, विशेषतः संस्थेसाठी निदान वीस वर्षे काम करायची तयारी; त्याची सचोटी इत्यादी गोष्टींचा विचार केला जातो.

प्रश्न : आजीव सदस्याची निवड संस्थेमधील शिक्षकांमधूनच केली जाते, अशा वेळी इतर शिक्षकवर्ग आणि व्यवस्थापकीय कर्मचारी वर्ग यांच्यामध्ये कसल्या प्रकारचे संबंध असतात ?

गाडगीळ : मी फक्त माझ्या संबंधाविषयी बोलतो. शिक्षक किंवा शिक्षकेतरवर्गातील कर्मचाऱ्यांशी माझे संबंध अतिशय चांगले आहेत. याला अपवाद असतीलच; पण आमच्या कॉलेजातील या दोन्ही वर्गांची संख्या पहा.

हे संबंध खेळीमेळीचे, समजुतीचेच असले पाहिजेत. त्याशिवाय नीट काम करणेच शक्य होणार नाही.

प्रश्न : गेल्या शंभर वर्षांचा आपण आढावा घेतल्यानंतर आज जेव्हा आपण मागे वळून पाहता तेव्हा आजीव सदस्यत्वाची आवश्यकता आणि उपयुक्तता आपणास अपरिहार्य वाटते काय ?

गाडगीळ : अगदी थोडक्यात उत्तरे देतो. कार्यक्षम व्यवस्थापनाच्या आवश्यकतेबद्दल टीकाकारही आक्षेप घेणार नाहीत. मला एकच विचारायचे आहे ते हे की, समजा ही व्यवस्था टाकाऊ असेल तर तिला पर्याय कोणता ? लोकशाही व्यवस्थापन हा पर्याय आहे का ? अमेरिकेसारख्या लोकशाही मानणाऱ्या देशातही या प्रश्नावर प्रचंड वादंग आहे. यावर पूर्ण विचार दोन्ही बाजूंनी करा.

नव्या आजीव सदस्यांसाठी शोध करूनही माणसे सापडत नाहीत. मिळाली तरी ही जबाबदारी स्वीकारायला ती तयार नसतात असे आढळते. याचा विचार करायला हवा.

पूर्ण त्यागाच्या भावनेतून ही संस्था निर्माण झाली; पण शिक्षकांनीच त्याग करावा व तो देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरही करावा ही कल्पना रँग्लर पराजप्यानाही मान्य नव्हती. आजीव सेवक म्हणून एका दृष्टीने अप्पासाहेब व डॉ. महाजनी आणि दुसऱ्या दृष्टीने प्राचार्य व्ही के. जोग हे माझे आदर्श आहेत. लोकमान्य टिळक, माधवराव नामजोशी याना आजीव सेवक म्हणून मी फारच मानतो.

प्रश्न : ही आवश्यकता आणि अपरिहार्यता शैक्षणिक दर्जा आणि संस्थेमधील भावनिक ऐक्य यांच्या संवर्धनास उपयुक्त ठरते काय ? नव्या बदलत्या समाजपरिस्थितीमध्ये या विषयाकडे आपण कोणत्या दृष्टीने पाहाल ?

गाडगीळ : ठरावयास पाहिजे हे खरे. नव्या परिस्थितीतही ही पद्धती कुचकामी नाही पर्याय सापडेपर्यंत डागडुजी करून ती चालवावी लागेल. भावनिक ऐक्य इत्यादी हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून असते, हेही तुम्ही कबूल कराल.

प्रश्न : गेल्या काही वर्षापासून महाविद्यालयांच्या व्यवस्थापकीय समितीवर आजीव सदस्याबरोबरच इतर प्राध्यापकवर्गाचे तीन प्रतिनिधी आणि व्यवस्थापकीय सेवकामधून एक प्रतिनिधी तसेच गव्हर्निंग कॉन्सिलचा एक प्रतिनिधी याची निवड झालेली आहे. तेव्हा ही समिती आता पुरेशी प्रातिनिधिक झालेली आहे असे वाटते. तेव्हा या समितीच्या कार्यक्षमतेमुळे संसदेमध्ये काही चैतन्य आले आहे काय ? त्यामुळे शैक्षणिक आणि कारभारविषयक दर्जामध्ये कितपत सुधारणा झाली आहे किंवा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे काय ?

गाडगीळ : स्थानिक व्यवस्थापन समिती ही अधिक प्रातिनिधिक झाली आहे हे उघडच आहे. आमच्या संस्थेने या समितीची अधिकारकक्षा खूपच वाढविली. त्यामुळे ती अधिक लोकशाहीप्रधान (democratic) आहे. त्यामुळे शैक्षणिक व कारभाराच्या दर्जात सुधारणा झाली की नाही हे तुम्हीच मला सांगा, व्हायला पाहिजे हे मात्र खरे.

प्रश्न : आपल्यासारख्या जुन्या शैक्षणिक संस्था स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय शिक्षणाने प्रेरीत होऊन अस्तित्वात आल्या व त्या दृष्टीने त्यानी देशाची महत्त्वपूर्ण सेवा केलेली आहे; परंतु आज स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची दिशाच बदलली आहे. या बदलत्या दिशेच्या संदर्भात आपल्या मनात काही नवे संकल्प आहेत काय ?

गाडगीळ : संस्थेने स्वातंत्र्यपूर्वकाळात मोठीच सेवा केली यात शंका नाही. गांधीजीनी १९३५ साली काय म्हटले हे लक्षात आहे का ?

'Who can fail to be enthused over the noble record of service rendered by the D. E. Society and Fergusson College to the cause of education ? '

नव्या संदर्भात माझ्या मनात खूपच संकल्प आहेत. १) शिक्षणातली गुणवत्ता वाढली पाहिजे. २) उपयुक्त शिक्षणावर भर दिला पाहिजे. ३) स्वायत्तता मिळविणे हे त्यासाठी आवश्यक आहे. ४) नवे छोटे शिक्षणक्रम तोपर्यंत nonformal म्हणून चालविले पाहिजेत. ५) शिक्षक व विद्यार्थी यांचे प्रमाण सुधारले पाहिजे. ६) सामाजिक शास्त्रांच्या शिक्षणावर या शेवटच्या मुद्द्याबाबत एक प्रतिक्रिया मनात येते ती अशी : मोठमोठ्या अधिकारी माणसाचे मत हे की आर्टस्‌ची (भाषा, सामाजिक शास्त्रे इ. शिक्षण देणारी) कॉलेजेस् बंद करावी ! याला तुम्ही काय करणार ?

प्रश्न : आजच्या काळात बरेचसे व्यावसायिक प्रकल्पदेखील सरकारच्या साह्यावाचून चालू शकत नाहीत असे दिसते. तेव्हा शिक्षणासारख्या अनुत्पादक संस्था तर सरकारच्या अनुदानाशिवाय चालणे शक्यच नाही. आपणालाही तात्कालिक शैक्षणिक बाबींमध्ये शंभर टक्के सरकारी अनुदान मिळते. या अनुदानाचा संस्थेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आपणास कितपत उपयोग होतो ? शिवाय या अनुदानामुळे संस्थेच्या स्वातंत्र्यावर काही विपरित परिणाम तर होत नाही ना ?

गाडगीळ : एका अर्थाने आपण शासकीय कॉलेजेस झालेलो आहोत. आपल्या फीज् आपल्याला ठरविता येत नाहीत. आपले अनुदान सरकार देते (सर्व नेहमीचा curent खर्च सरकार देते हे बरोबर नाही. त्यातही अमान्य inadmissible असा खर्च आहे. तुम्ही सध्या जो चहा पीत आहात तो प्यायचे थांबू नका. त्याचा खर्च कॉलेजला किंवा मला करावा लागतो.) सरकारी अनुदानात विकासासाठी एक पैसाही मिळत नाही. तो आपणच उभा करावा अशी त्याची अपेक्षा आहे. आता आपली वसतिगृहे पहा. ५२० मुले आणि मुली येथे राहतात. एवढे मोठे वसतिगृह बहुधा कोणत्याही खाजगी महाविद्यालयाचे नसेल; पण यासाठी आपल्याला कसलेही अनुदान मिळत नाही. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे सुद्धा कित्येकाना माहीत नाही. विकास, सर्वांगीण विकास हा सरकारी अनुदानातून अशक्य

आहे. यासाठी तुमच्यासारखे हितचिंतक व उद्योग-व्यापारसंस्था इ. वर अवलंबून राहावे लागते. माजी विद्यार्थ्यांनीही खूप साहाय्य केले आहे. श्रीमती सरला बिर्ला, डॉ. पु. ल. देशपांडे अशी काही ठळक उदाहरणे आहेत. श्री. मदनलाल अगरवाल मला म्हणाले, 'Principal Gadgil, I treat the Furgusson college as a temple. I worship the teachers !' या सद्गृहस्थांनी कोणत्याही अटी न घालता विकासासाठी हजारो रुपये दिले आहेत.

जे काही सरकारी अनुदान मिळते त्याबाबत फक्त अटी असतात. आमच्या शैक्षणिक स्वातंत्र्यावरसुद्धा त्यामुळे मर्यादा आल्या आहेत. एक अधिकारी म्हणाले, 'The one who pays the piper will call the tunes.' मी त्याना शांतपणे सांगितले, 'But who is paying the piper ? Not you. In fact I am paying the piper because I am a taxpayer !' पण बोलून, लिहून काहीही उपयोग होत नाही असा माझा अनुभव आहे.

**प्रश्न :** शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने आपण समाजामधून जो निधी उभारीत आहात त्याच्या विनियोगाच्या दृष्टीने आपल्या काय योजना आहेत ?

**गाडगीळ :** योजना खूपच आहेत. रस्ते, पाण्याचा साठा, इमारतींची दुरुस्ती, वसतिगृहांची सुधारणा, अॅम्फी थिएटरचे नूतनीकरण अशा व इतर दुरुस्तीच्या योजना आहेत. त्याशिवाय काही शैक्षणिक इमारती हव्या आहेत. पोस्ट ग्रॅज्युएट केमिस्ट्री, मायक्रोबायोलोजी, मानसशास्त्र, आता कॉंप्युटर बसवायचा तर त्याला 'वातानुकूलित' इमारत लागते. तशी इमारत लागेल. तसेच एक म्युझियम पाहिजे. तिथे गोपाळराव देऊसकरांनी काढलेली देखणी, जिवंत तैलचित्रे ठेवायची. इतर काढून घ्यायची. माजी-आजी शिक्षक यांची पुस्तके, हस्तलिखिते, नामवंत विद्यार्थ्यांनी लिहिलेले साहित्य, त्यांची छायाचित्रे इत्यादींना तिथे जागा असेल. तसेच माझे वैयक्तिक मत असे की, मला ऑलिंपिक तऱ्हेचा स्विमिंग पूल पाहिजे. आबासाहेब मला म्हणाले, 'अहो, आपला देश गरीब आहे. तुम्हाला इतका महागडा पूल कशाला पाहिजे ?' मी म्हणालो, 'आपला देश गरीब आहे; पण आबासाहेब चांगले श्रीमंत आहेत की ! तसं पाहिलं तर मला स्वतःला तो नको आहे. मला पोहताही येत नाही; पण आमच्या मुलांमुलींसाठी तो पाहिजे आहे. कारण या गर्दीत मला एक मार्क स्पिट्झ दिसतो आहे. तो एक दिवशी भारतासाठी सात सुवर्णपदके ऑलिंपिक्समध्ये मिळवील. फर्गसनचे आणि भारताचे नाव ऑलिंपिक्समध्ये गाजवील ! म्हणून आबासाहेब, मला ऑलिंपिक स्विमिंग पूल पाहिजे आहे !'

दुसरे असे की, माझ्या योजना काहीही असोत. त्या मान्य करून घ्याव्या लागतील. त्याचप्रमाणे अग्रक्रम ठरविणे हेसुद्धा मी करू शकणार नाही. माझ्या मताचा विचार मात्र होईल हे निश्चित; पण हेच एका दृष्टीने बरे आहे.


**प्रश्न :** आज महाविद्यालयांमधून जे शिक्षण दिले जाते ते देशाच्या संपूर्ण विकासाच्या दृष्टीने अपूर्ण आहे असे समजमत आहे. या प्रांतामधील एक अनुभवी व्यक्ती म्हणून आपण याविषयी कोणता विचार करता ?

**गाडगीळ :** हे मत बरोबर आहे; परंतु देशप्रेम, देशभक्ती, समाजसेवा इ. चे शिक्षण कॉलेजमधून सध्याचे अभ्यासक्रम सांभाळून मिळेल किंवा देता येईल असे मला वाटत नाही. तशी अपेक्षा करणे चूक आहे असे मला वाटते. हे ऐकून तुम्हाला धक्का बसेल; पण मी म्हणतो की, तुम्ही रसायनशास्त्र शिकविताना देशप्रेम कसे शिकविणार ? नैतिक मूल्ये काय सांगणार? विद्यार्थी चांगला रसायनशास्त्रज्ञ करणे हे तुमचे काम आहे. आता हीसुद्धा एक प्रकारे समाजसेवाच आहे. उद्या हा रसायनशास्त्रज्ञ संशोधन करील, कारखाना काढील, लोकांना नोकऱ्या देईल.

तेव्हा दिलेल्या शिक्षणाचे, अध्यापनाचे काम सचोटीने करणे व विषयात विद्यार्थ्याला पक्का करणे हे शिक्षकाचे काम आहे. शिक्षकाच्या वैयक्तिक आदर्शामुळे विद्यार्थ्यात चांगले गुण येऊ शकतील; आले तर उत्तम-नाही तर तक्रार नको.

**प्रश्न :** शिक्षण क्षेत्रातील पूर्वीच्या व्यक्ती विद्वान, बहुश्रुत आणि त्यागी होत्या. अशा व्यक्तींची किती तरी उदाहरणे देता येतील. आज कोणी असा त्याग केला तर हवाच आहे; पण तशी समाजाची अपेक्षा नाही. आपल्या व्यवसायावर निष्ठा असणे आवश्यक आहे. अशी निष्ठावान मंडळी देखील आज शिक्षणसंस्थेत दिसत नाहीत, याची कारणे आपण सांगू शकाल काय ?

**गाडगीळ :** निष्ठावानांची संख्या नेहमीच कमी असते. ती तशी असण्याची कारणे एकंदर समाजस्थितीत शोधायला पाहिजेत; पण थोडी-फार अशी मंडळी आहेत, त्यांच्या पुण्याईवर शिक्षणसंस्था जगत असतात.

आवाजांचे गुणाकार
घड्याळाची टिक् टिक्, कानात हातोड्याची ठक् ठक् का बनते?
वैज्ञानिक कारणांचा शोध घ्यायला शिकविणारी.

राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी

वैशिष्ट्ये * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा * किं. १५ रु.


राजहंस प्रकाशन | १०२५, सदाशिव, पुणे-३०.

**प्रश्न :** पूर्वीच्या काळी समाजामध्ये आणि विद्यार्थी वर्गामध्ये शिक्षकांविषयी आदर होता. आज तसा आदर दिसत नाही. विद्यार्थ्यांना वळण नाही आणि शिक्षकवर्गामध्ये आस्था नाही असे चित्र दिसते, का ?

**गाडगीळ :** खरे आहे; पण हा आदर नाही याला आम्ही दोघेही जबाबदार आहोत. विद्यार्थी आणि शिक्षक, असे मला वाटते; पण हा आत्मसंशोधनाचा भाग आहे. तो प्रत्येकाने करायला पाहिजे; पण तुम्ही म्हणता ते चित्र खिन्न करणारे आहे.

**प्रश्न :** शंभर वर्षांच्या दीर्घ अनुभवानंतर आणि फर्गसन महाविद्यालयाने या काळात बजावलेल्या विशेष कामगिरीनंतर आता आपले महाविद्यालय ( ऑटॉनॉमस ) व्हावे असे आपणास वाटते काय ? स्वतःची शिक्षणपद्धती आणि स्वतःच्या पदव्या यामुळे फर्गसन् महाविद्यालयाची प्रतिष्ठा आणखी वाढेल काय ? असा बदल होण्याच्या अवस्थेत आज शंभर वर्षानंतर आपले महाविद्यालय आले आहे काय ? नसल्यास कोणत्या अडचणी आहेत ?

**गाडगीळ :** अर्थातच मला तसे वाटते ! निदान असा प्रयोग करण्याची क्षमता आम्ही मिळविली आहे असेही वाटते. फर्गसनची प्रतिष्ठा स्वयंचलित ( autonomous ) झाल्यामुळे वाढेलच हे निःसंशय. अहो, ऑटॉनॉमी म्हणजे खाऊ नव्हे. ते एक आव्हान आहे. ( किती कॉलेजेसनी ऑटॉनॉमस होण्याची इच्छासुद्धा दाखविली याचा तपास करा. ) ते आम्ही पुरे केले तर फर्गसन कॉलेजच्या वेगळ्या पदवीची प्रतिष्ठा वाढेलच. ऑटॉनॉमी मिळण्यात शासकीय परवानगीची गरज आहे. नाही तर खूप मोठ्या निधीची गरज आहे. एवढा अवाढव्य खर्च एरवी पेलणार कसा ?


राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी

वैशिष्ट्ये * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा * किं. १५ रु.

राजहंस प्रकाशन | १०२५, सदाशिव, पुणे-३०.


**प्रश्न :** फर्गसन महाविद्यालयात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात, आपण एका नव्या चैतन्यमय जगात प्रवेश करीत आहोत असे वाटले पाहिजे. अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करण्यात कोणत्या अडचणी आहेत ?

**गाडगीळ :** चैतन्यमय वातावरणात आलो असे वाटण्यासारखे वातावरण येथे अजूनही आहे. नसल्यास तसे निर्माण व्हायला पाहिजे. अडचणी नेहमीच असतात. कधी तरी त्यांच्यावर मात करता येते. ज्ञानप्रबोधिनीचे पहा. आमच्या I. M. D. R. चे पहा.

**प्रश्न :** नव्या शिक्षणविषयक समस्यांचा आणि भविष्यकाळातील विस्तार योजनांचा आपला संकल्प सांगता काय ?

**गाडगीळ :** शिक्षणविषयक समस्या खूपच आहेत. औद्योगिक, व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे. तसेच शिक्षणपद्धतीत सुधारणा पाहिजे. Semester पद्धती उपाययोजना म्हणून सुरू झाली. आज ती पद्धतीच एक दुखणे बनली आहे. आपण दिलेले उत्तर हाच एक प्रश्न ठरला आहे.

खऱ्या आत्मनिर्भरतेसाठी पैसा पाहिजे. 'ताक मागायला जाताना भांडे लपवू नये' असे लोकमान्य सांगत असत. ज्यांना चांगले कार्यकर्ते, व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, विचारी लोक हवे असतील त्यांनी म्हणजेच शासनाने आणि जनतेने हा पैसा दिला पाहिजे.

**प्रश्न :** आपल्या संस्थेचा हा शताब्दीसमारंभ कोणत्या अभिनव पद्धतीने साजरा करण्याचे आपल्या मनात आहे आणि त्या दृष्टीने आपल्या काय अपेक्षा आहेत ?

**गाडगीळ :** खूप कामे आधी करून हा समारंभ साजरा करायचा ही अभिनव पद्धत होईल. त्याचप्रमाणे चर्चा, व्याख्याने, सांस्कृतिक, रंजन कार्यक्रमांची मेजवानी आजी-माजी विद्यार्थी व पाहुणे यांना देता आली पाहिजे. आम्हाला त्यांचे फक्त पैसे नकोत, त्यांचा सहवासही हवा. संस्मरणीय होतील असे कार्यक्रम आम्ही त्यांना दिले पाहिजेत.

**प्रश्न :** समारोप करताना आपल्या मनामधील ऐतिहासिक क्षणाविषयीच्या भावना आपण व्यक्त कराव्यात अशी अपेक्षा आहे.

**गाडगीळ :** ही घटना, हा प्रसंग फार थोर आहे. त्या प्रसंगाच्या थोरवीला साजेल असे आमच्या हातून काही घडावे. नाही तर टिळक-नामजोशी-चिपळूणकर-गोखले, महर्षी कर्वे-परांजपे-महाजनी-जोग यांचा वारसा सांगण्याचा आम्हाला अधिकार राहणार नाही

**प्रश्न :** शेवटी या समारंभाला आणि भविष्यकाळातील आपल्या योजनांना 'माणूस' प्रतिनिधी म्हणून मी आणि 'माणूस' साप्ताहिकाचे संचालक अभिष्ट चिंतितो.

**गाडगीळ :** मनःपूर्वक आभारी आहे. तुमच्यासारख्या हितचिंतकांच्या जोरावरच कॉलेज शंभर वर्षांचे झाले. वृत्तपत्रांची, विचारपत्रांची ताकद काय असते हे मी तुम्हाला कशाला सांगू ?

**—प्रतिनिधी**

राजधानी दिल्ली

# दोन प्रदर्शने

## गुड लिव्हिंग

रात्री ११ नतर बसेसची घरघर नि रस्त्यावरची वर्दळ बद झाली की, दिल्लीतील रस्ते फार सुदर दिसतात. निरनिराळ्या प्रकारच्या दिव्यानी सुशोभित झालेले, शात, नीरव, लांबलांब रस्ते नुसते पहात रहावेत. रात्री घराघरातील दिवे बंद झाले की, या रस्त्याची शोभा आणखीनच वाढते. परवा रात्री अशीच गच्चीतून डोकावून दूरवर गेलेला आमच्या घरासमोरील रस्ता मी न्याहाळीत होते. नेहमीपेक्षा काही तरी अधिक विलोभनीय वाटले म्हणून नीट निरखून पाहिले. तेव्हा एकदम लक्षात आले की, रस्त्यावरच्या ट्यूबलाइट्सची जागा सौम्य हिरवी छटा असलेल्या लावट मर्क्युरी दिव्यानी घेतली होती. दूरपर्यंत ओळीने दिसणारे हे मर्क्युरी दिवे आणि त्याचा रस्त्यावर व, ट्रॅफिक-आयलडमध्ये पसरलेला सौम्य रम्य प्रकाश. एखाद्या परीकथेतल्याप्रमाणे वातावरण भारलेले अन् भारावणारे वाटले. एके दिवशी अचानक रस्त्यावर असा बदल झालेला पाहून मला मोठी गंमत वाटली; पण असा आकस्मिक बदल इथे अनेकदा पहायला मिळतो. इथे पहाता पहाता कुठले तरी पडिक घर नाहीसे होऊन टोलेजग इमारत उभी राहते, कुठे एखाद्या मोठ्या पार्कला आटोपशीर बनवून तिथे बसस्थानक किंवा मोठे फुटपाथ येते तर कुठे एखाद्या बोळीत रंगीबेरंगी कापडानी आणि आकर्षक कमानी व गालिच्यांनी मांडवरूपी महाल उभा केला जातो. दुसऱ्या दिवशी उठून पाहू गेलात तर तो महाल एखाद्या जादूतल्या महालासारखा अदृश्य झालेला असतो. मांडवभर अथरलेले वॉल टू वॉल कार्पेट, सर्वत्र ओळीने माडलेल्या खुर्च्या आणि दिव्यांचा भरपूर लखलखाट असलेल्या या मांडवातून वावरताना, तिथे मुळात एक बोळ आहे याची पुसटशी जाणीवही होत नाही; परतु रात्री लग्न नि जेवण झाले की, रातोरात हे मांडव केव्हा काढले जातात आणि जागा पूर्ववत केव्हा दिसू लागते हे कळूनही येत नाही. हे सर्व पाहून आयुष्याच्या क्षणभंगुरतेची कल्पना मनाला पुन्हा पुन्हा पटत जाते.

दिल्लीचे बाह्य रूप असे परिवर्तनशील असले तरी तिचे आंतरिक रूप काहीसे ठराविक सूत्रात गोवलेले दिसते. हिवाळा जवळ आला की, उन्हाळी कपड्याचे सेल ठिकठिकाणी जोरात सुरू होतात आणि उन्हाळा येऊ लागला की, सर्वत्र लोकरीच्या व ॲक्रेलिक कपड्याच्या सेलचा धूमधडाका उडतो. हिवाळ्यात नखशिखान्त उबदार कपडे घालून हिंडायला जाण्यात मोठी मौज असते; परंतु उन्हाळा मात्र आपल्या कमाल उष्णतेने दिल्लीकराना हैराण करतो. पाण्याच्या कमी दाबामुळे घरांच्या उच्च स्थानी राहणारी मंडळी हवालदिल होतात पाणी भरण्याचे पवित्र कार्य करण्यात संध्याकाळ सपून जाते. अशा वेळी कुठे एखादा चागला कार्यक्रम असला तरी त्यावर पाणी सोडून गप्प बसण्याशिवाय गत्यतर नसते.

सध्या दिल्लीतील प्रगतिमैदानावर एक एक्झिबिशन भरले आहे. टी. व्ही.वर त्याची जाहिरात पाहिली आणि वाटले की, पाहून यावे एकदा. एक्झिबिशनचे नाव आहे 'गुड लिव्हिंग एक्झिबिशन.' अहो, पाण्याअभावी 'साधं लिव्हिंग'सुद्धा कठीण झालंय आणि 'गुड लिव्हिंग' काय पहायला जायचं, असा ग्राम्याचा विचार डोक्यात आला; परतु ते न पाहणं हेही दिल्लीच्या आंतरिक जीवनसूत्रात बसत नाही. प्रगतिमैदानात भरणारी एक्झिबिशन्स न पाहणारा दिल्लीकर तुम्हाला क्वचितच आढळेल!

'गुड लिव्हिंग एक्झिबिशन देखने प्रगतिमैदान चलिये' असे रोज टी. व्ही.वरून निमंत्रण देणाऱ्या निवेदिकेच्या अगत्यपूर्वक निमत्रणाला मान देऊन आम्हीही एके दिवशी सहकुटुंब-सहपरिवार ते प्रदर्शन पहायचं ठरवलं आणि एका रम्य संध्याकाळी तिथे गेलो.

प्रगतिमैदान हे दिल्लीतील निरनिराळ्या प्रकारची प्रदर्शने भरविण्यासाठी कायमची व्यवस्था केलेले विस्तीर्ण मैदान आहे. लांब लांब अंतरावर भव्य प्रवेशद्वारे असलेल्या या मैदानाची विशालता त्याच्या प्रवेशद्वारांकडे पाहूनच लक्षात येते. एखादा नवखा माणूस एखाद्या प्रवेशद्वारातून आत शिरला आणि एक्झिबिशन पहात हिंडत राहिला तर त्याची चक्रव्यूहात सापडल्यासारखी स्थिती होते. दरवर्षी येथे कुठले ना कुठले तरी प्रदर्शन भरतच असते. आतरराष्ट्रीय पुस्तकप्रदर्शन आणि व्यापारमेळा एकाआड एक वर्षाने भरत असतात. याखेरीज औद्योगिक प्रदर्शन, फर्निचर आणि गृहसजावटीचे प्रदर्शन, गालिच्यांचे प्रदर्शन, पेंटिंग्जचे प्रदर्शन अशासारखी प्रदर्शने मधूनमधून भरत असतात. व्यापारमेळा आणि औद्योगिक प्रदर्शनात त्या त्या राज्याचे, देशांचे सुदर सेट्स उभे केले जातात. आपापल्या औद्योगिक विकासाचे आणि उत्पादनातील वैशिष्ट्याचे प्रदर्शन आणि विक्री मोठ्या प्रमाणात चालते.

### त्याची अपूर्वाई काय ?

गुड लिव्हिंग एक्झिबिशन म्हणजे माणसाचे जीवनमान सुखाचे आणि समृद्ध कसे बनविता येईल याची विविध साधनाच्या योगाने माहिती देणारे प्रदर्शन. प्रगतिमैदानातील अनेक हॉल्सपैकी कुठल्या हॉलमध्ये हे प्रदर्शन भरले आहे याचा शोध घेत आम्ही चाललो होतो. गोदावरीमार्ग, नर्मदामार्ग, कावेरीमार्ग, ब्रह्मपुत्रामार्ग, यमुनामार्ग अशी नद्यांची नावे असलेले अनेक मार्ग पार करून आम्ही मानसरोवरलेकजवळ आलो. निळेशार, नितळ पाणी असलेला हा तलाव थुईथुई नाचणाऱ्या कारंजांनी आणि दिव्यांच्या प्रकाशझोतांनी फारच सुंदर दिसतो. त्यातून एखादा शिकारा जात असला की क्षणभर आपण काश्मीरमध्येच असल्यासारखे वाटते. या सरोवराच्या समोरच शाकुंतल, हसध्वनी, फलकनुमा आणि मंझर ही थिएटर्स आहेत. त्याच्या जवळच्याच एका हॉलमध्ये हे प्रदर्शन भरले होते.

बाहेरच्या उकाड्यातून त्या एअरकंडिशन्ड हॉलमध्ये शिरल्यावर खूप बरे वाटले. मात्र टी. व्ही. वरून आणि वर्तमानपत्रातून रोज गाजत असलेले ते प्रदर्शन तेवढ्या हॉलपुरतेच मर्यादित होते हे पाहून थोडी निराशा झाली. वास्तविक प्रगतिमैदानमध्ये प्रदर्शन

भरले की ते अनेक दालने पालथी घालत पहावे लागते. कधीकधी तर एखाद्या हॉलमधील भाग पहायचा राहूनही जातो. त्यामानाने हे प्रदर्शन फार छोटे होते. हे प्रदर्शन अनेक भागात क्रमशः दाखविण्यात येणार असल्याने कदाचित ते छोटे असावे.

कपडे अडकविण्याचे व्हॅक्युम हुक्स, टूथब्रशांचे हायजेनिक कव्हरस्टॅंड्स, फ्यूज न उडणारे, वायर नसलेले बेडलॅंप्स, भिंतीला चिकटणारे वॉलहॅंगिंग्ज वगैरे ४-५ नाविन्यपूर्ण वस्तू सोडल्या तर बाकीच्या वस्तू हल्ली नेहमीच्या जीवनात आढळणाऱ्या घरगुती वापराच्याच होत्या. त्याशिवाय ज्या वस्तू या गुड लिव्हिंगमध्ये मोडणाऱ्या होत्या त्या बऱ्याच महाग असल्यामुळे मध्यमवर्गीयांच्या जीवनाला 'गुड' बनवू शकणाऱ्या नव्हत्या. सनफ्लेम ओव्हन, गॅस अॅंड ग्रिल, सुपरफ्लेम शेफ, कलर टी. व्ही., प्रेशरपॅन, ट्विस्ट अॅंड पोअर फ्लास्क्स इत्यादी ज्या वस्तू मनुष्याचे जीवन सुखमय करू शकतात, त्या बाजारात इतरत्रही पहायला मिळतातच. त्यामुळे तिथे त्यांची फारशी अपूर्वाई नव्हती. बाकी वस्तूंपैकी कपडे, गालिचे, फर्निचर्स, खेळणी, शृंगारप्रसाधने इत्यादींचे स्टॉल्सही नित्याचेच वाटले. मध्यमवर्गीयांच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी सोडवणारे आणि त्यांचे जीवन अधिक सुखकर बनविण्यास मदत करणारे असे प्रदर्शनात जवळ-जवळ काहीही नव्हते. खिशात भरपूर पैसे आणि नेमकी दृष्टी असली की, आपले जीवन सुखकर बनविणे कुणालाही कठीण नाही. त्यासाठी अशा प्रकारच्या प्रदर्शनाची काही आवश्यकता असेल असे वाटत नाही.

# प्राचीन कलेचा जिवंत आविष्कार

---

अलीकडेच दिल्लीच्या रवींद्रभवनमध्ये चिनी हस्तकलेचे एक सुंदर प्रदर्शन भरले होते. ललितकला अॅकॅडमी, चिनी वकिलात आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद यांच्या सहयोगाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शन अगदी शेवटच्या दिवशी पाहण्याचा योग आला.

आम्ही रवींद्रभवनपाशी गेलो आणि भोवतालचे वातावरण पाहून स्तंभितच झालो. रवींद्रभवनच्या हिरवळीपासून गेटपर्यंत आणि मंडीहाउसच्या ट्रॅफिक आयलंडपर्यंत जिकडे-तिकडे पोलीसबंदोबस्त होता. गेटमधून आत शिरतानाच आम्हाला पोलिसांनी हटकले. 'अब एक्झिबिशन बंद है।' पोलिसाने सरळ सांगितले. 'क्यों बंद है? दोपहर २ बजे से रात ८ बजेतक खुला होता हैं' मी त्याला माहिती पुरविली. वास्तविक कोणी तरी हायर अॅथॉरिटी प्रदर्शनाला येणार आहे हे आम्ही ओळखले होते. 'पी. एम. आनेवाली हैं?' मी विचारले. 'हाँ' पोलिसाचे तुटक उत्तर. 'कितने बजे आयेंगी?' मी पुन्हा विचारले.. 'देखिये जी, कितने बजे आयेंगी, कब आयेंगी ये सब हमें पूछना नहीं। हमें कुछ पता नही। आप थोडी देर पार्क मे बैठिये, बादमें आ जाइये।' त्या सिक्युरिटीच्या पोलिसाने प्रदर्शन पाहण्याचा आमचा दृढ निर्धार पाहून मार्ग सुचविला.

पंतप्रधान आत गेल्यावर रवींद्रभवनच्याच हिरवळीवर बसून आम्ही त्यांच्या जाण्याची वाट पाहू लागलो. प्रदर्शनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे पुन्हा केव्हा तरी येणेही शक्य नव्हते. 'वर्थ सिइंग' 'वन्स इन ए लाइफ' अशा प्रदर्शनाविषयीच्या प्रतिक्रिया प्रदर्शन पाहण्याची इच्छा अधिक तीव्र बनवीत होत्या. तब्बल दीड तास आम्ही आणि आमच्यासारखे अनेक जण ताटकळत बाहेर बसून होतो. मनात विचार आला की, संध्याकाळी अमुक वेळी प्रदर्शन बंद राहील असे त्यांनी अगोदर जाहीर का केले नाही? पण 'का' कसे असे प्रश्न इथे निष्फळ असतात हे मी लगेच मनाला पटवून दिले.

इंदिरा गांधी प्रदर्शन पाहून गेल्या आणि उरलेल्या वेळात प्रदर्शन पाहून घेण्यासाठी आम्ही घाईघाईने आत शिरलो. भरतकाम, कोरीवकाम, शिल्पकला यांचे एकाहून एक सुंदर नमुने नजर खेचून घेत होते. हस्तीदंतावरील कोरीव कामात ग्वांगडॉंग येथील एक नमुना उत्कृष्ट होता. झाडाप्रमाणे उभट आकाराच्या या नमुन्यात पायथ्याशी निरनिराळ्या पोशाखातील मनुष्याकृती आणि त्याच्या वरच्या टोकाला एकात एक फिरते चेंडू होते. एखादी मौल्यवान वस्तू ठेवायला याचा पेटीप्रमाणे उपयोग करता येतो ही कलाकृती अगदी नाविन्यपूर्ण वाटली. जेड कार्व्हिंग अथवा मरगजावरील कोरीव कामात शाधाय येथील व्हेज हा चिनी हस्तकलेचा एक अप्रतिम नमुना होता. फिकट जांभळी छटा असलेल्या मौल्यवान, काचेसारख्या दगडात कोरलेल्या उभट भांड्याला त्याच दगडात कोरलेली साखळी आणि खाली नक्षीदार काळसर लाकडी स्टॅंड जोडलेला होता. मरगजाच्या नैसर्गिक रंगांचा आणि आकारांचा कलात्मक उपयोग करून घेऊन हे कोरीव काम केले जाते. निरनिराळ्या आकृत्या, पक्षी, प्राणी, फुले, जार, नेकलेस आणि इतर दागिने हेही या जेडमधून कोरले जातात. स्टोन कार्व्हिंग अथवा प्रवाळातील कोरीव काम हेही चीनमध्ये फार पुरातन काळापासून केले जाते. झीजियांग इलाख्यातील निरनिराळ्या प्रकारची लॅंडस्केप्स, फुले, पक्षी यांचे स्टोन कार्व्हिंग आणि फुजियान इलाख्यातील प्राणी, फुले, फळे, शिल्प यांचे स्टोन कार्व्हिंग विशेष प्रसिद्ध मानले जाते. क्विंगटियान आणि झीजियांग येथील स्टोन कार्व्हिंगचा असाच एक अत्युत्कृष्ट नमुना या प्रदर्शनात पहायला मिळाला. निळसर आणि पिवळसर छटा असलेल्या दगडात कोरलेले द्राक्षांचे घोस, त्यांची पाने आणि त्याला दिलेले काचेसारखे चकचकीत फिनिशिंग खऱ्या द्राक्षाचा रसरशीतपणासुद्धा हुबेहुब निर्माण करणारे होते, त्याखालील लाकडाचा कोरीव स्टॅंडही फारच शोभिवंत होता.

### थक्क करणारी कला

याशिवाय लाकडावरील कोरीव काम, रंगवलेल्या प्लास्टरच्या किंवा मातीच्या निरनिराळ्या आकृत्या यांचेही अनेक नमुने प्रेक्षणीय होते. जिंगडेझेन येथील निळी आणि शुभ्र चिनी मातीची चमकदार भांडी, हुआन इलाख्यातील लीलिंग येथील आतून चमकणारी प्रोसलेन्स, यिक्झिंग येथील लाल दगडाची भांडी, शिवान येथील पॉटरी स्कल्पचर, पेंगचेंग येथील नक्षीकाम केलेली रंगीत चमकदार भांडी वगैरे प्रकारच्या सिरॅमिक्सची पॉटरीज संपूर्ण चीनमध्ये लोकप्रिय आहेत.

भरतकाम ही चीनमधील पुरातन पारं-

पारिक कला आहे. सुझाऊ, हुनान, ग्वांगडंग आणि सिच्युआन या ठिकाणी भरतकामाच्या चार प्रमुख शाळा आहेत. टाक्याचे विविध प्रकार आणि त्यांचा अनेक पटीनी केलेला वापर किती सुरेख परिणाम साधू शकतो हे येथे पहावयास मिळाले. कापडाच्या दोन्ही बाजूना एकच डिझाइन दाखविणारे दोन्ही बाजूनी केलेले भरतकाम तर एक अमूल्य निर्मिती मानली जाते. अशा भरतकामाचेही अनेक नमुने तेथे ठेवलेले होते. विशेषत: शुभ्र चमकत्या नाजूक धाग्यांनी भरलेले माजराचे पिलू आणि तशाच शुभ्र धाग्यात भरलेली 'गॉडेस ऑफ मर्सी' ( दयेची देवता ) हे दोन नमुने फारच आकर्षक वाटले.

तिऑनजिन, बीजिंग, शांघाय, मंगोलिया, झिंगजियान येथील टॅपेस्ट्री आणि कार्पेटस त्यांच्या उत्कृष्ट दर्जासाठी आणि देखणेपणासाठी प्रसिद्ध आहेत. वुलन टॅपेस्ट्रीचे वैशिष्टय म्हणजे ती रंगाच्या विविधतेने नटलेली आणि अत्यंत कलात्मक असतात. याचा नमुना म्हणून हुआ येथील धबधबा, डिअर गार्डन आणि चीनची सुप्रसिद्ध भिंत याची मनोहर दृश्ये ५'×३' इतक्या आकारात उठावदार रंगाच्या लोकरीने भरलेली पहावयास मिळाली. याव्यतिरिक्त लाखेची भांडी, वेत, बाबू, गवत यापासून केलेले बास्केटस, ट्रे, चटया, बॉक्सेस, हॅंडबॅग्ज आणि हॅट्स, मातीची भांडी याचे सुंदर नमुने चीनच्या विकसित कलेची साक्ष पटविणारे होते. सागरतळी सापडणारे निरनिराळ्या प्रकारचे दगड, पोर्सलीन किंवा सग-ए-शब ( रात्रीचा दगड ) माती, शिंपले, लाख, विणकाम, भरतकाम इत्यादी विविध माध्यमातून चिनी लोकानी निर्माण केलेली अप्रतिम कलाकृती पाहून मन थक्क होऊन गेले.

या सर्व कलाकृतीचे वैशिष्टय म्हणजे त्यातील सूक्ष्म बारकावे, आत्यंतिक परिश्रम आणि माध्यमाची विभिन्नता आज कोणीही आधुनिक कलाकार अशी कलात्मक सूक्ष्मता दाखवू शकत नाही. ५-६ हजार वर्षांपूर्वीच्या या चिनी कलेची परंपरा आजही चीनमध्ये जिवंत राखली आहे व तिच्या विकासाची प्रयत्नपूर्वक जोपासना केली जात आहे, याचे सर्वांत कौतुक वाटले. वास्तविक चिनी हस्तकला आणि शिल्पकला यांचा इतिहास ग्रीस किंवा भारताइतकाच प्राचीन आहे. तथापि १९४९ मध्ये चीनमध्ये पीपल्स रिपब्लिकची स्थापना झाल्यानंतर सरकारने स्वत: या कलेच्या भरभराटीकडे लक्ष पुरविले. या कलांच्या समृद्धीसाठी अनेक शाळा आणि अॅकॅडमीज स्थापन केल्या. अनेक संस्था आणि कृतिशाळा निघाल्या. आज या प्राचीन कलेने पारंपरिक लोककलांचा सामुदायिक रूपात विकास घडवून आणला. जुन्या परंपरेच्या वारसा राखून नवनवीन कल्पनाच्या सहाय्याने अत्यंत वेगाने प्रगती साधली आणि भरभराटीचा उच्च टप्पा गाठला. इतकेच नव्हे तर या कलात्मक वस्तूसाठी त्यानी पश्चिम यूरोपमध्ये मोठी बाजारपेठही मिळवली आहे.

एके काळी आपल्याकडील ढाक्याची मलमल सूक्ष्म, कलात्मक कारागिरीसाठी जगात प्रसिद्ध होती; परंतु आज तांत्रिक विकास आणि आधुनिकतेच्या नावाखाली आपल्याकडील ही कला लुप्त होत चालली आहे. शिल्प, काष्ठशिल्प आणि धातूवरील कोरीव काम यासारख्या कलेचेही रक्षण आपण करू शकत नाही याचा हे प्रदर्शन पाहिल्यावर खरोखर तीव्र विषाद वाटला. आज भारताच्या समृद्ध कलेचे आणि परंपरेचे नमुने फक्त संग्रहालयातच पहायला मिळतात. तर चीनची कला जगभर आकर्षणाचे जागते केंद्र बनून राहिली आहे. सर्वांत आश्चर्य वाटले ते याचे की हे प्रदर्शन म्हणजे चीनच्या दुय्यम दर्जाच्या कलाकृतीचे प्रदर्शन होते. मग तिथल्या पहिल्या दर्जाच्या कलाकृती किती अप्रतिम असतील याची कल्पना करणेही कठीणच.

—ललिता मिरजकर


# अशांत पार्श्वभूमीवर 'आदि शंकराचार्य'

८ जूनपासून 'चाणक्य' आणि 'शीला' या दोन चित्रपटगृहात सुरू होणाऱ्या ३१ व्या राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवाचा कार्यक्रम वर्तमानपत्रात तपशीलवार छापून आला आणि कोणकोणत्या चित्रपटांना जायचे, याचा विचार सुरू झाला. 'आपण सगळेच चित्रपट पाहू या' हे आरंभीचे घोषवाक्य निरर्थक आहे, हे लगेच लक्षात आले. कारण रोज १२-३०, ३-३०, ६-३० आणि ९-३० असे चार चित्रपट पाहणे शक्यतेच्या कोटीतले नव्हते. मग 'निदान रोज एक चित्रपट पाहू', 'एक दिवसाआड पाहू' अशी उतरती भांजणी सुरू झाली, ती 'आदि शंकराचार्य,' 'खडहर' 'सूखा' आणि 'माया मिरिगा' एवढे तरी पहायचेच' या स्टेशनवर थोडा वेळ थाबून 'काय वाट्टेल ते झाले तरी 'आदि शकराचार्य' पहायचाच' या निर्धारावर येऊन थबकली.

या सगळ्या सुपरफास्ट प्रवासाचे कारण म्हणजे राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवाचे आकर्षण आणि दिल्लीमधली एकंदर परिस्थिती यांचा परस्परांना पक्का काटशह बसलेला होता. राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात नेहमीच वेगवेगळ्या भाषांतील चित्रपटाचे विविधतापूर्ण नमुने पहायला मिळतात. सगळेच पारितोषिक-विजेते चित्रपट असल्यामुळे सर्व भाषातील चित्रपटसृष्टीचे हे खास वेचक नमुने असतात. नवनव्या प्रयोगाची ओळख होते. समर्थ कथावस्तू, वेधक अभिनय, मनोहर छायाचित्रण याचे विविध रचनाबंध न्याहाळता येतात आणि यातले कित्येक प्रादेशिक भाषातील चित्रपट तर पुन्हा पहायला मिळण्याची सुतराम शक्यता नसते. त्यामुळे राष्ट्रीय चित्रपट-महोत्सव म्हणजे एक न चुकवण्यासारखी पर्वणीच असते. 'शापित', 'कथा', 'अर्थ' हे चित्रपट गेल्या वर्षी असेच राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात धडपडून पाहिले होते.

भारतामध्ये चित्रपट हे सर्वांत लोकप्रिय कलामाध्यम आहे. या कलामाध्यमाने अक्षरश: वेडावलेले जितके शौकिन एकट्या भारतात आहेत तितके दुसऱ्या कुठल्याही कलामाध्यमाच्या बाबतीत सबंध जगातही

पृष्ठ २७ वर



# एलेनी

क्रांतिसेना लिया गावात आली आणि त्यांचा धुमाकूळ सुरू झाला.

एलेनीनं ओल्गा आणि कांताला तोंडावर काळा रुमाल बांधायची सक्ती केली.

थोड्याच दिवसांत क्रांतिकारकांची महिला सेना गावात दाखल झाली. १४।१५ वर्षांच्या सेनेतल्या बालिश मुलींना पाहून एलेनीच्या पोटात धस्स झालं ! आपल्याही मुलींना असं जबरदस्तीनं ओढून नेलं तर ?

एलेनी विचार करत होती—कम्युनिस्टांना शरण जाऊन आपण काय मिळवलं ?

आता संधी साधलीच पाहिजे !

सगळा उत्पात घडण्यापूर्वीच मुलांना घेऊन या व्याप्त प्रदेशातून निसटलं पाहिजे.

पळून जायचं धाडस केलंच पाहिजे ! जायचं तर सर्वांनी मिळून निसटायचं; पण कसं ?

☐

मूळ लेखक : निकोलस गेग
अनुवाद : सुधा नरवणे
भाग : चार

एलेनी आता सर्व कुटुंबासह आपल्या वडिलांच्या घरी राहू लागली. कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या भीतीनं ते केव्हाच गाव सोडून पळून गेले होते. क्रांतिसैनिकांनी एलेनीचं घर ताब्यात घेऊन तिथं पोलीस-ठाणं उभारलं होतं. तिनं आपल्या मुलाना—विशेषतः—निकोलाला त्या घराकड फिरकायचं नाही अशी सक्त ताकीद दिली होती. त्या घरातील तळघरं म्हणजे छळ करण्याची जागा आणि अंगणात थडगीच थडगी !

दुपारच्या वेळी घरातली सगळी मंडळी वामकुक्षी करायला लागली की, निकोला बाहेर भटकायला जायचा. सध्याच्या घराजवळच एक शेत होतं. त्या शेतात आडोशाला तावडच्या मातीत उताणं पडून निजायला त्याला फार आवडायच. हे वातावरण विश्रब्ध वाटायचं. जे आवाज यायचे ते गावातल्या दैनंदिन जीवनातले—गुरांचं हंबरणं, एखाद्या कोंबडयाची उच्च आवाजातली बांग आणि डोंगराच्या उताराावर चरणाऱ्या शेळयामेंढयांच्या गळयांतल्या घंटांचा नाद—

आपलं घर सोडून दुसरीकड राहायला जाव लागणं हाच त्याच्या बालजीवनातला मोठा आघात होता. त्याच्या या आठ वर्षांच्या आयुष्यात बाँब, सैन्याच आक्रमण, कुणी तरी कुणाला तरी ठार मारणं आणि दुष्काळ हेच विषय वारंवार येत. तरीसुद्धा रोज त्याच परिचित चार भिंतीच्या आत रहाणं, जेवणं—झोपणं आणि त्याच परिचित वातावरणात दुसरा दिवस उजाडलेला पाहणं हा त्याचा दिनक्रम होता. आता आजोबांच्या घरी येऊन राहल्यानं त्या परिचित वातावरणाशी त्याची फारकत झाली. पुढच्या आयुष्यात ग्रीसमधून अमेरिकेत गेल्यावरसुद्धा त्याच्यावर इतका परिणाम झाला नाही.

—शेतात पडून निकोला हळूहळू निद्राधीन होत होता. मधूनच त्याला घोडयांच्या टापाचे आवाज ऐकू आले. कुणी तरी दोन व्यक्ती आपल्याच दिशेन येताहेत असं त्याला दिसल. एकाला त्यानं ओळखलं—तो होता सॉटिरिस ड्रेपेटिस—यानंच आम्हाला आमच्या घरातून हुसकून लावलं. होतं.दुसरा होता कुणी अनोळखी माणूस. ड्रेपेटिस त्याच्याशी ज्या आदरानं बोलत होता आणि ज्या तन्हेनं त्याचं बोलणं ऐकून घेत होता त्यावरून तो दुसरा मनुष्य कुणी बडा असावा हे तेव्हाच कळून येत होतं.

क्रांतिसेनेतले बहुसख्य सैनिक मूळचे लियातले आणि आसपासच्या खेडयातले होते. डाव्या विचारसरणीचे तरुण होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्या सर्वांनी प्रथम एकत्र येऊन जर्मन आणि इटालियन लोकाविरुद्ध उठाव केला. आता त्यांची सघटना बनली होती. ग्रीसची लोकशाही सेना—Democratic Army of Greece—DAG असं नाव त्यांनी घेतलं होतं. त्यांच्यावर ग्रीक कम्युनिस्ट पक्षाचं सपूर्ण नियत्रण होत—

—तो बडा मनुष्य सॉटिरिसला झापत होता. '—फक्त बारा मुल लिया गावातून मिळतात याचा अर्थ काय ? या कार्यक्रमाला यश मिळणं अत्यंत महत्त्वाचं आहे हे तुमच्या कसं लक्षात येत नाही ? पक्षनेत्यानी या कार्यक्रमाला स्वत.ला वाहून घेतलंय एवढंच नव्हे तर जनतेच्या लोकशाहीची प्रतिष्ठा इथं पणाला लागलीय — कळत नाही ?'

—मुलांना गोळा करून, ताब्यात घेऊन दुसऱ्या देशात पाठवण्याविषयी तो अधिकारी बोलत होता. क्रांतिसैनिक जेव्हा प्रथम गावात आले तेव्हा ते गावकऱ्यांच्या अन्नपाण्यात वाटेकरी झाले. नंतर घरात चंचुप्रवेश केला अन् तिथंच ते ठाण माडून बसले. मग कुटुंबातल्या तरुण मुलामुलींना सैन्यात भरती करून घ्यायला लागले—

—आता सक्रांत आली छोटया मुलामुलींवर. तीन वर्षांच्या मुलापासून ते थेट चौदा वर्षांपर्यंतची मुल ताब्यात घेऊन ती कम्युनिस्ट देशात पालनपोषणासाठी पाठवण्याची योजना कुणाच्या तरी डोक्यात शिजली.

—याच योजनेबद्दल ती दोघं बोलत होती.—निकोला लपूनछपून त्यांच बोलणं ऐकत होता.

सॉटिरिस मवाळपणे सांगत होता, 'आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले. किती तरी आमिषं दाखवली—अन्नधान्याची लालूच देखील दाखवली; पण काय सागू ? या खेडवळ अडाणी बायका—अगदी बुडायची वेळ आली न् नाकातोंडात पाणी जायला लागलं तरी आपल्या मुलाना सोडणार नाहीत !—

'—त्या काय करतील किंवा करणार नाहीत हा प्रश्न नाही ! आपण त्याना काय करायला लावायचं हा मुख्य मुद्दा आहे त्या सुखासुखी मुलाना सोडणार नसतील तर तुम्हाला त्याच्यावर सक्ती करावी लागेल. कशी करायची हे तुमच तुम्ही पहा !—'

त्या अधिकाऱ्याचे हे शब्द ऐकून निकोलाच्या छातीत धडकी भरली. रात्रंदिवस भेडसावणारी भीती खरीच ठरणार तर !

...घोडयांच्या टापाचे आवाज दूर गेले. निकोलान घराकडे धूम ठोकली. पायाखालची धूळ जोरात वर उडत होती. घरापाशी पोचताच त्यानं हुंदके द्यायला सुरुवात केली. 'ममा... ममा ग !' त्यानं आईच्या अंगावर झेपच घेतली. एलेनीन चमकून त्याच्याकडं पाहिल. 'काय झालं ?' ममीला घट्ट मिठी मारत तो म्हणाला, 'ममा, ते मला जबरदस्तीन घेऊन जाणार आहेत—'

'कोण ते ? कुणी सागितल तुला ?'

त्यान सगळी हकिगत आपल्या आईला सागितली... त्या एका प्रसगानं एलेनीच्या कुटुंबाच आयुष्य आमूलाग्र बदलून गेलं.

तिनं मुलाला शांत केलं. एकीकडे त्याची समजूत घालत असता तिच्या हृदयात वादळ उठलं होतं. तिला क्रांतिसैनिकांशी मुळीच सघर्ष नको होता. होता होईल तो ती त्यांच्याशी मिळतजुळत घेण्याचा प्रयत्न करीत होती; पण आता ती आणि तिचं कुटुंब अशा टप्प्यापाशी येऊन पोचलं होत की झगडा अटळ होता. आता आपल कुटुंब उध्वस्त होणार, देशोधडीला लागणार हे जाणवताच ती कमालीची अस्वस्थ झाली.

एलेनी... एक्केचाळीस वर्षांची खेडयात राहणारी एक सामान्य स्त्री, कायदे पाळणारी, पापभीरु. त्या पहाडी प्रदेशातले लोकधर्म, शकुनापशकुन यानी तिचं जीवन व्यापलेलं होत. त्यानुसार ती वागत होती. तिचा नवरा ख्रिस्तोस मायदेश सोडून अमेरिकेत स्थायिक व्हायला गेलेला होता—जिवाचा सखा साता समुद्रापलीकडे— त्या देशाची माहिती नाही. तरी क्रांतिसैनिक

अमेरिकन म्हणून हिणवताहेत. तिच्याबद्दल ते आकस बाळगून होते.

इकडच्या परिस्थितीचं सम्यक ज्ञान तिला झालं. सर्व परिस्थितीचं वर्णन तिनं नवऱ्याला पत्रातून लिहिलं. विचारलं, 'मी काय करू ते तू सांग–'

'आणि त्यानं कळवलं, 'तू तिथंच रहा मुलासह–'

त्या पतिपरायण स्त्रीनं नवऱ्याचा सल्ला मानला. त्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. पण आता जसजशा नव्या गोष्टी कानावर यायला लागल्या तेव्हा तिला कळून चुकलं की आता स्वस्थ बसून चालणार नाही. कुटुंबाला वाचवायचं असेल तर क्रांतिसैनिकांची अवज्ञा केलीच पाहिजे.

मुलांसकट लिया गावाबाहेर पडायचं म्हणजे काही साधीसुधी गोष्ट नव्हती. क्रांतिसैनिकांचा पहारा चुकवत चुकवत जायचं म्हणजे महाकर्मकठीण काम होतं. हे एक वेळ साध्य झालं तरी जमिनीत पुरलेल्या सुरुगाचं काय ? ते कसे चुकवायचे ? अनवधानानं त्यांच्यावर पाय पडला तर सगळंच खलास होणार.. या पलायनासाठी कुणा तरी पुरुष माणसाची गरज होती. तिला आठवण झाली ल्यूकस क्षियारासची–

ल्यूकस आपल्या कुटुंबासह चर्चमध्ये राहायचा. हे चर्च जर्मनांनी १९४४ मध्ये जमीनदोस्त केलं होतं. आता तिथं क्रांतिसैनिकांनी आपलं ठाणं उभारलं होतं. तिथूनच ते रात्री हल्ला करणारी पथक पाठवीत. ल्यूकसला पुष्कळ गोष्टींची आपोआपच माहिती झाली असेल. सुरुग नेमके कुठं पेरलेत... क्रांतिसैनिकांच्या हालचालींचे मार्ग .. त्यांची कार्यपद्धती... सगळं त्याला माहीत पडलं असेल... सहज म्हणून त्याच्याशी गप्पा उकरून काढायच्या... रात्री सैनिकाची तुकडी कोणत्या दिशेनं जाणार याची माहिती तो काढू शकेल. त्यालाच गाठावं...

हा निर्धार विरघळून जाण्याआधी एलेनी त्याच्याकडे गेली. घरी परतल्यावर तिनं कुटुंबातल्या सर्वांना जवळ बोलावलं... आपला बेत समजावून सांगितला... कुणीच हरकत घेतली नाही... शंकाकुशंका काढल्या नाहीत... खोडा घालायचा प्रयत्न केला नाही. निकोला तर फारच भांबावून गेला. उत्तेजित झाला. आईपासून जबरदस्तीनं दूर नेलं जाण्यापेक्षा क्रांतिसैनिकांच्या बंदुकीच्या फेरीतून निसटून पळणं बरं.. आईपासून दूर जाण्यापेक्षा धोक्याच असलं तरी पलायन बरं... त्यासाठी कसलंही साहस करण्याची त्याची तयारी होती.

ल्यूकसनं पलायनाचा बेत आखायला प्रारंभ केला. कृष्णपक्षातली रात्रच ठरवावी लागेल. शिवाय हवा चांगली हवी... मुहूर्तही चांगला हवा. दरम्यान सगळ्यांनी नेहमीसारखं राहायचं... रोजची कामं करायची. कुठल्याही कारणास्तव दिनक्रम बदलायचा नाही. एलेनीनं रोज शेतात जाऊन काम करीत राहायचं. जेव्हा दिवस ठरेल तेव्हा ल्यूकसच्या बायकोनं तिला येऊन सांगायचं...

...मग अंधार पडल्यावर एलेनीनं आपल्या घरातल्या मंडळींना जोडीजोडीनं वेगवेगळ्या रस्त्यांनी आपल्या वडिलांच्या गिरणीकडं पाठवायचं. ती गिरणी आता उध्वस्त अवस्थेत होती. तिथल्या एका खोलीत सर्वांनी जमायचं. मग हळूच एका डोंगरकपारीतून निसटायचं... घळीतून वाट काढत लपतछपत पलीकडच्या प्रदेशात जायचं... जिथं सरकारी सैन्याची सत्ता होती तिथं मुक्त वातावरणात जायचं...

सगळा बेत ठरला. सर्वांच्या मनावर एक विलक्षण ताण साचला. दिवस जाता जाईनात. रोज उजाडल्यावर असं वाटायचं की आजची रात्र तर पलायनाची रात्र नसेल ? शेतात काम करण्यात मन लागेना. असं वाटायचं करायचय् काय पिकाची मशागत करून ? मळणीच्या वेळी आपण इथं थोडेच असणार ? तरीही एलेनी खाली मान घालून एकाग्रतेनं पिकाची मशागत करी. काम करता करता मनाशी पुनःपुनः आपल्या बेताची उजळणी करी. कोणते धोके येणं शक्य आहे ? कसले कसले घोटाळे संभवतील ? सगळं ती पुन.पुनः आठवून बघे. आई मेगाली वृद्ध आणि बहीण निस्सा गर्भवती–पळून जाण्याची वेळ आली की या दोघींमुळं निश्चित गडबड उडणार... पोराटोरांपेक्षा याच दोघी जास्त धोकादायक !

...आठ दिवस लोटले. एक दिवस ल्यूकसची बायको साऊला एलेनीकडे आली. दोघी शेतात काम करण्याचा बहाणा करीत होत्या. खाली मान घालून खुरपणी करताना साऊला कुजबुजली, 'आज रात्री हं...अंधार पडल्यावर लगेच...

...इतके दिवस याच निरोपाची प्रतीक्षा केली...आला तो क्षण...एलेनी गोंधळून गेली...कशी तयारी करायची तिला कळेना. तिनं मुलांना आगच बजावून ठेवलं होतं की बरोबर काही घ्यायचं नाही. अंगावरच्या कपड्यानिशी बाहेर पडायचं. एकोणीस वर्षांची ओल्गा अंगात एकावर एक कपडे घालायला लागली. ते पाहून कांता तिला चिडवू लागली, '...एखाद्या गुबगुबीत बाहुलीसारखी दिसतेय्स तू !'

निस्सा सपाकघरात खुडबुडत होती. दिसेल ते खात सुटली. 'कशाला हे चांगलंचुंगलं वाया घालवायचं ?...मी एकटीसाठी नाही खात.. हे पोटातलं बाळ आहे ना... त्याच्यासाठी सुद्धा खातेय् मी...'

दहा वर्षांच्या फॉन्टिनीनं आपला सगळा खेळ जमा केला. एक मोठी पिशवी घेऊन त्यात तो भरला.

म्हातारी मेगाली एका कोपऱ्यात विव्हळत बसली. 'मला नका नेऊ तुमच्याबरोबर मी ही अशी म्हातारी–कुठवर फरफटत येऊ तुमच्याबरोबर ?...'

अंधार पडताच एलेनीनं निस्सा, मेगाली आणि ग्लायकेरिया या तिघांना एका दिशेनं पाठवलं. ओल्गा थोड्या वेळानं बाहेर पडणार होती. त्या तिघी बाहेर पडल्यावर ओल्गानं मनातल्या मनात शंभर अंक मोजले. मग कांताला आणि फॉन्टिनीला निघायला सांगितलं...थोड्या वेळानं ओल्गा बाहेर पडली.

सर्वांत शेवटी एलेनी स्वतः निकोलाचा हात धरून बाहेर पडली. त्या जुन्या पिठाच्या गिरणीत सगळे एकत्र जमले. ल्यूकसनं त्यांना कुजबुजत्या आवाजात पुनः एकदा सगळा बेत समजावून सांगितला. प्रवासाचा पहिला टप्पा अतिशय धोक्याचा होता. या भागात ठिकठिकाणी पोलीसठाणी होती. हा टापू क्रांतिसैनिकांच्या दृष्टीतल्या टप्प्यात होता. एकदा डोंगर उतरून खाली उतरलं की गस्त घालणाऱ्या फिरत्या पथकांची आणि सुरुंगांची भीती ! एलेनीची मुलगी कांता आणि ल्यूकसची मारिआंथा या दोघींनी पुढं जायचं ठरलं. त्या दोघी महिला

क्रांतिसेनेत होत्या त्या वेळचा थोडाबहुत अनुभव आता कामी येईल ही आशा !

नंतर ल्यूकसच्या नेतृत्वाखाली सगळेजण बाहेर पडले. एकामागोमाग एक असे रांगेनं चालू लागले. ती रात्र अंधारी होती, हवेत गारठा होता. घळीतून खाली उतरताच वाऱ्याचा मोठा झोत तोंडावर आला. साऊलाच्या बरोबर तिचा दोन वर्षांचा मुलगा अॅलेक्सी होता. त्याला कपड्यात गुंडाळून त्याचं एक गाठोडं करून तिनं ते पाठीवर घेतलं होतं. तोंडावर वारं लागताच तो जागा झाला आणि मोठ्यानं रडायला लागला.

एलेनी लगबगीनं साऊलाजवळ गेली. तिनं गाठोड्यातून त्या पोराला उचललं आणि खांद्यावर टाकलं. आता तरी याचं ओरडणं बंद होईल ! पण छे, तो अधिकच जोरात किंचाळायला लागला. साऊलानं पुन: त्याला आपल्याशी घेतलं आणि त्याला पाजायला लागली. तोंड बंद करायचा हमखास उपाय; पण ते एवढंसं पोरटं मुळी ऐकेना. त्याचं ओरडणं कमी होईना. उलट वाढायलाच लागलं !

ल्यूकस झपाट्यानं बायकोपाशी आला. त्याच्या चेहऱ्यावर भयानक भाव दिसत होते.

'अग, स्वस्थ काय उभी राहिलीस ? तोंडावर हात तरी ठेव त्याच्या–' तिनं घाबरून त्याच्या तोंडावर हात ठेवला तर अॅलेक्सीचा आवाज एकदम बंद झाला. सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. सगळे मनातून घाबरून गेले होते. याचं रडणं क्रांतिसैनिकांनी ऐकलं की काय ? आता झुडपामागून आपल्यावर झडप घालणार काय ?

अॅलेक्सी हातपाय झाडायला लागला... हातपाय शिथिल झाले आणि चेहरा काळा–निळा पडला...

साऊला कळवळून म्हणाली... 'बघा हो, हा कसं करतोय ?...माझं बाळ मरेल ना... कसं याचं तोंड बंद ठेवायचं ? ...'

तिनं त्याच्या तोंडावरचा हात काढला. एक क्षण तसाच गेला. सर्वांनी आपले श्वास रोखून धरले होते. तेवढ्यात अॅलेक्सीनं भोकाड पसरलं... पहिल्यापेक्षा जोरदार–

'चला–चला परत गिरणीकडं...' ल्यूकसची घाबरून हवेलंडी उडाली...



त्या घळीतून पुन: ते सगळेजण वर चढून आले. ल्यूकसचा राग अनावर झाला. 'आण त्या कार्टाला इकडं–गळाच दाबतो त्याचा!' त्याच्या चेहऱ्यावरचे क्रूर भाव पाहून सगळे दचकले. एक पाऊल मागं सरकले; पण साऊलानं बाळाला घट्ट उराशी धरलं. इतके दिवस प्रेमळ स्वभावाचा असलेला आपला नवरा... बाळाचा पिता... प्रत्यक्ष मुलाचा गळा घोटायला निघाला... किती भयंकर ! किती अमानुष...

एलेनीनं त्याचा हात धरला. 'काय करतोयस् तू हे ! जाऊ दे– आजचा दिवस वाया गेला असं समजू– चला परत जाऊ घरी. आता दोन–तीन दिवस जाऊ देत. पुन: ठरवू हा बेत– तेव्हा त्याला थोडी अफू देऊ म्हणजे तो शांत राहील... चला परतू या !–'

... दुसऱ्या खेपेला निकोला पहिल्यापेक्षा जास्त घाबरला होता. भीतीनं गारठून गेला होता. पहिल्या खेपेच्या सगळ्या घटना आठवायला लागल्या. आजीचं विव्हळणं, अॅलेक्सीचं किंचाळणं, इतरांची उडालेली गाळण. एकेक क्षण भीतीचा गोळा बनून त्याच्या छातीवर धोंडा बनून राहिला.

या वेळी हवा बदलली होती. अधिक थंड, अधिक बोचरी... डोंगरमाथ्यावरून धुकं खाली घसरत होतं. त्यानं आईचा हात घट्ट धरून ठेवला. पिठाच्या गिरणीशी पोचल्यावर ल्यूकस निराशेनं म्हणाला, 'मला नाही वाटत या धुक्यातून पलीकडं जाता येईलसं... पुन: परत फिरावं लागणार... लांबणीवरच पडतंय सगळं–'

ल्यूकसचे ते हताश शब्द आणि त्यातली पराभवाची भावना निकोलाला त्या लहान वयात सुद्धा जाणवली. त्याचा आवाज असा येत होता की, जणू तो परत फिरायला सांगतोय म्हणजे फाशीची शिक्षा सुनावतोय !

ल्यूकस म्हणत होता, 'एलेनी, आपण निसटून जावं असं देवाच्या मनात दिसत नाही. प्रत्येक वेळेला अडचणी...'

निकोला भीतीनं थरथरायला लागला. एलेनीला त्याचं थरथरणं जाणवलं. त्याला जवळ घेऊन ती शांतपणे म्हणाली, 'आज राहिलं तर राहू दे... पुढच्या खेपेस नक्कीच यश मिळेल...' आईचे आश्वासक शब्द ऐकून त्याची थरथर थांबली. त्याच्या आईवरच्या श्रद्धेला सीमा नव्हती.

दुसऱ्या दिवशी क्रांतिसेनेचा निरोप्या त्यांच्या दाराशी आला.

'तुमच्या घरातली एक बाई हवीय आम्हाला. वातसुनिया गावी पाठवायचीय– तिथं शेतात काम करायला हवीय... या गावातून चाळीस बायका पाहिजेत... आता तीन तासात सर्वांनी आमच्या मुख्य कचेरीत पोचायचंय....'

एलेनीनं कुटुंबाला एकत्र केलं. हा नवा निरोप समजावून सांगितला. सगळेजण एकमेकांच्या तोंडाकडं पाहू लागले. मेगाली वृद्ध– ती काय शेतात काम करणार ? आणि नित्सा गरोदर–तिचाही काही उपयोग नाही. ओल्गाला आणि कान्ताला

पाठवावं तर क्रांतिसैनिक शेतातलं सगळं काम संपल्यावर त्यांना महिलासेनेत भरती करतील...

पंधरा वर्षांची ग्लायकेरिया गोड आवाजात म्हणाली, 'मला पाठव ममी– मी जाते तिकडं... अन् तिकडून मी पळूनसुद्धा येईन एकटी...'

एवढीशी पोरगी... लहान चणीची... फारशी धष्टपुष्टही नाही... शेतात खपणं, श्रमाचं काम तिला झेपणार नव्हतं... क्रांतिसैनिक तिला परतच पाठवतील– 'शहाणी माझी बाळी ती... हे बघ एक लक्षात ठेव– आम्ही तुला घेतल्याशिवाय पळून जाणार नाही... !'

ग्लायकेरियाला एलेनीन फराळाचे पदार्थ बांधून दिले. त्यावर तीर्थ शिंपडलं. ग्लायकेरिया गेली आणि एलेनीच्या पोटात मोठा खड्डा पडला.

जूनच्या पहिल्या आठवड्यात मुलं गोळा करण्याच्या कार्यवाहीला जोर आला. काही मुलांचा एक गट ताब्यात घेण्यात येऊन त्यांना दूर नेलं गेलं. लौकरच दुसरा गट नेला– मग तिसरा... चौथा...

गावकऱ्यांना कळून चुकलं की, आपण कितीही विरोध केला तरी आपली मुलं आपल्यापासून हिसकावून घेतली जाणार... लिया गावात आता औषधालासुद्धा मूल उरणार नाही.

एक दिवस साऊला एलेनीकडं आला. ल्यूकसचा निरोप घेऊन आलो. निरोप असा होता की, आता ग्लायकेरिया परत येण्याची वाट पहाण्यात अर्थ नाही. आता लौकर निघालं पाहिजे. दोन–तीन दिवसात प्रस्थान ठेवलं पाहिजे. २० जून रविवार वद्य पक्ष आहे– तोच दिवस मुक्रर करू. पुढचे दोन दिवस एलेनी ग्लायकेरियाचा कसून शोध घेत बसली. तिचा काही पत्ताच लागेना. शनिवार उजाडला... क्रांतिसेनेकडून पुन: निरोप आला... 'आणखी एक बाई हवीय तुमच्या घरातून... शेतात काम करायला बायका कमी पडताहेत! ...'

निरोप सांगून तो निघून गेला. एलेनीनं दार लावलं आणि ती कोसळून खुर्चीत बसली. आता कुणाला पाठवायचं ? कुणाचा बळी द्यायचा ? आपणच जावं... आपण ग्लायकेरियाचा शोध घेऊ शकू... दोघी मिळून तिथून पळून येऊ शकू.

या संकटातून कोणत्याही प्रकारे सुटका नव्हती. ती ओल्गाला म्हणाली, 'मी जाते शेतावर... तू आता माझी जागा घे. वेळ आली की, तू ल्यूकसबरोबर जा ! –'

'नाही, नाही ममी ! तुझ्याशिवाय आम्ही जाणार नाही... आम्ही थांबू तू परत येईपर्यंत ! –'

'मग बसा जन्मभर इथंच– धिंदवडे निघतील सर्वांचे ! –'

एलेनीचा ठाम निश्चय झाला. तिनं ओल्गाला नीट समजावून सांगितलं... 'ऐक माझं .. तू सगळ्यांना घेऊन जा... ग्रीक सैन्याच्या प्रदेशात तुम्ही पोचलात ना म्हणजे एक शेकोटी पेटव... वात्सुनियाहून तो जाळ मला निश्चित दिसेल– माझं मन शांत होईल ! ...'

ओल्गानं मान डोलावली. शेवटचे काही क्षण एलेनीनं फॉटिनीची वेणी घालण्यात घालवले. तिनं पोरीला उराशी इतक्या जोरानं आवळलं की, ती घुसमटून गेली !

'काळजी करू नका हं ! मी ग्लायकेरियाला घेऊन नक्कीच निसटून येईन... मग आपण अमेरिकेला जाऊ ! –'

तिनं कांताला आणि निकोलाला क्रांतिसेनेच्या कार्यालयापर्यंत बोलावलं. शेवटच्या क्षणापर्यंत ती मुलं तिला आपल्याजवळ हवी होती. ओल्गानं आणि फॉटिनीनं आहे तिथंच रहायचं– काही वेगळं घडतय असं न दाखवता वागायचं.

एलेनी जायला निघाली तर ओल्गा पळत-पळत आली. रडतरडत म्हणाली, 'ममी, थांब– मला तुझा पापा घेऊ दे !' एलेनीचा गळा दाटून आला. डोळ्यांतून अश्रू दरदरून वाहायला लागले. ते ओल्गाला दिसू नयेत म्हणून एलेनीनं तोंड फिरवलं. ओल्गानं आईच्या गालावर ओठ टेकले. दोघींच्याही तोंडून एकही शब्द फुटेना !

एलेनी वरकरणी शांतपणे क्रांतिसेनेच्या मुख्य कार्यालयाकडे गेली. तिथं आवारात अनेक स्त्रिया जमल्या होत्या. त्या समुदायात आपली नणंद अलेक्सो आणि ल्यूकसची मुलगी मरिआथा झिआरिस या दोघींना पाहून एलेनी चकित झाली. अलेक्सोची मुलगी आरेते हिनं ल्यूकसबरोबर जायचं असं ठरलं होतं. एलेनीची आणि अलेक्सोची नजरानजर झाली. दोघींनाही एकमेकींच्या दृष्टीत भीती दिसली; पण क्रातिसैनिकांच्या भीतीनं त्या एकमेकींशी काहीच बोलल्या नाहीत. जेव्हा केव्हा पलायनाचा बेत पार पडेल... ते क्रातिसैनिकांच्या लक्षात येईल तेव्हा त्यांना कदाचित आपल्या कुजबुजीची आठवण होईल. पुन: सर्वांना धोका –नकोच ते –एकमेकींची मुळीच ओळख नसल्यासारख्या त्या दोघी गप्प बसल्या.

एलेनी पायऱ्यांवर बसली. निकोलाला मांडीवर घेतलं. त्याला छातीशी घट्ट धरावं, आंजारावं–गोंजारावं अशी अनावर ऊर्मी तिच्या हृदयात दाटून आली; पण तिनं स्वत:ला आवरलं. ती नुसतीच त्याच्याकडं एकटक बघत राहिली. त्याचं रूप मनात साठवून घेत होती. दृष्टीनं त्याला जणू पिऊन टाकत होती. त्याच्या कानाशी कुजबुजत ती त्याला समजावून सांगायला लागली; 'ऐकतोयस का ? उद्या रात्री...तू कांताचा हात धर...आणि शूरपणानं वाग...वागशील ना ?'

छोटा निकोला हो म्हणताच तिनं त्याला पुन: छातीशी धरलं.

'चला...चला...' क्रातिसैनिक ओरडायला लागले...'उठा, आता इथून निघायची वेळ झालीय ! .. '

सगळे जण डोंगराच्या दिशेनं चालायला लागले. माकोसच्या घरापर्यंत पोचल्यावर एलेनीच्या पायाखालची जमीनच सरकली... इथूनच निरोप द्यायचा होता. तिनं कांताला आणि निकोलाला पुन: एकदा जवळ घेतलं. निकोलाला रडू फुटलं होतं; पण ते बाहेर पडू न द्यायचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता.

'ममी, तू सांगितलंस ना...तसं शूरपणानं वागेन मी...'

'किती ग शहाणं बाळ ते ! ...'

...तिथल्या एका कपारीवर उभं राहून मी आणि कान्तानं ममीला त्यांच्याबरोबर जाताना पाहिलं. बायकांची ती रांग अगदी दृष्टीआड होईपर्यन्त आम्ही दोघं तिथं उभे राहिलो. एका घळीत ती रांग उतरली आणि पुन. थोड्याच वेळानं दुसऱ्या टेकडीच्या माथ्यावर ती आली. मुंग्यांच्या रांगेप्रमाणं दिसणाऱ्या त्या बायकांत अगदी शेवटी आमची ममी आहे, हे आम्हाला माहीत होतं, म्हणूनच केवळ आम्ही तिला ओळखू शकलो. हात उंचावून तिनं आम्हाला निरोप दिला...

आता मात्र ती पूर्णपणे नजरेच्या टप्प्याआड गेली!

...ममीचा चिरविरह होऊन आता आज अनेक वर्षं लोटली आहेत. मला आता तिचा चेहरामोहरा विशेष आठवत नाही. डोळे, केस, गालाची ठेवण काही म्हणता काही आठवत नाही. सगळं विसरून गेलोय मी; पण ते एकच दृश्य माझ्या स्मृतिपटलावर कायमचं ठसलंय...तिनं हात उंचावून आमचा निरोप घेणं. अजून ती मूर्ती डोळ्यांपुढं येते. पोटात गलबलतं...हृदयात कढ दाटतात.

...एलेनी गेल्यावर तिची मुलं सैरभैर झाली. अस्वस्थ होऊन पोरक्या पिल्लांप्रमाणं इकडंतिकडं करू लागली. पलायनाची तयारी करायची होतीच. ओल्गा आणि कान्ता आपल्या शेतात जाऊन गहूकापणीचा बहाणा करू लागल्या. रविवारी संध्याकाळी त्या लौकर घरी परतल्या. आपल्यावर पडलेल्या जबाबदारीनं ओल्गा बेचैन झाली. खिडकीशी उभं राहून ती सूर्यास्ताची वाट पहात होती. अंधार पडल्यावर, तिनं तिघा धाकट्या भावंडांना बाहेर पिटाळलं. कान्ता, फॉटिनी आणि निकोला एकमेकींचे हात धरून बाहेर पडले. घराच्या बाहेर पाऊल पडताच फॉटिनीला हुंदका फुटला. कान्ता त्यांना ओढून नेत होती. निकोला पुनःपुन: मागं वळून घराकडे पहात होता.

आता त्यांचं संकेतस्थान बदललं होतं. पिठाच्या गिरणीच्या ऐवजी आता ते ख्रियाराच्या घरी भेटणार होते. कान्ता भावंडांना घेऊन तिथं पोचली, तेव्हा कॅलिपो मिट्रोस आणि साऊला ख्रियारास बाळाच्या पाळण्याशी वाकून बाळाच्या तोंडात कडक दारू घालत होते. ल्यूकस बेचैन होऊन धूम्रपान करीत उभा होता. त्याच्याजवळ जाऊन कांतानं काहीशा रागानं विचारलं, 'हे काय करताहेत बाळाला?'...या लोकांना पलायनाचा बेत माहीत आहे की काय?

......ल्यूकस काहीच बोलला नाही. कांताची नजर चुकवीत सिगरेट विझवीत तो उठून गेला. तरी कांतानं त्याची पाठ सोडली नाही. 'हे काय? तुम्ही आमच्या ममीला वचन दिलं होतं की हा बेत गुप्त राहील म्हणून...!'

त्यानं नुसतेच खांदे उडवले. सूर्यास्तानंतर थोड्याच वेळात मेगाली आणि नित्सा आल्या. त्यांच्यामागोमाग आणखीही एक खेडूत स्त्री तिच्या दोघा भाच्यांसह आली. कांताच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. आपली ममी गेल्यावर ल्यूकसनं तमाम दुनियेला या बेताची कल्पना दिलेली दिसते! सर्वांत शेवटी ओल्गा आली, मग कॅलिपोचा नवरा तासो मिट्रोस आला. त्या एवढ्याशा खोलीत आता एकूण वीस जण झाले. नऊ मोठी माणसं आणि अकरा मुलं...

ल्यूकस सगळ्यांना पलायनाचा बेत समजावून सांगू लागला. मुलांनी आपण लपंडाव खेळतोय असा बहाणा करीत घराच्या खालच्या अंगाला असलेल्या गल्लीत जमायचं. मग जास्त हल्लाकल्ला न करता जवळच्या झाडझाडोऱ्यात शिरायचं. मुलं घरातून निघाल्यानंतर थोड्या वेळानं आयांनी बाहेर पडायचं आणि झुडुपात जाऊन मुलांना मिळायचं. सगळ्यात शेवटी ल्यूकसनं बाहेर पडायचं. तो सर्वांना खालच्या बाजूच्या गव्हाच्या शेतातून बाहेर पडल्यावर टेकडीच्या जवळ मोकळी जागा आहे. त्या जागेला लागून दाट झाडी आहे. त्या दाट झाडीचं त्यांना संरक्षण मिळणार होतं. '...जा रे पोरांनो, जा खेळायला– चला – साई सुट्टयो!...'

निकोलाच्या घशात आवंढा आला.

सगळेजण ठरलेल्या ठिकाणी पोचल्यावर ल्यूकसनं त्यांना पायातले बूट काढायला सांगितले....काडीचाही आवाज होता कामा नये... ज्या रस्त्यानं जायचं होतं तो रस्ता ल्यूकसनं याआधीच दिवसाउजेडी पाहून ठेवला होता. श्वास रोखून लपतछपत तो पुढं गेला. त्याच्यामागून बाकीचे. गव्हाच्या शेतात शिरल्यावर उभ्या पिकामध्ये लपत लपत पुढं जाणं शक्य होतं.

...याच वेळी तासो मिट्रोसच्या शेजाऱ्यानं सॉटिरिस ड्रेपेटिसजवळ चुगली केली की मिट्रोसचं घर अगदी रिकामं आहे; पण त्यांच्या बकऱ्या मात्र शेतात चरताहेत. ड्रेपेटिसनं लगेच शेताजवळच्या पोलीसठाण्यावर फोन लावला. पळून जाणाऱ्यांचा पाठलाग करण्याचे आदेश दोन तुकड्यांना दिले. या दोन्ही तुकड्यात पाच पाच माणसं होती.

...गव्हाच्या शेताच्या खालच्या बाजूला एक वैराण पायवाट होती. त्या पायवाटेनं झाडीत जायचं होतं. या वाटेवर नित्सा ठेचकाळली. एक दगड गडगडत खाली पडला. तो आवाज ऐकून तासो मिट्रोसला वाटलं की क्रांतिसैनिकच आपल्या मागावर आले. भोगाच्या आवाजात तो म्हणाला, 'पळा, पळा–'

मागचापुढचा काही विचार न करता सगळेजण वाट फुटेल तिकडे पळत सुटले. फक्त ओल्गा आणि कॅलिपो या दोघींच्याच लक्षात आलं नेमकं काय झालं ते. त्यांनी नित्साचा हात धरून तिला खेचून उभं केलं आणि ओढत ओढत त्या झाडीच्या दिशेनं जायला लागल्या. गर्भार नित्सा प्रत्येक पावलागणिक विव्हळत होती. कण्हत कुंथत कशीबशी पाय उचलत होती. त्या तिघी नेटानं पुढं गेल्या आणि झाडीत पोचल्यावर ओकवृक्षाच्या आडोशाला जाऊन दम खात उभ्या राहिल्या. भीतिग्रस्त मुद्रेनं त्यांनी एकमेकींकडे पाहिलं. बरोबरच्या इतर माणसांची अगदीच चाहूल येईना. झाडीत शिरल्यावर त्यांनी एक वाट घेतली तर ल्यूकस बाकीच्या माणसांना घेऊन दुसऱ्या वाटेनं गेला. चांगलीच चुकामूक! आता ते एकमेकांना हरवून बसले.

त्या तिघी इतस्ततः भटकत राहिल्या. आपण कुठं वाट चुकलो ते ओल्गाच्या लक्षात आलं. त्या वळणाशी येऊन तिनं दुसरी दिशा पकडली. नित्सा जोरात विव्हळली, 'माझ्यानं आता एक पाऊलही पुढं जववणार नाही. माझ्या पायाचे तुकडे पडतेत!...'

ओल्गानं आपल्या खिशातून आयडिन आणि बँडेजं काढली... ममीनं सांगितलं होतं या वस्तू जवळ ठेवायला... ओल्गानं नित्साच्या पायाला आयडीन लावलं. पट्टी बांधली. म्हणाली, 'हे बघ आता नेट धरून पुढं चल... नाही तर...नाही तर तुला एकटीलाच इथं रहावं लागेल. कशाकशाला तोंड द्यावं लागेल!...'

**पुढे चल. नाहीतर तुला एकटीलाच इथं रहावं लागेल. कशाकशाला तोंड द्यावं लागेल...**



ओल्गानं त्या दोघींसह पूर्वेची वाट धरली. बराच वेळ पायपिटी केल्यावर झाडांचा एक पुंजका दिसला. तिथं बसून ओल्गानं काही क्षण विचार केला. आपल्या मावशीला–नित्साला– तिनं आरामशीर जागी बसवलं.

... मघा नित्साच्या पायाला पट्टी बांधताना ओल्गा बँडेजचा एक छोटा तुकडा विसरतेपणी तिथंच सोडून आली. गस्त घालणाऱ्या क्रांतिसैनिकांच्या दृष्टीला तो तुकडा पडला. एक जण म्हणाला, 'हां... नक्कीच ते पळपुटे या दिशेनं गेले... चला आपण त्यांचा पाठलाग करू ! ...'

त्यांनी पश्चिमेची वाट धरली. ओल्गानं तर मार्ग बदलून पूर्वेचा रस्ता घेतला होता.

...झाडाच्या पुंजक्यात विसावा घेत असता ओल्गाला माणसांचा पायरव ऐकू आला. कॅलिपोच्या मदतीनं तिनं नित्साला झाडाच्या फांद्यांच्या बेचक्यात चढवलं. स्वतःही वर चढली. कॅलिपोनंही आसरा शोधला. झाडांच्या पर्णसंभारात त्या तिघींच्या आकृत्या झाकून गेल्या तरी त्या भीतीनं गारठल्या.

...ती माणसं जवळ आली... एकामागून एक बरेच जण झाडोऱ्यातून बाहेर आले. तासी मित्रोसचं टक्कल ओल्गानं तेव्हाच ओळखलं. कॅलिपोनंही ओळखलं. झाडावरून टुणकन् उडी मारून ती खाली आली. आपल्या माणसांच्या मिठीत ती क्षणकाल देहभान विसरली. ओल्गालाही तिच्या बहिणी भेटल्या. एकमेकींना आलिंगन देताना नवा धीर मिळाला. निकोला थरथर कापत होता. शीण, कमालीचा थकवा... त्याला उभं रहावत नव्हतं. पायांतले बूट केव्हाच हरवून गेले होते आणि इतक्या कठीण वाटचालीमुळं पाय रक्तबंबाळ झाले होते; पण त्यानं तोंडातून ब्र काढला नाही. ममीनं काय सांगितलंय... शूरपणानं वाग !

...पुनर्भेटीचा आनंद थोडा ओसरल्यावर ल्यूकसनं पुढच्या मार्गाची पाहणी केली. आता एक नदी पार करायची होती. नदीच्या पात्रात जेमतेम कमरेएवढं पाणी होतं; पण प्रवाहात भोवरे होते. पाणी धोकादायक होतं. प्रत्येक मोठ्या माणसानं एका लहान मुलाचा हात धरून नदीच्या पात्रात शिरायचं अशा सूचना त्यानं सगळ्यांना दिल्या. तो स्वतः पुढं जाणार होता. नदीच्या पात्रातल्या निसरड्या खडकावर पाय देऊन पुढं जाणं वाटलं तेवढं सोपं नव्हतं... मेगालीचा पाय घसरलाच...आणि ती धारेला लागली. ख्रिसोलानं उडी मारून झपाट्यानं तिचा हात पकडला. ल्यूकसनं तिला वर ओढून घेतलं...

त्या सर्वांनी कसंबसं ते पात्र ओलांडलं... पलीकडं कुणाचीही मालकी नसलेला टापू होता... आता उजाडेपर्यंत या ठिकाणीच थांबायचं ठरलं. सकाळ झाल्यावर त्यांनी झाडाच्या फांद्या तोडल्या. बायकांनी आपले पेटिकोट फाडून पांढरी निशाणं बनवून ती फांद्यावर अडकवली. ते झेंडे घेऊन ओल्गा आणि ख्रिसोला पुढं गेल्या... ओरडत होत्या...

'... आम्हाला वाचवा, बंधूंनो, आम्हाला वाचवा !...'

टेकडाच्या पलीकडून एक आकृती पुढं आली. 'थांबा ! तिथंच थांबा– कोण आहात तुम्ही ?'

ओल्गा म्हणाली, 'आम्ही लिया गावचे लोक आहोत. शरणार्थी, मुलं आहेत आमच्या बरोबर–'

'इकडून या बाजून या... काटेरी कुंपणात फट पडलीय ना... त्या बाजूनं या. जपून हं... वाटेत सुरुंग आहेत बरं...'

ओल्गा आणि ख्रिसोला हळूहळू एकेक पाऊल टाकत पुढं जाऊ लागल्या आणि त्या दोघींच्या मागून ल्यूकस– त्याच्यामागून बाकीचे.

एकेका कातळामागून तिकडचे सैनिक डोकं वर काढून हे दृश्य पाहत होते. प्रत्येकाच्या मनात कमालीचा अचंबा– बाप रे किती साधी खेडवळ माणसं ती– आणि केवढं हे साहस !...'

...जंगलातून पाच–सहा क्रांतिसैनिकांनी ते पाहिलं... त्यांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना– ही गावढळ माणसे कशी निसटली आपल्या तावडीतून ? आता चांगले मोकळ्या मैदानातून चालताहेत. झाडायच्या का गोळ्या ? एकेकाला लंगडं करून टाकू– दुसरा म्हणाला, 'नको ! एक तर इथून ते अंतर पुष्कळ आहे. नेम बरोबर लागायचा नाही आणि दुसरं म्हणजे गोळ्यांच्या आवाजानं आपला ठावठिकाणा मात्र कळेल... ते तिकडचे सैनिक आपल्यावर बाँब टाकतील. नकोच ते...

'कमाल आहे त्या ल्यूकस झियारासची. त्यानं पुढारीपणा करून इतक्या माणसांना घेऊन पळून जावं ! आश्चर्य आहे...'


... थोड्याच वेळात ल्यूकस आणि कंपनी दुसऱ्या हद्दीत पोचले. तिथले अधिकारी त्यांना एकेक प्रश्न विचारायला लागले. सगळेजण कमालीचे दमले होते. कुणाच्याच तोंडून शब्द फुटत नव्हता. त्या सैनिकांनी काटक्या गोळा करून आग पेटवून चहा केला... तेव्हा ओल्गाला आठवलं. तिनं ममीला वचन दिलं होतं की, आम्ही त्या हद्दीत सुखरूप पोचलो की खुणेची शेकोटी पेटवू....

ओल्गा एका अधिकाऱ्यापाशी जाऊन नम्रपणे विचारू लागली, 'मेजरसाहेब, आमची एक विनंती आहे. आम्ही एक मोठी शेकोटी पेटवू का... अशी मोठी की तो पलीकडच्या डोंगरावरून दिसेल, आमच्या घरची काही माणसं अजून लिया गावात

आहेत. त्यांना कळवायचंय– आम्ही सुखरूप पोचलो असं– म्हणजे तेही सुटकेचा बेत आखू शकतील– '

'छे: छे ! काही तरी काय ? एवढी मोठी शेकोटी– म्हणजे निकालच लागेल आपला ! कम्युनिस्टांना आपसुकच कळेल आपण कुठं आहोत ते–मशीनगननं चांगलाच मारा करतील आपल्यावर !'

... दोन दिवसांच्या पायपिटीनंतर एलेनीची आणि ग्लायकेरियाची भेट झाली. गव्हाची मळणी चाललेल्या शेतात दोघींची गाठ पडली. रात्रभर दोघी जाग्या राहिल्या आणि पलीकडच्या डोंगराच्या दिशेनं उत्सुकतेनं पाहत राहिल्या... आता जाळ दिसेल, मग दिसेल... पण त्यांची निराशा झाली.



दुसरे दिवशी दोन क्रांतिसैनिक आले आणि या शेतावरच्या निम्म्या बायकांना घेऊन दुसऱ्या शेतावर गेले. त्यात ग्लायकेरियाला जावं लागलं. एलेनी मागंच राहिली; पण आता तिला ग्लायकेरियाला सोडून पळून जाण्याचा बेत ठरवता येईना. रात्र पडल्यावर दुसरंच संकट कोसळलं. एलेनी, तिची नणंद अलेक्सो आणि मारिआंथा झियारास या तिघींना अटक करण्यात आली आणि लिया गावात नेण्यात आलं...

... तिकडं त्या निर्वासितांना सैनिकांचं चांगलं संरक्षण मिळालं. त्यांनी त्या सर्वांना एका गावापर्यंत नेऊन सोडलं. तिथून लष्कराच्या ट्रकमधून त्यांना निर्वासितांच्या छावणीत पोचवण्यात आलं...

... सकाळ झाली... ढगांआडून सूर्य डोकावू लागला. त्याचे प्रकाशकिरण अंगावर घेताना त्या सर्वांच्या डोक्यात प्रकाश पडला, ... आपण मुक्त झालो– सुटलो... एक बाई उंच आवाजात एक जुनं गाणं गायला लागली. मुलं हसायखिदळायला लागली. हातात हात घालून इकडंतिकडं बागडू लागली. त्यांचं पाहून मोठी माणसंही हातात हात घालून फेर धरून नाचायला लागली... आनंद कल्लोळ...

साऊला झियारिस मोठ्यानं ओरडली, 'ए ! थांबवा हे सारं... हे योग्य नाही.. आपले आणखी प्रियजन मागं राहिलेत आणि आपण आनंदाचा जल्लोष करतोय हे बरोबर आहे का ?... माझी मुलगी, एलेनी, तिची मुलगी तिकडंच अडकून पडल्या आहेत... काय होणार आहे त्यांचं ?... '

... तिचे शब्द ऐकून सगळेजण थप्पड मारल्यासारखे गप्प बसले... निकोलानं लिया गावाच्या दिशेनं पाहिलं... तो मोठा डोंगर.. झाडंझुडुपं... लिया गावाचा कोपरासुद्धा दृष्टीला पडत नव्हता... त्याचं छोटं विश्व उलटंपालटं होऊन गेलं. इतके दिवस तो जणू उंच शिखरावर होता. आता खाली...खाली डोंगराच्या पायथ्याशी... या डोंगराच्या आणि पलीकडच्या डोंगराच्या मध्ये मोठी दरी...दोन्ही डोंगर आपल्या अंगावर कोसळताहेत असा भास त्याला झाला.

साऊलाचे शब्द ऐकून त्याला प्रथमच जाणवलं की आपली ममी कदाचित येथपर्यंत पोचू शकणार नाही... तिथून ती सुटू शकणार नाही... आणि मग इतके दिवस अडवून ठेवलेला अश्रूंचा बांध फुटला... तो ढसाढसा रडायला लागला!

.. एलेनी, अलेक्सो आणि मारिआंथो यांना क्रांतिसेनेच्या मुख्य कार्यालयात डांबून ठेवण्यात आलं... हेच पूर्वीचं एलेनीचं घर– एके काळी जिथं आनंदाचे क्षण वेचले तिथं आता प्रत्येक क्षणी जिवंतपणी मरण !... आठवडाभर रोज त्यांना हजार प्रश्न विचारले जात. सॉटिरिस ड्रेपेटिस दिवसातून दहा वेळा त्यांची जबानी घेई. कधी–कधी त्यांना बंदुकीचा धाक दाखवला जाई. कधी मुस्कुटात भडकावल्या जात; पण त्यांना पद्धतशीर अशी मारहाण कुणी केली नाही. अंगावर खुणा राहतील असा छळ कुणी केला नाही.

...तिघीही एकच उत्तर देत की, ती माणसं कशी पळाली, याची आम्हाला काही माहिती नाही. अर्थातच ड्रेपेटिसचा त्यांच्यावर मुळीच विश्वास बसला नाही. पलायनाचा निश्चितच मोठा कट असणार आणि लौकरच या तिघी कटाच्या सूत्रधाराशी संधान बांधतील अशी त्यांची अटकळ होती. म्हणून मुद्दामच त्यानं त्या तिघींना सोडून दिलं.

त्या मंडळींच्या पलायनाची बातमी संपूर्ण मुरगाना प्रदेशात वणव्यासारखी पसरली. क्रांतिसेनेच्या श्रेष्ठींपर्यंतही ती पोचली. क्रांतिसैनिकांची पोलीसठाणी जागोजागी असताना, ठिकठिकाणी पहारे असताना, इतक्या लोकांनी त्यांना हातोहात चकवून पळून जावं, ही एक अतर्क्य गोष्ट होती. अशक्य गोष्ट त्यांनी शक्य गोष्ट करून दाखवावी ही बाब क्रांतिसैनिकांच्या दृष्टीनं

**तिचे शब्द ऐकून सगळेजण थप्पड मारल्यासारखे गप्प बसले.**

नामुष्कीची होती. या पलायनामुळं सर्वत्र पसरलेल्या असतोषाचं दर्शन तर झालंच; पण लिया गावातल्या सुरक्षा–पोलिसांचा गलथानपणाही उघडकीला आला.

या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी 'काटिस' हे टोपण नाव असलेल्या माणसाला लिया गावी पाठवलं. लढाईत क्रांतिसैनिक हरत होते. त्या अपयशानं हबकून जाऊन त्यांनी कुणाला तरी बळीचा बकरा करण्याचं सत्र आरंभलं. न्यायदान करताना अधिक क्रूरपणा दाखवायला सुरुवात केली.

काटिसनं ड्रैपोटिसला सांगितलं की, 'ती माणस पळून कशी गेली हे शोधून काढायला मला इथं पाठवलं आहे आणि त्याबरोबरच देशद्रोह्यांना अशी कडक शिक्षा द्यायला सांगितलय की, ती पाहून पुन: कुणी असा प्रयत्न करायला धजावणार नाही !'

आठवडाभराच्या कैदेनतर एलेनीची सुटका करण्यात आली, तरी ती पोलिसांच्या निरीक्षणाखाली होती एक महिनाभर एलेनी अलेक्सो आणि मॅरिआंथा या तिघीवरही पोलिसाची पाळत होती; पण त्यांना कटाबावत तसूमात्र पुरावा सापडला नाही. सॉटिरिसनं जबानीसबधीच्या फायली काटिसपुढं टाकल्या. त्यातून काहीही हाती लागत नाही असं दिसताच तो भडकला... 'तिकडं हेडक्वार्टर्समधल्या लोकाची सहनशीलता आता संपुष्टात आलीय–तुम्हाला या पलायनाचा सूत्रधार शोधता येत नाही याचा अर्थ काय?'

ट्र्‌बॉयनिआस कुटुंबातल्या बायकांना या प्रकरणाची माहिती आहे अशी कुणकुण सॉटिरिसच्या कानांवर आली होती. काटिसनं सारखा तगादा लावल्यानं एक प्रकारची निकड उत्पन्न झाली. त्यानं त्या बायकांना जबानीसाठी बोलावलं...

...काटिसनं स्वत: जबानी घेतली. दोन–तीन तासांच्या अवधीत पुष्कळ काहीस त्याच्या हाती लागलं. त्या बेताची आखणी, पहिले दोन असफल प्रयत्न आणि यातली एलेनीची भूमिका ... पुष्कळच माहिती मिळाली. ऑगस्ट महिन्याच्या प्रारंभी एलेनीला पुन: अटक झाली. याआधी काही दिवस लिया गावातल्या अनेकांना पकडण्यात येऊन तुरुंगात टाकलं होतं. अठ्ठावीस वर्षांची दिना व्हेनेटिस त्यांच्यापैकीच एक...पुढं जगल्या-वाचल्यानंतर तिनंच या तुरुंगात कैद्यांना मिळालेल्या वागणुकीची हकिकत सांगितली.

.. प्रत्येक कैद्याला प्रथम एका खोलीत एकटच ठेवल जाई. मग काही दिवसानी त्यांना मागच्या अंगणात नेऊन बेदम चोप दिला जाई. सत्राशेसाठ प्रश्न विचारले जात. मारणारा आणि प्रश्न विचारणारा दमला की, कैद्याची गठडी वळून त्याला तळघरात फेकून दिले जाई. त्या लहानशा तळघरात २५ ते ३० कैदी होते. तिथं इतकी दाटी झाली होती की, त्यांना झोपतानासुद्धा आडवं होता येत नव्हतं. बसल्या-बसल्याच झोप घ्यावी लागे. स्वच्छतेचा मागमूस नव्हता. स्वच्छता पाळायची म्हटलं तरी शक्य नव्हतं. सगळ्यांच्या कपड्यात उवा झाल्या होत्या. प्रातर्विधीसाठी त्यांना गटागटानं दिवसातून दोनदा पहाऱ्यात बाहेर नेलं जाई. दोन खेपा पुरेशा होत नसत. काहीजण मूत्रविसर्जन करीत. तळघरातल्या त्या खोलीत कमालीची दुर्गंधी पसरली होती. जेवण दिवसातून एकदाच. खिडकीच्या गजातून पातळ सूपच्या बशा दिल्या जात.

जवळजवळ रोज सध्याकाळी सॉटिरिस आणि इतर अधिकारी तळघरात येत. कुणाला तरी एकाला पकडून इतरांसमोर त्याच्यावर लाथा-बुक्क्याचा वर्षाव करीत. आपला वचक बसवीत.

एखाद्या कैद्याला या जगातून नाहीसा करण्याचा दिवस आला की, त्याला तळघरातून बाहेर काढल जाई. जिना चढून तो वर जाई. इतरांना होणारं तेच त्याचं अखेरचं दर्शन! पुन: तो दृष्टीला पडायचाच नाही. मशीनगनमधून उडालेल्या गोळ्यांच्या फैरीचा गगनभेदी आवाज कानांवर येई. ते चक्र नेमानं चालू होतं. तुरुंगाच्या मागच्या आवारात म्हणजे एलेनीच्या घराच्या अंगणात... एके काळच्या तिच्या बागेत–अगणित प्रेतं पुरली गेली !

एलेनीच्या नशिबी मारहाण होतीच. एकीकडे दंडुक्याचे दणके अंगावर बसत...दुसरीकडं प्रश्नांचा भडिमार...

'मुलाच्या पलायनाचा बेत कुणी आखला?

'तूच त्याची म्होरकी होतीस ना ?'

'सांग...सांग...उघड तुझी बत्तिशी! ...'

प्रत्येक वाक्याबरोबर लाथा आणि बुक्क्या .. अगाचा दाह करणारे फटके... तरीही एलेनीचा एकच ठेका कायम होता.

...'मला काही माहीत नाही ! ...'

काही दिवसानी काटिसनं सर्व पुरावा तिच्यापुढं ठेवला...

...'तूच–तूच केलंस हे सर्व...आणि वर खोटं बोलतेस ? '

एलेनीनं पुन्हा धैर्यानं सर्व आरोप नाकारले; परतु मनातून तीही घाबरली होती. इतकी तंतोतंत माहिती क्रांतिसैनिकाना कुणी पुरवली ? पहिले दोन बेत फसले हे कुणी सांगितल ? कॉंस्टाटिनाला तिच्या वहिनीकडून–अलेक्झांड्राकडून कळलं असेल. अलेक्झाड्रा दुसऱ्या खेपेला आपल्याबरोबर होती; पण ती स्वत:च्या तोडानं हे सारं कस कबूल करील ? मग तिच्याही गळ्याला तात नसता का लागला ? मग कोण ? कुणी केली फितुरी ?

(क्रमश:)

## निवेदन

**अब्राहम लिंकन : फाळणी टाळणारा महापुरुष** हे पुस्तक नियोजित वेळेनुसार १ जून रोजी प्रकाशित होणार होते. पण कागद हाती यावयास लागलेला विलंब व मुद्रणालयातील तांत्रिक अडचणी यामुळे हे पुस्तक १५ आगस्टला प्रकाशित होत आहे. सवलतीत पुस्तक नोंदविलेल्या ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे ही विनंती.

**राजहंस प्रकाशन**

## पुस्तके

# झपाटून टाकणारी – वेगळी कथा

**श्री.** भारत सासणे यांचा ‘लाल फुलाचं झाड’ हा कथासंग्रह वाचला म्हणजे मराठी कथेचं ते आशास्थान आहेत, हे प्रकर्षानं जाणवतं. त्यांचे यापूर्वी दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत आणि ‘जॉन आणि अंजिरी पक्षी’ या त्यांच्या कथासंग्रहाला राज्यपुरस्कारही प्राप्त झाला आहे. ‘लाल फुलांचे झाड’ हा त्यांचा कथासंग्रह म्हणजे १९८० ते ८३ या काळात विविध दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झालेल्या कथांचे पुस्तकरूप आहे.

जी. ए. कुलकर्णी आणि चि. त्र्यं. खानोलकर यांच्या सीमारेषेवर रेंगाळणारी ही कथा. किंबहुना ती चि. त्र्यं. खानोलकरांकडेच अधिक झुकते असं म्हटलं तर वावगं ठरू नये. निसर्गाच्या गर्भातला असाच गूढ परिसर. झपाटून टाकणारा. त्या ठिकाणी झाडावरून पान गळणं किंवा ऊन-सावलीची जाळी अंगणात पडणं या घटनांनादेखील गूढतेची झाक प्राप्त होते.

श्री. सासणे यांच्या कथेमध्ये बहुधा एक घर असतं. कथेच्या आरंभापासूनच त्या घराबद्दलचं आपलं कुतूहल चाळवलं जातं. त्या घरातली माणसं, त्यांचं वागणं, स्वभाव, त्या माणसांची काही अपुरी स्वप्नं, आकांक्षा या सर्वांनी मिळून त्या घराला एक व्यक्तिमत्त्व प्राप्त करून दिलेलं असतं. कथा वाचता वाचता ते घर मनावर कोरलं जातं आणि मग अशा अनेक गूढ घरांच्या आकृत्या मनात तयार होतात. आपल्या लक्षात राहणारं ते घर श्री. सासणे यांच्या मनात खोलवर दडलं असलं पाहिजे. मग त्या अनुषंगानं माणसं येतात. एखाद्या पुराण वास्तूच्या दर्शनानं जसं मूकपण यावं, त्या चमत्कारिक शांततेची ओढ लागावी तसं या घरांच्या दर्शनानं होतं. तेव्हा एक पात्र म्हणून घरांचा विचार करायला हवा.

पहिल्याच ‘कर्म’ या कथेत एका ज्योतिषाचं घर आहे. त्या घराच्या पायऱ्यांवर पिंपळाच्या झाडाची जाळीदार सावली पडली होती, घर अंधारं होतं, भिंतींचे पोपडे निघाले होते; मध्येच एखादं वाळलेलं पान टपकन ओटीवर येऊन पडे. आपल्या बंद नशिबाला किल्ल्या लागतील आणि ते उघडेल या आशेने कथानायक या ज्योतिषाच्या घराची पायरी चढतो; पण नशिबाची दारं बंदच राहतात. ‘मनात रुजलेलं घर’ या कथेत एक शांत, मौन, एकाकी वाटणारं दुमजली घर आहे. त्या घरात बऱ्याच वर्षांपूर्वी एक ख्रिश्चन कुटुंब राहात होतं. घराला खिडकीच्या बाहेरच्या बाजूनं दोन कुंड्या होत्या. गुलाबी झगा घातलेली रोझ त्या कुंड्यांना सकाळी रोज पाणी घालायची. कधी कधी ते घर समारंभाच्या निमित्तानं रोषणाईनं सजून जायचं. तेव्हाही ते सुसंस्कृत वाटायचं. तरुण वयात बापूसाहेबांच्या मनात ते घर खोलवर दडून बसलं. त्या घराबद्दल एक विलक्षण आकर्षण निर्माण झालं; पण त्यांना त्या घरात कधी जायला मिळालं नाही. त्यांनी त्या घराचं एक रेखाटन काढून सतत जवळ बाळगलं. पुढं कर्ज वाढल्यामुळं त्या घरातली माणसं निघून गेली. निवृत्तीनंतर आपल्या गावी परत आल्यावर बापूसाहेबांच्या दृष्टीस ते घर पडलं मात्र, ते हरवून गेले! त्या घराचं दार तोडून ते आत शिरले. घरभर हिंडून त्यांनी जुन्या स्मृती कुरवाळल्या, कधी न पाहिलेलं मनानं अनुभवलं! तारुण्यातली त्यांची आणि रोझची अस्फुट, अबोल प्रीतभावना कितो तरी वर्षांनंतर प्रगट झाली. ‘मनातला मोर’ या कथेतलं घर म्हणजे एक मोठा वाडा. जितका भव्य तितकाच ऐसपैस, अवाढव्य आणि दुर्लक्षित. छाप्पा एक भव्य, सुंदर झुंबर टांगलं होतं; पण त्यावर धूळ साचली होती. तिच्या बाबांनी तिला या घरात देताना फक्त वाडाच पाहिला; पण त्या झुंबरावरची धूळ पाहिली नाही. घरातली माणसं विक्षिप्त, अरसिक, स्थितिवादी आणि काहीशी दुष्ट. तिच्या कोवळ्या, रसिक, रंगवेड्या, सौंदर्यवेड्या मनाचा तिथं कोंडमारा व्हायला लागला. तिचं मन बंड करून उठलं आणि वराची बंधनं तोडून ते निसर्गाच्या सर्व विभ्रमांना पूर्णपणे शरण गेलं. ‘जादूचा वाडा’ हीही अशीच कथा. त्यात स्वतःचं व्यक्तिमत्त्व असलेला वाडा. जुना, स्वप्नांचा वाडा. नक्षीचे काळे लाकडी खांब, धाक वाटावा अशी झुंबरं त्या वाड्यात होती. गहनगूढ, न उमजलेला, जिवंत दंतकथेसारखा वाटणारा वाडा! वेड्या वयातल्या पहिल्या प्रेमाचा गंध पोटात घेऊन उभा असलेला. बऱ्याच वर्षांनी आल्यावर सुरेशला ते दिवस आठवतात. आता तो वाडा काकांनी विकायला काढलेला असतो. या बातमीने सुरेश समूळ हेलवतो. त्या वाड्यातले सूर, धूसर अशी बासरी म्हणजे अनुराधा! ती आता परक्याची झालेली; पण पाय तिकडे सुरेशला ओढून नेतात. वाड्याची शपथ घेऊन दोघांनी तरुण वयात एकमेकांना वचनं दिली असतात न विसरण्याची. ती खरीही ठरतात इतक्या वर्षांनंतर! कारण तो वाडा जादूचा असतो!

### अनुभूती हीच गोष्ट

अशा ह्या घरांच्या अनुषंगाने आकार घेतलेल्या; पण त्या घरांशी एकरूप झालेल्या व्यक्ती आपल्याला सासणे यांच्या कथेत भेटतात. त्या घरांना कालांतरानं स्मृतिशिल्पाचं रूप प्राप्त होतं. या सर्व व्यक्ती आयुष्यात या ना त्या कारणाने पराभूत झालेल्या आहेत. ज्या वयात जे हवं ते हरवून गेलेलं आहे. आपल्या कुंडलीत लग्नयोग आहे का ते शोधण्यासाठी वणवण करणारा ब्रह्मदेव ‘कर्म’ या कथेत भेटतो. स्त्रीविना वैराग पोकळी निर्माण झालेलं त्याचं जीवन, एका स्त्रीनेच जीवनाची ही वाताहत केलेली. जानकी दुःखी, अबोल का असते हे तिला एकदाही न विचारल्यामुळं तिची सहानुभूती पूर्ण गमावून बसलेला, ‘पित’ या कथेतला रावसाहेब, ‘ठकाजी रामाच्या स्मरणातली रात्र’ या कथेतला, भावांच्या भांडणात गावाबाहेर एक जुनाट पडकं घर आणि एकाकी आयुष्य वाट्याला आलेला सत्तरीचा म्हातारा ठकाजी ह्या सगळ्या व्यक्ती एक खिन्नतेचं सावट पांघरून बसलेल्या.

‘नवा सूर्योदय,’ ‘अरण्य’ आणि ‘ठकाजी रामाच्या स्मरणातली रात्र’ या कथा वेगळ्या आणि उल्लेखनीय ठराव्यात. ‘नवा सूर्योदय’ ही कथा आदिवासी जीवन, त्यांची दुःखं, त्यांच्यावरची संकटं, त्यांचं वेकार

दरिद्री जीवन या सर्वांचं विदारक चित्रण करते आणि त्याचबरोबर लेखकानं या कथेला तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्या माध्यमातून राजकीय रंगही चढवले आहेत. एका अंगानं ती सामाजिक जाणिवेची तर दुसऱ्या अंगानं राजकीय डावपेचांची झालेली आहे. गरिबांच्या झोपडीत सूर्योदय घडवून आणण्यासाठी सगळे पुढारी मोठा आव आणतात; पण त्यांच्या आपसातल्या भांडणात ते गरीब अधिकच भरडले जातात. शेवटी त्यांना आपली जागाच सोडून नवा सूर्य शोधायला निघावं लागतं; पण ते आनंदानं हेच पत्करतात. गाढवाच्या पाठीवर संसार टाकून त्यांचा तांडा पुढं सरकतो. त्यांना त्या गाढवाची चाल आकर्षक वाटते. कारण ते राजकीय कागदी घोडे नसतात !

जमिनीच्या तुकड्यासाठी आणि वडिलोपार्जित इस्टेटीसाठी कचाकचा भांडणारे सत्तरीच्या पुढचे सात भाऊ आणि त्यात एका मोठ्या घरापलीकडे हाती काही न पडलेला अन्यायाचा बळी ठरलेला ठकाजी एका बेभान पावसाच्या रात्री अंगाचं गाठोडं वळून कुडकुडत बसलेला. 'ठकाजी रामाच्या स्मरणातली रात्र' ही कथा पराभूत ठकाजीचं चित्र रंगवते. रटल् रटल् असा नाद धरत पाऊस अखंड कोसळतो आहे. आपल्याला सोडून गेलेली बायको कधी तरी परत येईल, आपल्यावरचा अन्याय दूर करेल या एकाच विचाराच्या तंद्रीत बसलेला ठकाजी. अशा मरणाच्या गारठ्यात, सोसाट्याच्या वाऱ्यात एक स्त्री घरात रात्रीपुरता आसरा त्याला मागते. ते सत्य की स्वप्न त्याला कळत नाही. ती त्याला सांगते, उरले दिवस सुखात घालवा आणि सुखानं मरा. त्याला ते पटतं. सकाळी त्याला कोणीच दिसत नाही. चांदीची पळी फक्त ती विसरून गेली असते. ती पळी कवटाळत ठकाजी चिंब ओल्या रात्री असाच स्वतःच मुरून बसून राहतो.

भारत सासणे यांच्या अशा या कथा. त्यात एक भाववृत्ती, एक अनुभूती हीच खरी 'गोष्ट' असते. 'गोष्ट' शोधायला गेलं तर सापडणार नाही आणि कथा रुचणारही नाही. जीवनाचा एक विलक्षण अनुभव असं या कथेचं स्वरूप असलं तरी तिनं कलेची पातळीही सोडलेली नाही. भाषेचाही उल्लेख आवर्जून करावा लागेल. कारण त्यांची भाषा कथेला अधिक कलापूर्ण करते असं आढळतं. कथा ही जर कलाकृती आहे, तर भाषा हे तिला घडवणारं माध्यम आहे. कथेतला गूढरम्य असा हलकासा थर कायम राहील अशा तऱ्हेनं त्यांची भाषा कथेला साथ देते.

संग्रहातल्या दोन-तीन कथा मात्र कोणत्या तरी कारणानं फसलेल्या वाटतात. इतर कथांप्रमाणे, त्या मनाची पकड घेऊ शकत नाहीत. 'लिंपणं', 'लाल फुलांचं झाड' या कथांचा यासाठी उल्लेख करता येईल. 'लिंपण' या कथेतला जातीयतेचा धागा प्रभावी वाटत नाही. 'लिंपण' आणि 'लाल फुलांचं झाड' या दोन्हीही कथा एका लहान मुलाच्या निवेदनातून उलगडत जातात; पण ते निवेदन अपरिपक्व वाटतं. 'लाल फुलांचं झाड' या कथेतली मामी एक सुंदर स्त्री, घरातल्या दुष्ट माणसांच्या छळाला बळी पडलेली, जप-तप-सेवाव्रत यांचं आचरण करणारी असूनही तिचा मृत्यू आपल्याला हलवू शकत नाही.

भारत सासणे यांच्या कथेचा आणखी एक विशेष म्हणजे कथेतली गूढरम्यता वाढवायला मदत करणाऱ्या काही गोष्टी त्यात असतात.

उदा. नक्षीदार, जड चांदीची पळी, मंजूळ साद घालणारं पाखरू, कुत्र्याच्या गळ्यातली बोटभर जाडीचा एकेक पीळ असलेली चांदीची साखळी, मामीच्या घरातलं वाघाचं चित्रं ही प्रतीकं बनून जातात. काहींच्या मागे बोलाई, मोहिनी बाबा अशा ग्रामीण कल्पना-विश्वास असतात. हे विषय अनुभवाबाहेरचे म्हणून काहींना आस्वादात अडचण जाणवेल; पण त्याचबरोबर अननुभवित गोष्टींना आपल्या अनुभवाचा विषय बनवलं म्हणून आनंदही होईल. असे दुहेरी पदर घेऊन ती कथा वाचकांसमोर उभी राहते. ती झपाटून टाकते; पण अस्वस्थ करत नाही. जीवनाचं एक नवं अंग दाखवते; पण वास्तवातले ताण-तणाव जाणवून देत नाही. व्यक्ती जिवंत उभ्या करते; पण त्या हृदयात शिरत नाहीत.

मराठी कथा-विश्वात ते वेगळं आहे आणि चांगल्याच्या वाटेवर आहे हेही कमी नाही !

— सौ. आशा कर्दळे

लाल फुलांचं झाड
भारत सासणे
प्रतिमा प्रकाशन
पृष्ठ—२२०, मूल्य—४० रु.

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## मी कोण आहे ?

If a child lives with criticism
he learns to condemn
If he lives with hostility
he learns to fight
If he lives with fear
he learns to be
apprehensive
If he lives with pity
he learns to feel
sorry
If he lives with jealousy
he learns to feel
guilty
If he lives with encouragement
he learns to be confident
If he lives with tolerance
he learns to be
patient
If he lives with praise
he learns to be
appreciative
If he lives with acceptance
he learns to love
If he lives with approval
he learns to like
himself
If he lives with recognition
he learns to have a
goal

If he lives with fairness
he learns to value
justice
If he lives with honesty
he learns the virtue
of truth
If he lives with security
he learns to have
faith
*in himself and others*
If he lives with friendliness
he learns that the
world
is a good place in
which to live
– Dorothy Law Nelte.

किती छान कविता आहे की नाही? मोठेपणाच्या पाठांतरासाठी काही कविता निवडायच्या झाल्या तर प्रत्येक पालकानं पाठ करावी अशी ही कविता आहे. पुन्हा पुन्हा ही कविता वाचावी तर ती दर वेळी काही नवंनवंच सांगते.

## आटापिटा कशासाठी?

आपल्या मुलानं भित्रं असू नये, रडतुडं असू नये, भांडखोर असू नये, ज्याला-त्याला नाकं मुरडू नयेत, त्याच्या मनात कुठलेही गंड निर्माण होऊ नयेत असं आपल्याला वाटत असतं; पण आपण त्यासाठी काय करायला हवं हे कळत नसतं. लहानपणी आपण त्याला अनेक प्रकारची भीती घालतो. तात्पुरता उपाय म्हणून त्याचा उपयोगही होतो कधीकधी; पण असं वारंवार घडलं की मूल भित्रं होतं.

परवाच एक आई आपल्या ८–९ वर्षांच्या थोरल्या लेकीबद्दल तक्रार करत होती, 'ही इतकी भित्री आहे की, कोपऱ्यावरून साधी एवढीशी सुई आणायला सांगितली तरी ती जात नाही. आता ही एवढी पाचवीतली मुलगी हिला कोपऱ्यावरून साधी एवढीशी सुई आणता येऊ नये?' ह्या आईशी जास्त गप्पा मारता मारता कळलं की, ही मुलगी लहानपणी एकदा भर रहदारीच्या रस्त्यावर गेली होती ते आईनं वरून खिडकीतून पाहिलं. तिला साहजिकच धस्स झालं. तिनं धावत जाऊन मुलीला वर आणलं आणि अशी पुन्हा गेलीस तर पोलीस पकडेल, भिकारी पळवेल, हातपाय तुटेल असं बरंच काही समजावून सांगितलं.

साहजिकच आहे. आई तेव्हा खूपच घाबरली होती आणि ही भीती अतिशयोक्त स्वरूपात ती मुलीला पोचती करत होती. बरं, हा प्रसंग आपल्या घरामध्ये इथेच विसरला जात नाही. त्याची मुलाला पुन्हा पुन्हा आठवण करून दिली जाते. पुन्हा पुन्हा भीती घातली जाते आणि ही भीती त्या चिमुकल्या जिवाच्या मनात खोल खोल जाऊन रुतून बसते. आता ही मुलगी मोठी झाल्यावर मात्र लगेच तिनं कोपऱ्यावर जाऊन सुई आणावी ही अपेक्षा करताना आईला हा प्रसंग आठवत नसतो. आता तिची अपेक्षा बदललेली असते; पण मुलगी मात्र मनानं त्या भीतीला बांधली गेलेली असते आणि आईला जें वाटते की एवढीशी सुई ती काय त्याचा खरा प्रश्नच नाही. सुई आणायची का भोपळा आणायचा त्याच्याशी या न जाण्याचा काही संबंधच नाही आहे.

भीती आहे ती पोलिसाची, भिकाऱ्याची, वाहनाची, हातपाय मोडण्याची. ती भीती घालवायला मुलीबरोबर मुद्दाम कोपऱ्यापर्यंत जायला हवं. तिला हव तर समजावूनही सांगायला हवं की, मी लहानपणी तुला भीती घातली ते आता विसरून जा. तेव्हा माझी चूक झाली. ते खरं नव्हतं. तिची भीती जायला वेळ लागेल; पण ती नक्की जाईल. तेवढा धीर आईनं धरायला हवा.

मुलानं जसं तिसऱ्या वर्षी वेगळं वागावं न आठव्या वर्षी वेगळं वागावं अशी आपण अपेक्षा करतो तसं तीन वर्षांच्या मुलीची आई आणि आठ वर्षांच्या मुलीची आई यांनीही बदललं पाहिजे, तसंच वागून कसं चालेल? बोलण्याची भाषा थोडी बदलावी लागेल. मुलांना अधिक मान देऊन वागवावं लागेल, त्या त्या वयाचे प्रश्न लक्षात घेऊन वागावं लागेल.

मुलाभोवतालचं वातावरण जर कायम टीकेचं असेल तर ते नाव ठेवायलाच शिकणार. घरात सारखी भांडणं असतील, तर ते भांडायला शिकणार. जरा काही झालं की त्याला आंजरलं-गोंजरलं की, ते रडतराऊच होणार.

कित्येकदा आपल्या घरातलं वातावरण इतर अनेकांच्यावर अवलंबून असतं. त्यात आजी-आजोबा असतात, काका-काकू असतात किंवा इतर कुणी आत्या-मामा असतात. या सगळ्यांवरच काय पण अशा ताणामध्ये आपला स्वतःवर सुद्धा ताबा नसतो. आपल्या वागण्या-बोलण्यातून मूल काय टिपत असेल याबद्दल थोडं जागं होऊन विचार करायला हवा.

आपलं मूल धीट असावं, त्यानं आत्मविश्वासानं वावरावं असं वाटत असेल तर त्याच्या भोवती प्रोत्साहनाचं वातावरण हवं, कधी कशाचं तोंड भरून कौतुक केलं नाही, कधी 'आगे बढो' म्हटलं नाही, कधी 'तू हे छान करतेस हं' असं सांगितलं नाही, तर आत्मविश्वास यावा कुठून? अठ्ठ्याऐंशी टक्के मार्क मिळालेली मुलगी नव्वद टक्के मिळाले नाहीत म्हणून जेव्हा आत्महत्या करते तेव्हा हे शोधून काढावंसं वाटतं की, तिच्या जीवनात हे कोण मूर्ख मोठं माणूस होतं ज्यांनी तिला ही मार्कांची भीती घालून ठेवली? का तिला ह्या जीवघेण्या स्पर्धेत ओढलं होतं? आत्मविश्वास ह्या अशा अतिरेकी स्पर्धांनीसुद्धा ढासळतो.

माझ्या मुलानं धीरानं वागावं, धांदरट होऊ नये, चिरचिरं होऊ नये असं वाटत असेल तर मी सुद्धा माझी सहनशक्ती वाढवायला हवी. त्याच्या अनेक चुकाही माफ करायला हव्यात. त्यानी रसिक व्हावं असं वाटत असेल तर चांगल्याला चांगलं म्हणणं त्याच्या कानावर पडायला हवं. त्यानं प्रेमळ बनायला हवं असेल तर 'तू आहेस तसा मला आवडतोस' हा विश्वास त्याला मिळायला हवा आणि या सगळ्या गुणांबरोबर त्यानं त्याला स्वतःला आवडणं हेही यायला हवं.

या वैयक्तिक स्वभावातल्या वैशिष्ट्यांबरोबर विचार येतो तो मूल्यांचा. न्याय, समता, सत्य, व्यक्तिसन्मान हेही मुलाला लहानपणी जसं वागवलं जातं त्यातून येतात. त्यासाठी त्याला चांगुलपणाचा, खरेपणाचा, भक्कम आधाराचा प्रत्यय लहानपणात यायला हवा.

हे सगळं आपण देऊ लागलो ही जाणीव झाली की फारच जबाबदारी आपल्यावर आहे असं वाटायला लागतं...

आणि हा सारा आटापिटा कशासाठी तर ज्या जगात आपल्याला रहायचंय ते छान


आहे असं मुलाला वाटावं यासाठी. ते छान असावं यासाठी. यासाठी त्याच्याही भोवताली लहानपणी लहान–मोठे मित्र हवेत. मैत्रीचं वातावरण हवं.

म्हणजे मूल नकळत जेव्हा स्वतःला विचारेल मी कोण आहे ? तेव्हा त्याला उत्तर मिळेल–

मी अमक्या-तमक्याची लाडकी आहे.
मी हुषार आहे.
मला खूप गोष्टी करता येतात.
मी छान दिसते.
मी छान वागते.

लहानपणी मिळणाऱ्या या उत्तरांवर मोठेपणी मी कोण होणार हे बरंचसं ठरत असतं आणि ही उत्तरं अशी होकारार्थी यावीत यासाठी आई–वडील, नातेवाईक–शिक्षक सगळ्याच मोठ्या माणसांनी जाणीवपूर्वक लहानाशी वागावं लागतं. □

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

महिलांच्या एका शिबिराला गेले होते. शिबिर संपल्यावर शिबिरार्थींनी संयोजकांचे आभार मानण्याचा जो एक नेहमीचा कार्यक्रम असतो तोच तिथेही झाला. संसारी स्त्रियांनी घरदार सोडून दीड–दोन दिवस परगावी जाणं, समवयस्क स्त्रियांबरोबर एकत्र राहाणं हाच मुळात एक अनुभव असतो. त्यामुळे आभाराच्या चकतमाकत केलेल्या भाषणांमध्ये त्याचं अप्रूप दिसणं हे मला समजत होतं; पण या आनंदाला शब्दरूप देताना शेवटी प्रत्येक व्यक्ती एकाच रुळावर येऊन थडकायची. 'आज मला अगदी माहेरी आल्यासारखं वाटलं.' हे कशासाठी मला हे समजेचना. गंमत म्हणजे 'माहेरी आल्यासारखं वाटण्याचा' उल्लेख झाला की, श्रोत्यांचीही त्याला दाद मिळायची. यामध्ये गुळमुळीत शब्दांचा वापर आहे हे तर खरंच; पण माझ्या दृष्टीनं यात कुठे तरी बायकांची भावनिक पिळवणूक–इमोशनल एक्स्प्लॉयटेशन– आहे आणि खुद्द बायकाच त्याला आवाहन करीत असल्यामुळे ते खाजगी जीवनात, सामाजिक संदर्भात साहित्यात, ललितकलांमध्ये अबाधितपणे चालू राहिलेली आहे.

इथे एक खुलासा वेळीच केलेला बरा की 'माहेर' या वस्तूशी माझं काहीही भांडण नाही. माहेरी जाण्यातला आनंद, तिथे मिळणारं कौतुक, विसावा, भावनिक आधार, मानसिक दिलासा या साऱ्यांचा अनुभव व्यक्तिगत जीवनात मी घेतलेला आहे, इतर स्त्रियांना घेताना पाहिलेलं आहे; परंतु सर्व स्त्रियांना, वयाच्या, व्यक्तिमत्त्वाच्या वाढीच्या सर्व टप्प्यांवर त्याची सारखीच अपूर्वाई राहात असेल का याविषयी मला शंका आहे. मुळामध्ये मुलींची जेव्हा लहान वयात लग्नं होत होती, सासरी वेगवेगळी बंधनं होती, सासर व माहेर यात फार अंतर होतं, प्रवासाची साधने कमी होती, वर्षानुवर्षात गाठीभेटी होणं दुरापास्त होतं. त्या काळात माहेराची ओढ असणं समजण्यासारखं आहे. जुन्या साहित्यात, स्त्रीगीतांमध्ये वगैरे तिची फार तरल, पारदर्शी अशी रूपं उमटलेली आहेत; पण तीच माहेराची ओढ, काल आज आणि उद्या त्रिकालाबाधित कशी राहील ? आज लग्नामध्ये मुली प्रौढ असतात, टोकाची विकृत घरं सोडली तर त्यांचा सासरी शारीर छळ तरी होत नसतो, वरचेवर माहेरच्यांना भेटण्याची संधी त्यांना मिळते, लग्नानंतरचा अगदी सुरुवातीचा काळ सोडला तर स्वतंत्रपणे, स्वायत्तपणे जगण्याची त्यांची कुवत असते– नव्हे, त्यांना लवकरच त्याची चटकही लागते. याउलट माहेर म्हणजे पूर्वीसारखं नांदतंगाजतं एकत्र कुटुंब राहिलेलं नसतं. कित्येकदा तिथली वहिनी किंवा आईही कामासाठी घराबाहेर पडत असते. जागेची–सोयींची–पैशाची टंचाई बघता आपण तिथे जाऊन तिथल्या व्यवस्थेवर ताण आणण्यापेक्षा कधीमधी चार-आठ दिवस आईवडील आपल्याकडे आले तर तोच बदल उभयपक्षी जास्त सुखावह होईल असं पुष्कळ तरुण स्त्रियांना वाटतं आणि त्यात वावगं काही नाही. त्यात जर ती तरुण स्त्री स्वतः व्यवसाय करणारी असेल तर तिच्यावरची बंधनं आणि तिच्या गरजा दोन्हीही वाढलेलं असतं. भरीला मुलं, शाळा, नवऱ्याची नोकरी, चौकोनी कुटुंब या सगळ्यामुळं राहतं घर सोडून कुठेही जास्त वेळ जाणं आजच्या तरुण संसारी स्त्रीला जमत नाही. मग ते साक्षात् माहेर का असेना; पण हे सारं वास्तवात सत्यात ! कल्पनेत मात्र आपण अजूनही माहेर म्हटलं की तोच गहिवर काढणार ! कशासाठी ? आणि कुठवर ?

जे माहेराविषयी तेच पुरुषाच्या पहिल्या स्पर्शाविषयी, तेच पुढे अपत्यजन्माविषयी. माहेराविषयी सविस्तर लिहिले म्हणून या कल्पनांचा फक्त उल्लेखच करून पुढे जाते. अनुभवाच्या पातळीवर वयात येणं, समागम, पुनरुत्पादन हे सगळं महत्त्वाचं असलं तरी परिस्थितीनं, काळाच्या रेट्यानं या अनुभवांमधलं भावडेपण, काव्य, अज्ञाताची ओढ हे आता नक्कीच कमी झालेलं आहे. आपलं प्रमोशन, एखादी परीक्षा, नवऱ्याची बदली, नवा फ्लॅट ताब्यात येण्याची वेळ इत्यादींचा विचार करून, योजना करून किंवा वाट पाहून मूल होण्यासाठी योग्य अशी वेळ जेव्हा एखादी स्त्री निवडते तेव्हा त्यात हळवेपणाला वगैरे जागा असतेच कुठे ? का तो हळवेपणा, काव्य टिकावं म्हणून तिनं केव्हाही मूल होऊ द्यावं आणि संसाराच्या सगळ्या नियोजनाची धूळधाण उडवावी असं आपण म्हणणार आहोत ? स्वतःच्या लग्नासाठी पैसा जमवताना, वय वाढलेल्या कित्येक मुलींची पहिली रात्र ही पहिली वेळ नसण्याची शक्यता दृष्टीआड करून कसं चालेल ? फार कशाला, स्त्रियांची चाळिशी, ऋतुनिवृत्ती, पहिला पांढरा केस वगैरेविषयी आजवर पुष्कळ लिहिलं-बोललं गेलं असलं तरी आजच्या शहरी, सुशिक्षित, मध्यमवर्गीय स्त्रीच्या बाबतीत चाळिशीपेक्षा तिशी हे वय वेगवेगळ्या अर्थांनी नाजूक झालेलं, आव्हानात्मक झालेलं आहे याची दखल कोणी घ्यायची ? पूर्वी चाळिशीच्या आसपास स्त्रीला बोचू लागणारं वैफल्य, भाव-


निक रितेपण, निरुद्देशपण आजच्या स्त्रीला तिशीतच सामोरं येऊ लागतं आणि त्याच्याशी मुकाबला केला नाही तर मागच्या पिढीतली स्त्री पन्नाशीत जशी म्हातारी व्हायची तशी ती आता चाळिशीतच होऊ लागते ही वस्तुस्थिती आहे.

### सक्ती नको !

सारांश म्हणजे स्त्रियांचं आयुष्य खूप बदललंय. कोणाला आवडो-नावडो, कोणी स्वागत करो अगर दूर लोटायला बघो. हा बदल अटळ आहे. याचे काही फायदे आणि काही तोटे आहेत. यातला फक्त फायद्याचाच भाग आम्ही उचलू आणि तोटयाचा उमदेपणानं स्वीकार करण्याऐवजी जुन्याविषयी उसासे, उमाळे काढू असं म्हणून चालणार नाही. एकत्र कुटुंबपद्धतीकडून विभक्त कुटुंबपद्धतीकडे येताना आपल्या समाजाची हीच परिस्थिती झाली होती. सुटसुटीत, स्वायत्त, स्वावलंबी जगताना अडचणीच्या वेळीही आपण एकटे असतो, त्या वेळी हक्काच्या आधारापेक्षा भाडोत्री आधार आपल्याला घ्यावे लागतात हेही स्वीकारणं आपल्याला जड गेलं होतं; पण म्हणून विभक्त कुटुंबपद्धती यायची राहिली का ? स्त्रीनं शिकावं, कमवावं, उंबरठयाबाहेर समर्थपणे जगावं आणि उंबरठयाच्या आत मात्र पायाच्या अंगठयानं खाली (नसलेली) जमीन उकरावी अशी सोयिस्कर अपेक्षा करताना आपल्या समाजाची पुन्हा जुनीच गल्लत होते आहे. तिचं ठळक दर्शन घडतं ते अशा या भावनिक पिळवणुकीमध्ये!

भावनांचं अवडंबर वाढवावं तेवढं वाढतं, आवरावं तेवढं आटोक्यात आणता येतं; पण भावनांनी माणसाला आधार देण्यापेक्षा निराधार करण्याचीच शक्यता जास्त असते. अष्टौप्रहर घरात राहणाऱ्या स्त्रीला असलं ऐच्छिक निराधारपण पत्करणं आणि क्षणोक्षणी भावनांचे, विकारांचे, माणसांचे, भूमिकांचे टेकू घेणं परवडण्यासारखं होतं. नुकत्यानुकत्या घराबाहेर पडणाऱ्या, स्वतंत्रपणे–समर्थपणे जगू बघणाऱ्या स्त्रीला ही भावनिक चैन परवडण्यासारखी नाही. तिच्या जगण्याच्या धडपडीत तिला आधारही अधिक बळकट लागतील. ते विचाराचे असतील, विवेकाचे असतील, वाचन–चिंतन–मननातून आलेले असतील, उघडया डोळयांनी जग बघून आलेले असतील. ज्या माहेराचे आपण एवढे गोडवे गाइले तिथेच लग्न होऊन, नवऱ्याशी न पटल्यानं परत आलेल्या मुलीचं फारसं स्वागत होत नाही हे तिला दिसेल. आई, बाप, भाऊ या नात्यांनी सामोऱ्या येणाऱ्या व्यक्ती सदासर्वकाळ आपल्या स्वातंत्र्याची, व्यक्तिमत्त्वाची बूज राखू शकत नाहीत हेही तिला जाणवेल. हे जाणवणं म्हणजे तिच्या स्त्रीत्वाला बट्टा आहे, पुरुषीपण आहे, कोरडा व्यवहार आहे असं मानण्याचं काही कारण नाही. साधं मुलांच्या बाबतीत आपण पाहिलं तरी अलीकडे, जीवघेणी स्पर्धा, भ्रष्ट समाजजीवन, भविष्याविषयीची अनिश्चितता, आर्थिक ताण, कौटुंबिक जीवनाचा बदलता चेहरामोहरा यामुळे कित्येक मुलं अकाली प्रौढ झालेली आपल्याला दिसतात. क्षणभर आपल्याला त्यांची दयाही येते; पण पुन्हा विचार केल्यावर लक्षात येतं की, ज्या प्रकारच्या आयुष्याला त्यांना सामोरं जायचंय त्या दृष्टीनं ही पूर्वतयारी एका अर्थानं योग्यच आहे. जो साक्षेप आपण मुलांच्या बाबतीतही दाखवू शकतो तो स्त्रियांच्या वेळी जातो तरी कुठे ?

गृहिणीपण, बाईपण, आईपण, माहेरपण इत्यादी गोष्टींविषयी स्त्रियांची भावनिक पिळवणूक आता पुरे झाली ! 'आपलं बाह्यरूप बदललं असलं तरी आपण मनानं अजूनही जुन्याच आहोत' हे दाखवण्यासाठी खुद्द स्त्रियांनीही त्याला बळी पडण्याची आवश्यकता नाही. जरासाही मोकळेपणा वाटला, आदरातिथ्य झालं की लगेच 'माहेरी आल्यासारखं वाटलं' असं म्हणण्याची सक्ती त्यांच्यावर कोणीही केलेली नाही. अशी सक्ती बाहेरून, वेगवेगळया माध्यमांमधून होत असली तर त्यांनी ती झिडकारली पाहिजे आणि स्वतःच करत असल्या तर मात्र फारच ताकदीनं तिच्यातून सुटलं पाहिजे. स्वतःशी युद्ध सर्वांत कठीण असतं. □

# आपली मुलं

मुलं व्हायची आणि ती आपोआप वाढायचीच अशा समजुतीचा काळ आता मागे गेला.

पालकांचे काम दिवसेंदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणार असं दिसतं आहे.

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सांगेन तसं कसं वागेल ?

मुलांना चांगल्या–वाइटाचा विवेक शिकवणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे. आणि 'देणं' असं तरी कसं म्हणावं ? ते त्यांना घेता यावं असं वातावरण निर्माण करणं हे आपलं खरं काम आहे.

मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगणं, त्यांच्या मनातलं समजून घेणं, काही विसरणं, काही आठवणीनं उल्लेख करणं, वरचंस देणं आणि ग्रेसफुली घेणं अशी किती तरी कौशल्यं आपल्याला यायला हवीत.

मुलं वाढवण्याच्या निमित्तानं आपल्याला ही जाग यायला हवी. हे पुस्तक हसत–खेळत वाचताना सहजपणे अशी जाग यावी.

**राजहंसचे नवे प्रकाशन**

## आपली मुलं

**शोभा भागवत । किंमत २० रुपये**

# रंगभूमी

## औरंगाबादच्या ' जिगीषा 'चा नाट्यमहोत्सव

वि. भा. देशपांडे

मराठी रंगभूमीच्या संदर्भात व्यवसायाचा विचार केला तर तो मुंबईत मुख्यत्वेकरून आहे. तसेच हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीच्या अनेक महत्त्वपूर्ण घटना मुंबई–पुणे या दोन ठिकाणी घडतात असे आपण मानतो, पण अलीकडच्या काही वर्षांत मुंबई–पुणे सोडून अन्य काही महत्त्वाच्या गावी प्रायोगिक स्तरांवर लक्षवेधी नाट्यप्रयोग घडताना अनुभवाला येतात. उदाहरणार्थ सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, जालना, अकोला, औरंगाबाद, सांगली इत्यादी. ह्या ठिकाणच्या प्रयत्नांची, प्रयोगांची नोंद आणि दाद वेळच्या वेळी हाती येत नाही, त्यामुळे तिथल्या कलावंतांचाही अंदाज लागत नाही. त्यासाठी नेहमीचा एक मार्ग म्हणजे राज्यस्पर्धेत उतरून अंतिम फेरीत येऊन भरघोस यश मिळवायचे. त्यात यश मिळूनही तो प्रयोग सर्वदूर पोहोचेल अशी खात्रीही नाही ! अशा कुचंबलेल्या अवस्थेत अनेक हौशी–प्रायोगिक नाट्यसंस्था आहेत. त्यातून काही मार्ग तर काढायला हवाच. औरंगाबाद येथील ' जिगीषा ' या नाट्यसंस्थेने चार दिवसांचा एक नाट्यमहोत्सव घडवून आणला. त्यासाठी त्यांनी पुण्या-मुंबईच्या काहींना प्रमुख पाहुणे–विशेष अतिथी या नात्याने बोलावून हा महोत्सव ७ ते १० जून या काळात संपन्न केला.

### ' मदर्स हाउस '

या नाट्यमहोत्सवात पहिल्या दिवशी प्रशांत दळवीलिखित ' मदर्स हाउस ' या नाटकाचा प्रयोग पेश झाला. हे नाटक एका परकीय कल्पनेवर आधारित आहे; पण भाषांतरित नाही. एक स्त्री आणि तिची पाच मुले यांचे कुटुंब. पतिविहीन असलेली ही स्त्री आपल्या मुलांना प्रस्थापित समाजापासून दूर ठेवते. आपल्या मुलांनी कोणाच्याही अनुकरणात गुंतून पडू नये आणि समूहात व्यक्तित्वशून्य जगू नये अशी तिची अपेक्षा. आपल्या मुलांना स्वतःच्या गुणांवर स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त व्हावे म्हणून ती दक्ष राहते; पण अशा अवस्थेत असतानाच ती मरण पावते मुले निराधार होतात. त्यांचे जगण्याचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होतात. त्या जीवनाचे चित्रण नाटकात अतिशय प्रत्ययकारी पद्धतीने व्यक्त होते. प्रयोग पाहताना जाणवत होते की, पहिल्या अंकाच्या परिणामाची उंची तुलनेने दुसऱ्या अंकात कमी वाटली. दोन अंकी नाटकात प्रमाणापेक्षा प्रवेशसंख्या अधिक असल्याने त्यातले तुटकपण काहीसे जाणवले. अशा काही गोष्टी गृहीत धरूनही लेखनातला विषय – आशय आपल्यावर निश्चितच परिणाम करीत असतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रयोगाचे दिग्दर्शन आणि कलावंतांचा अभिनय. आईची भूमिका सौ. सुजाता कानगो यांनी केलेली होती. त्यांचे दिसणे, बोलणे, चालणे भूमिकेचे गांभीर्य राखून होते. त्यातला करारीपणा, वेगळेपणा उत्तमपणे व्यक्त होत होता. मुलांच्या भूमिकेत असलेले सारेच कलावंत आपल्या भूमिका चोख बजावीत होते. त्यामध्ये सरिता कुलकर्णी, आशुतोष भालेराव, मैत्रेयी चिन्मुळगुंद, निलेश विश्वनाथन् यांच्या तोडीस तोड उभी राहिलेली छोटी कलाकार अनिता वेताळ दीर्घकाळ ध्यानात राहील अशी आहे. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णीने पात्रांच्या केलेल्या विरचना, रंगमंचीय हालचाली, प्रसंगांतील ताणांचे क्षण काळजीपूर्वक आणि परिणामकारक रीतीने योजलेले होते. मिलिंद जोशीचे नेपथ्य नाटकाच्या वातावरणाला पोषक होते. घराची रचना आणि रंगसंगती वेधक होती. आलोक चौधरींची प्रकाशयोजना आणि प्रतीक्षा लोणकरचे संगीत, प्रयोगाची रंगत वाढवणारे होते. या नाटकाला या वर्षीच्या प्रथम आणि अंतिम फेरीत काही पारितोषिके मिळालेली आहेत. मुंबईच्या फेरीत क्रमांक मिळाला नाही तरी एक लक्षवेधी प्रयोग म्हणून त्याचे सर्वत्र कौतुक झाले ते किती यथायोग्य होते याचा प्रत्यय निश्चितच आला,

### दोन उत्तम एकांकिका

शरद कामतलिखित ' पावसाचं गाणं ' आणि प्रशांत दळवीची ' स्मशानातलं सोनं ' ह्या दोन एकांकिकांचे प्रयोगही तितकेच चांगले झाले. ' पावसाचं गाणं ' ही सामाजिक आशय व्यक्त करणारी, आजच्या तरुणपिढीचा जागता विचार व्यक्त करणारी दमदार एकांकिका आहे. यात गाण्याचा, समूहाचा वापर मोठ्या प्रमाणात आहे. मिलिंद जोशी, सफई, प्रतीक्षा लोणकर, अभय जोशी, दीपक दुधमांडे, प्रतिमा लोणकर, मंगल काट, राजेंद्र गोडबोले, चंद्रकांत कुलकर्णी, विजया वडवे, शुभांगी खारकर आणि प्रशांत दळवी ह्या कलाकारांनी एकांकिकेतील आशय समर्थपणाने पोहोचवला. ' स्मशानातलं सोनं ' ही अण्णाभाऊ साठे यांच्या कथेवर आधारलेली एकांकिका अभय जोशी आणि माधुरी दातार यांच्या अभिनयामुळे परिणामकारी झाली. त्यांना साथ दिली अनिता वेताळ, विवेक पत्की, संतोष शर्मा, किरण पाठक, राजेंद्र गोडबोले इत्यादींनी. दोन्ही एकांकिकांचे दिग्दर्शन चंद्रकांत कुलकर्णीचे होते.

' स्त्री ' – रौप्यमहोत्सवी प्रयोग.

चौथ्या दिवशी प्रशांत दळवीने लिहिलेल्या ' स्त्री ' एकांकिकेचा रौप्यमहोत्सवी प्रयोग पेश झाला. अकरा मुलींनी या एकांकिकेचे पंचवीस प्रयोग औरंगाबाद परिसरात केले ही अभिनंदनीय गोष्ट आहे. स्त्रीच्या जन्मापासून ते तिच्या जीवनातील विविध अव-

त्यांचे विदारक–भेदक दर्शन घडवीत, 'मी माणूस आहे', 'मला माणूस म्हणून जगायचे आहे' या सूत्रापर्यंतचा प्रवास यात घडवला. या एकांकिकेचा प्रयोग हा केवळ मनोरंजनाच्या पातळीवरचा नाटयप्रयोग नव्हता, तर तो एक अनुभव होता. प्रत्येकाला वेगवेगळया स्तरावर अंतर्मुख करून विचार करायला लावणारा होता. हा प्रयोग नेपथ्याविना कोठेही होऊ शकतो. थोडया वेळात दीर्घ परिणाम करू शकतो इतकी त्यात ताकद आहे म्हणूनच हा प्रयोग महाराष्ट्रातल्या अनेक गावी व्हायला हवा. विषय–आशय आविष्कार किंवा सादरीकरण यामध्ये कोठेही तसूभर कमी नसलेला असा हा अर्थपूर्ण 'प्रयोग' आहे. याची नोंद घेणे आणि दाद देणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर प्रयोगातल्या कलावतीचे कौतुक मनापासून करणे महत्त्वाचे आहे. यामध्ये मंगल काटे, शुभांगी खारकर, विजया बडवे, सुषमा बिंद्रू, उर्मिला कुलकर्णी, प्रतीक्षा लोणकर, निमा नेवासेकर, प्रतिमा लोणकर, सरिता कुलकर्णी, उज्ज्वला कुलकर्णी आणि आरती कुलकर्णी होत्या.

या एकांकिकेला जोडूनच 'गल्ली' ही एकांकिका आणि आदल्या दिवशी 'दिनूच्या सासूबाई...' हा फार्स पेश झाले.

चार दिवसांचा हा नाटयसहवास सुखाचा तर झालाच; पण स्मरणीय असाही झाला. तरुण मुलामुलींनी घडवलेला हा नाटयसहवास होता. जेमतेम कॉलेज पूर्ण झालेले किंवा अजून कॉलेजात असलेले असे हे सारे तरुण कलाकार आहेत. त्याना या नाटयाच्या जगात जिद्दीने, उत्साहाने काही करायचे आहे. या उत्साहाबरोबरच त्यांच्याकडे आवश्यक ती गुणवत्ता आहे. प्रशात दळवीसारखा नव्या उमेदीचा नाटयलेखक आहे, प्रतिभाशाली असलेला चंद्रकांत कुलकर्णीसारखा दिग्दर्शक आहे. सारे एकत्रित गुण्यागोविंदाने नादणारे आहेत. त्यासाठी आवश्यक ती सघभावना त्यांच्या ठिकाणी आहे. ही संस्था काही वर्षात औरंगाबादचे सांस्कृतिक भूषण ठरावे इतक्या मोलाची आहे लौकरच प्रशात दळवी, चंद्रकात कुलकर्णी ही नावे पुण्यामुबईतील नाटयवर्तुळात येऊन थडकणार आहेत, त्यांची नोंद गौरवाने घ्यावी लागणार आहे, इतक्या गुणवत्तेची आहेत. या साऱ्या महोत्सवाला माझ्याप्रमाणेच महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचालक कमलाकर सोनटक्के आणि औरंगाबादचे भूषण 'वऱ्हाड' वाले लक्ष्मण देशपांडे होते. यामुळे हा सहवास आणखी गडद झाला यात नवल नाही! □

---

# आदि शंकराचार्य

पृष्ठ ११ वरून

नसतील. चित्रपट पाहणे आणि त्याविषयी बोलणे हा भारतातल्या लक्षावधी लोकांचा नेहमीचा अंगवळणी पडलेला उद्योग आहे. चित्रपटव्यवसायातील सगळयाच घटकांना जे खास 'ग्लॅमर' आहे, ते दुसऱ्या कुठल्याच व्यवसायाला लाभलेले नाही. नुकत्याच शाळेत जाऊ लागलेल्या पोराटोरांपासून ते आयुष्याची संध्याकाळ अनुभवणाऱ्या मंडळींपर्यंत आणि क्लब–पार्टीज् एटिकेट्सच्या संस्कृतीतल्या 'हाय सोसायटी' वाल्यांपासून ते पानाच्या ठेल्यावर गर्दी करणाऱ्या 'लेबर क्लास' पर्यंत सर्वांना चित्रपटाचे समान आकर्षण आहे. भारतातली चित्रपटवर्तुळातली प्रत्येक हालचाल रेडिओ–लहरीप्रमाणे 'हाय फ्रिक्वेन्सी'ची ठरते. त्यामुळे एका वर्षात भारताच्या घटनात्मक भाषांपैकी १० भाषात एकूण ७५० चित्रपट निघाले, ही माहिती आश्चर्यकारक असली, तरी अविश्वसनीय वाटत नाही. या १० भाषांपैकी सर्वाधिक चित्रपट हिंदी आणि तेलुगू या भाषामध्ये निघाले.

आम्हाला दोघांनाही चित्रपटाचे एवढे वेड नाही. (टी. व्ही. च्या कृपेमुळे मुलाचा चित्रपटाची चटक मात्र हळूहळू वाढत आहे) तरीही कलात्मक चित्रपट पाहणे हा एक हवाहवासा अनुभव आहे. म्हणून राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवाचे आकर्षण; पण यंदा पंजाबच्या कारवाईमुळे दिल्लीतले वातावरण अस्थिर बनलेले. महोत्सवाचा कार्यक्रम जाहीर झाला तेव्हा पंजाबमध्ये राज्यभर कर्फ्यू लागलेला होता आणि सैन्याने सुवर्णमंदिराला वेढा घातलेला होता. पंजाबच्या विश्वासार्ह बातम्या मिळत नव्हत्या. अफवा शंकाकुशंका याचे पेव फुटलेले होते. कुठल्याही क्षणी सैन्य सुवर्णमंदिरात प्रवेश करील, हे सगळयानाच ठाऊक होते आणि दिल्लीतल्या शिखाची मने त्या चाहुलीने हळुवार बनलेली होती. आदल्या दिवशी आमचा सरदारजी घरमालक मोठ्या दु:खाने म्हणाला होता, अब तो वो एंटर भी करेंगे तो भी पता नही चलेगा ? मी जेव्हा टोकले की, आता त्याविना पर्यायच उरलेला नाही, तेव्हा तो उसळून म्हणाला होता की, कुणी केली ही परिस्थिती निर्माण ? राजकर्त्यांनीच ना ? निवडणुका जवळ आल्या की, काही तरी स्टंट होणारच.' अशा ताणलेल्या परिस्थितीत चित्रपटमहोत्सवात हजेरी लावणे जरा धोक्याचेच होते. गेल्या दोन वर्षांमध्ये चित्रपटगृहात झालेले बॉबस्फोट आठवत होते रस्त्यावर अशांतता निर्माण झाली तर चित्रपटाना जाणे–येणे कसे शक्य होईल, या प्रश्नाचे उत्तर सापडत नव्हते.

'खंडहर' आणि 'सूखा' नंतर कधीही पाहता येतील. बाकीच्या प्रादेशिक भाषातले चित्रपट टी. व्ही. वर कधी तरी पाहयला मिळतील; पण 'आदि शंकराचार्य' टी. व्ही वर येईल की नाही, सागता येत नाही आणि येणार असला तरी तोवर थाबायचे कुणी ? कारण १९८४ मध्ये सस्कृत भाषेतील चित्रपट तयार होतो, याचेच एक प्रचंड कुतूहल होते. पुन्हा तो चित्रपट सर्व भाषांतील सर्व चित्रपटांमध्ये प्रथम पारितोषिक मिळवलेला. वैदिक धर्माचे हरपत चाललेले वैभव रोखून धरणाऱ्या असामान्याची कहाणी आज लुप्त होत चाललेल्या अतिप्राचीन वैभवशाली भाषेत सादर करणारा हा प्रथम दर्जाचा चित्रपट पाहण्याची आतुरता अनावर होती. त्यामुळे बाहेरची परिस्थिती कशीही असो, हा एक चित्रपट तरी महोत्सवात पाहयचाच असे मनोमन ठरवून टाकले. तिकिटे काढायला गेल्यावर अपेक्षेप्रमाणेच अनुभव आला. 'खंडहर' आणि 'सूखा' या हिंदी चित्रपटांची तिकिटे पहिल्याच दिवशी हातोहात उडालेली, इतर प्रादेशिक भाषातील चित्रपटाची तिकिटविक्री चालू आणि 'आदि शंकराचार्य' करिता बाल्कनीच्या ३०० खुर्च्यांपैकी फक्त २५ खुर्च्यांची तिकिटे संपलेली. बाकी सगळा प्लॅन मोकळाच! तेव्हा तिकिटे तर विनासायास मिळाली. आता परिस्थितीचा प्रश्न उरला. ती रोज अधिकाधिक गभीर होत होती.

दि. ६ ला सध्याकाळी आम्ही दोघे NCERT च्या होस्टेलवर काही पाहुण्यांना भेटायला चाललो होतो. सचिवालयापाशी अवाजवी शांतता जाणवली. बस सोडताना कंट्रोलरने ड्रायव्हरला 'अमुक रस्त्याने घे.

तिकडे काही गडबड नाही,' असे म्हटले तेव्हा मनात शंकेची पाल चुकचुकली. थोडे पुढे गेल्यावर एका प्रवाशाच्या हातात 'ईव्हनिंग न्यूज' दिसला. त्यात मोठी हेडलाइनच होती. 'सैन्याचा सुवर्णमंदिरात प्रवेश. लोंगोवाल आणि तोहरा यांची शरणागती. भिंद्रनवाले यांचा पत्ता नाही!' आम्ही NCERT मध्ये गेलो आणि परत आलो. काहीही विपरीत पाहयला मिळाले नाही. बंगलासाहेब गुरुद्वारवरून बस आली की नाही ते गर्दीमुळे नीट कळलेच नाही. घरी आल्यावर रात्री नऊच्या बातम्यांत सैन्याच्या कारवाईचा अधिकृत तपशीलही समजला आणि बंगलासाहेब गुरुद्वारापाशी झालेल्या गडबडीचीही माहिती कळली. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. ७ ला अकाली दलाच्या दिल्ली शाखेने, 'दिल्ली बंद' चे आवाहन केले होते. काही गडबड होण्यापूर्वीच विद्यापीठात जाऊन यावे म्हणून लौकरच निघालो. विद्यापीठाच्या वाटेवरील बहुतेक सगळी दुकाने उघडीच होती सर्व व्यवहार नित्याप्रमाणे चालले होते. बसमध्ये सर्व चर्चा पंजाबमधील सैन्याच्या कारवाईविषयीच चाललेली होती. झाले ते दु:खद असले, तरी अपरिहार्य होते, असाच एकंदर सर्वांचा सूर होता. बसमध्ये शीख विद्यार्थीही होते. ते चर्चेत भाग घेत नसले, तरी शांत होते. विद्यापीठातले वातावरणही नेहमीचेच होते. काम आटोपून लौकर दुपारी घरी परतलो. सध्याकाळच्या टी. व्ही. च्या बातम्यातून समजले की, बंगलासाहेब गुरुद्वारापाशी उग्र निदर्शने झाली. बसेसवर आणि वाहनावर दगडफेक झाली. एका घराला आग लावण्याचा प्रयत्न झाला. पोलिसांना अश्रुधूर आणि गोळीबार करावा लागला. त्यामध्ये दोघाचे मृत्यू झाले. हे सगळे झाले तरी आम्हाला त्याचा पत्ताच नव्हता. दिल्लीमध्ये हे एक विशेषत्वाने जाणवते. कुठे तरी काही तरी अघटित घडत असले, तरी इतर बऱ्याचशा भागांना त्याचा पत्ताच नसतो. मात्र ह्या पार्श्वभूमीवर उद्याच्या 'आदि शंकराचार्य' चे काय होणार हा प्रश्न आमच्यापुढे उभा राहिला.

तरीदेखील 'कालचा प्रकार हा केवळ तात्कालिक भावनोद्रेक होता' हे सकाळच्या वर्तमानपत्राचे माध्य प्रमाण मानून आम्ही १२.३० च्या चित्रपटासाठी मुलांसह निघालो. शीला चित्रपटगृहाची बाल्कनी पूर्ण भरलेली पाहून सुखद आश्चर्याचा धक्का बसला; पण खाली पाहिल्यावर मात्र पाऊण हॉल रिकामाच दिसला. याचा अर्थ फक्त विशिष्ट वर्गातील प्रेक्षकांनीच चित्रपटाला गर्दी केली होती. सर्वसामान्य प्रेक्षक या चित्रपटाबाबत उदासीन होता. ते स्वाभाविकही होते.

चित्रपट सुरू होताच केरळच्या रमणीय निसर्गसौंदर्याचे अत्यंत विलोभनीय दृश्य पडद्यावर दिसले आणि अक्षरश: डोळे तृप्त झाले. निसर्गाचे बहारदार रंग या चित्रपटात कॅमेऱ्याने फारच आल्हादक रीतीने टिपले आहेत. संबंध चित्रपटभर प्रेक्षणीय स्थळांची भव्य पार्श्वभूमी सतत पडद्यावर राहिली आहे. कन्याकुमारीचा उसळता समुद्र, हिमालयाची उत्तुंग हिमशिखरे, नर्मदा, गंगा, तुंगभद्रा इत्यादी नद्यांचे खळाळते जीवनप्रवाह त्यांच्या त्यांच्या सव वैभवानिशी साकार झाले आहेत. रंग, प्रकाश आणि छाया यांचे सुरेख आकृतिबंध या चित्रपटाला प्रभावशाली बनवताना दिसतात. काशी, प्रयाग, हरिद्वार, बद्रिकेदार इत्यादी तीर्थक्षेत्र त्यांच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वासह प्रकट झाली आहेत. कुणीसे या चित्रपटाचे वर्णन ' tourist film of export quality 'असे अर्धवट चेष्टेने केले होते, ते चांगल्या अर्थाने यथार्थ आहे. आदि शंकराचार्य हे भारतातले सर्वार्थाने पहिले खरे यात्रिक होते. भारतभर ते हिंडले आणि आपल्या जीवनाचा संदेश त्यांनी कानाकोपऱ्यात पोचवला. त्यांची ही सहेतुक भ्रमंती या चित्रपटाने जाणत्या नजरेने टिपली आहे.

## गांभीर्याचा ठसा

आदि शंकराचार्यांच्या झपाटलेल्या ध्येयप्रखर जीवनाचे धागे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात त्यांच्या बालपणापासूनच गुंफले गेले असणार या चित्रपटाने शंकराचार्यांच्या बालपणाला यथायोग्य न्याय दिला आहे. बाल शंकराचार्यांची भूमिका ज्या समजदारपणाने आणि ज्या ताकदीने उभी केली गेली आहे, त्याला तोड नाही. या बालकलाकाराचा चेहरा विलक्षण सात्त्विक, तेजस्वी आणि डोळे बोलके आहेत. आपली प्रेमळ ऋजू आई, करारी ब्रह्मनिष्ठ वडील आणि भोवतालचे धर्मसापेक्ष वातावरण यातून संस्कार घेत घेत शंकर घडत जातो, हे चित्रपटातून जिवतपणे जाणवते. मृत्यु व विज्ञान या सवंगड्याबद्दलचे त्यांचे निरागस प्रेम, वडिलांविषयीची श्रद्धा, वैदिक धर्माच्या अंतर्गत स्वरूपाची त्याला होत जाणारी तीव्र जाणीव, परिणामत: संन्यासाविषयीचे अनिवार आकर्षण आणि या पार्श्वभूमीवर 'अम्ब, अहं संन्यासी भवामि' हा आईकडे घेतलेला हट्ट हे सगळे ज्या बोलकेपणाने साकार झाले आहे, ते प्रत्यक्ष पहायलाच हवे. तत्कालीन वातावरणनिर्मितीही अतिशय प्रभावीपणाने साधलेली आहे. चित्रपट आपली कालरेषा ओलांडून कुठेही सरकत नाही. प्रत्येक प्रेक्षक आपोआपच त्या काळात मनाने ओढला जातो, समरस होतो. सगळ्या बारकाव्यांची परिपूर्णता हे त्याचे प्रमुख कारण आहे. तत्कालीन वेषभूषा, गृहरचना, चालीरीती यांचे अभ्यासपूर्ण चित्रण करण्यात आलेले आहे. वैदिक ब्राह्मणाचे घर, विद्वान आचार्यांचे आश्रम, पंडिती गृहस्थाचे घर हे सर्व परिसर सांस्कृतिक आणि सामाजिक स्पंदनासह उभे केले गेले आहेत.

शंकराचार्यांची प्रमुख भूमिका हे खरोखरी एक मोठे आव्हान होते आणि ते एस. डी. बॅनर्जी या गुणी नटाने चांगले पेललेले आहे. शंकराचार्यांच्या व्यक्तिमत्त्वातील शांती, चारुता आणि विदग्धता त्याने पुरेपूर अंगी बाणवून घेतली आहे तत्त्वज्ञानी, अभ्यासक, आध्यात्मिक कवी, संत, समाजसुधारक व संघटक हे शंकराचार्यांच्या जीवनचरित्राचे विविध पैलू परिणामकारकतेने उजळलेले आहेत सृष्टिक्रमातील पंचभूतात्मक यज्ञाचे स्पष्टीकरण करताना शंकराचार्यांच्या मुद्रेवर उजळलेला अनुभूतीचा आत्मविश्वास, वेदांचे संपादन आणि संशोधन करताना त्यांच्या रोमरोमातून व्यक्त होणारी अधीर ज्ञानपिपासा, अन्नपूर्णेचे अथवा गंगेचे स्तोत्र रचताना डोळ्यांमध्ये प्रगटलेला गाढ भक्तिभाव, कालीमातेला बळी देण्यासाठी घेऊन जाणाऱ्या कापालिकांच्या मागून जाताना दिसणारा निर्भय नि:संगपणा, गूढ तत्त्वज्ञानाचे प्रश्न विचारून निरुत्तर करणाऱ्या चांडालाच्या चरणांचे वंदन करताना आविर्भूत होणारा क्रांतिकारी निर्धार आणि अहमहमिका करून बसून बसलेल्या शिष्यवरांची समजूत काढून त्यांना कार्यप्रवण करणारी स्फूर्तिदायी प्रेरकता हे सर्व अतिशय यथार्थपणे बॅनर्जींनी उभे केले. त्यातून शंकराचार्यांच्या जीवनातले विविध प्रसंग सघन नाट्यमयतेने रंगत गेले वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी हिमालयाच्या हिमाच्छादित रांगामध्ये केदारनाथजवळ झालेली शंकराचार्यांच्या जीवनाची समाप्ती हा सर्वांचा कळसबिंदू होता—मनावर गांभीर्याचा ठसा उमटवणारा.

शंकराचार्यांची आई, वडील, बालमित्र,

चार प्रमुख शिष्य, मंडनमिश्र, त्यांची पत्नी या सर्वांच्याच भूमिका वैशिष्टयपूर्ण आहेत. जिवंत आहेत.

एका शांत गंभीर जीवननाटयाचे प्रत्यय-कारी दर्शन घडविण्यात निर्माते जी. व्ही. अय्यर पूर्णपणे यशस्वी झालेले आहेत.


पात्रांच्या संस्कृत भाषेबद्दलही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. अतिशय स्वाभाविक आणि सोपी, अर्थपरिप्लुत संस्कृत भाषा चित्र-पटात आढळते. संस्कृतचे थोडेसे जुजबी ज्ञान असणाऱ्यालाही मुद्राभिनयाच्या संगतीने ती समजून घ्यायला कठीण जाऊ नये. ज्यांना ते जमणार नाही, त्यांच्यासाठी इंग्लिश सब-टायटल्स आहेतच.

विस्मृत होत चाललेल्या एका गौरवशाली सांस्कृतिक संचिताचा अनुभव या चित्रपटाने दिला. आसेतुहिमालचल एका संस्कृतीच्या धाग्याने हा देश एकसंघपणे गुंफून जोडण्याचे स्वप्न बाळगून त्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या एका महामानवाचे यथार्थ दर्शन या चित्र-पटाने घडविले.

फुटीरतावादाच्या शापाची फळे भोगणाऱ्या अस्वस्थ आणि अशांत परिस्थितीच्या पार्श्व-भूमीवर ते विशेषच हृदयस्पर्शी वाटले.

—निशिकांत मिरजकर, दिल्ली

---



# मनःचक्षूचे सामर्थ्य

**तुम्हाला मानसचित्रांचा उपयोग तुमच्या क्लेशदायक भावना व आत्मघातकी वर्तन बदलण्यासाठी करावयाचा असेल, तर प्रथम तुम्ही तुमच्या डोक्यात मानसचित्रे निदान काही अंशी तरी स्पष्ट व तपशीलवारपणे रेखाटण्याचे कौशल्य संपादन केले पाहिजे आणि हे कौशल्य मिळवण्यासाठी तुम्हाला नेटाने प्रयत्न करावा लागेल.**

□

लेखांक : दुसरा । लेखक : कि. मो. फडके

## मानसचित्रे रेखाटण्याची कला

---

**मी** जेव्हा रेखाला मदत करावयास सुरुवात केली तेव्हा थोडयाच वेळात माझ्या असे लक्षात आले की, तिला तिच्या डोक्यातील मानसचित्रांची किंवा प्रतिमासृष्टीची जाणीव करून देणे, हे काम काही सोपे नव्हते. पहिल्याच भेटीत मी जर तिला असे विचारले असते की, ' रेखा, गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करणे या प्रसंगाविषयी तुझ्या डोक्यात कोणत्या प्रतिमा किंवा मानसचित्रे संचारत असतात ?' तर ती गोंधळली असती. म्हणून प्रतिमा किंवा मानसचित्रे यांची तिला ओळख करून देण्यासाठी, मी एका सोप्या पद्धतीचा उपयोग केला. त्या पद्धतीचे स्वरूप आम्हा दोघांमधील झालेल्या पुढील संवादावरून स्पष्ट होईल.

मी : रेखा, तू कधी विक्रमच्या कचेरीत गेली आहेस का ?

रेखा : हो. आमच्या विवाहाच्या अगोदर व नंतरही मी कधी कधी विक्रमच्या कचेरीत गलेली आहे.

मी : मग मला सांग की, ज्या इमारतीत विक्रमची कचेरी आहे त्या इमारतीच्या तळमजल्याच्या दर्शनी भागास किती खिडक्या आहेत ?

रेखा : (थोडा वेळ थांबून) मला वाटते आठ खिडक्या आहेत.

मी : ठीक. आता मला असे सांग की, उत्तर देण्यापूर्वी तू काय करीत होतीस ?

रेखा : मला वाटते मी माझ्या डोळयांपुढे त्या इमारतीचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला व नंतर त्या चित्रात दिसल्या तेवढया खिडक्या मोजल्या.

मी : दिसल्या तेवढया खिडक्या ?

रेखा : म्हणजे त्या चित्रात इमारतीच्या तळमजल्याच्या दर्शनी भागात ज्या खिडक्या दिसल्या त्या मी मोजल्या.

मी : बरोबर आहे. म्हणजे आज या घटकेला जरी तुझ्या डोळयांसमोर प्रत्यक्ष काही ती इमारत नाही, तरी तू त्या इमारती-कडे मनःचक्षूच्या साहाय्याने पाहू शकलीस, असेच ना ?

रेखा : हो. तुमच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी मी त्या इमारतीचे एक मानसिक चित्र माझ्या डोक्यात उभे केले; पण ते चित्र काही अगदी हुबेहुब प्रत्यक्ष त्या इमारतीप्रमाणे माझ्या डोक्यात उभे राहिले नव्हते.

मी : शक्य आहे; परंतु तुला मानसचित्रे किंवा प्रतिमा म्हणजे काय ते नीट समजले ना? तसेच, एखादे मानसचित्र तू तुझ्या डोक्यात कल्पनेच्या कुंचल्याने रेखाटू शकतेस हेही तुला पटले ना?

रेखा : हो. त्या दोन्ही गोष्टी मला अगदी नीट समजल्या आहेत.

आम्हा दोघामध्ये झालेल्या वरील संवादातील, रेखाच्या एका उत्तराची विशेष दखल घेणे आवश्यक आहे. विक्रमची कचेरी ज्या इमारतीत होती, त्या इमारतीचे चित्र जेव्हा रेखा तिच्या मन.चक्षूपुढे उभे करण्याचा प्रयत्न करीत होती, तेव्हा ते चित्र तिच्या मनःपटलावर अगदी मूळ इमारतीप्रमाणे काही हुबेहुब उमटले नव्हते, असे ती म्हणाली.

कल्पनेच्या कुंचल्याने माणूस आपल्या मन पटलावर जी चित्रे किंवा ज्या प्रतिमा रगवितो त्यांचे स्वरूप समजावून घेण्याच्या दृष्टीने रेखाचे वरील विधान महत्त्वाचे आहे. काही माणसे कल्पनेच्या कुंचल्याने आपल्या मनःपटलावर चित्रे अथवा प्रतिमा अनेक तपशिलांसकट व सुस्पष्टपणे रंगवू शकतात. उलट, रेखासारखी काही माणसे कल्पनेच्या कुचल्याने आपल्या मन.पटलावर जी चित्रे किंवा ज्या प्रतिमा रगवितात, त्याचे स्वरूप स्पष्ट व रेखीव नसते. त्यांनी रेखाटलेली मानसचित्रे ढोबळ, अधुक व चटकन नाहीशी होणारी असतात. तुम्हाला मानसचित्रांचा उपयोग तुमच्या क्लेशदायक भावना व आत्मघातकी वर्तन बदलण्यासाठी करावयाचा असेल; तर प्रथम तुम्ही तुमच्या डोक्यात मानसचित्रे निदान काही अंशी तरी स्पष्ट व तपशीलवारपणे रेखाटण्याचे कौशल्य सपादन केले पाहिजे आणि हे कौशल्य सपादन करण्यासाठी तुम्हाला नेटाने प्रयत्न करावा लागेल.

आपल्या डोक्यात कल्पनेच्या कुंचल्याने विशिष्ट चित्रे किंवा प्रतिमा हुकमीपणे रंगविण्यास शिकणे, या प्रक्रियेला 'प्रतिमासाधन' असे म्हणता येईल. या प्रकरणाच्या अभ्यासामुळे तुम्हाला प्रतिमासाधनाच्या काही पद्धती आत्मसात करता येतील. एकदा तुम्ही तुमच्या मनात, अगदी कॅमेऱ्याने टिपल्याप्रमाणे नाही, तरी निदान प्रमाणात सुस्पष्ट व रेखीव प्रतिमा रेखाटण्याचे कौशल्य सपादन केलेत की, तुम्हाला या पुस्तकातील पुढचे धडे शिकणे सोपे जाईल, असे म्हणावयास हरकत नाही.

–एक साधी कसोटी–

तुम्ही तुमच्या मनःचक्षूपुढे विविध तऱ्हेच्या प्रतिमा किती स्पष्टपणे रेखाटू शकता हे अजमावून पाहण्यासाठी खाली दिलेला एक साधा प्रयोग करून पाहा.

या प्रयोगात तुम्हाला क्रमाक्रमाने काही प्रतिमा मनःपटलावर रेखाटण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या सूचनांनुसार तुम्ही तुमच्या मनःपटलावर रेखाटलेली प्रतिमा जर 'अतिशय सुस्पष्ट आहे' असे तुम्हाला वाटले, तर तुम्ही स्वतःला ४ गुण द्या. तुम्ही तुमच्या मनःपटलावर रेखाटलेली प्रतिमा 'खूप स्पष्ट आहे' असे तुम्हाला वाटले, तर तुम्ही स्वतःला ३ गुण द्या. तुम्ही तुमच्या मनःपटलावर रेखाटलेली प्रतिमा 'बरीच स्पष्ट आहे' असे तुम्हाला वाटले, तर तुम्ही स्वतःला २ गुण द्या. तुम्ही तुमच्या मनःपटलावर रेखाटलेली प्रतिमा 'अस्पष्ट आहे' असे तुम्हाला वाटले, तर तुम्ही स्वतःला १ गुण द्या आणि जर समजा तुम्ही तुमच्या मन पटलावर रेखाटलेली प्रतिमा 'फारच अस्पष्ट आहे' असे तुम्हाला वाटले, तर तुम्ही स्वतःला ० गुण द्या.

## भाषा व प्रतिमा

खाली एकूण वीस प्रतिमा क्रमाक्रमाने तुम्ही तुमच्या मनःपटलावर कशा रगवाव्यात यासबंधी सूचना दिलेल्या आहेत. प्रत्येक सूचना वाचून झाल्यावर, डोळे मिटून तुम्ही अपेक्षित प्रतिमा तुमच्या मनःपटलावर चित्रित करण्याचा कसोशीने प्रयत्न करा आणि नंतर डोळे उघडून स्वतःला वर सागितल्याप्रमाणे ४, ३, २, १ अथवा ० असे गुण द्या.

प्रतिमा क्रमांक — सूचना — गुण

१. तुम्हाला अतिशय प्रिय असलेली व्यक्ती तुमच्यासमोर उभी आहे.
२. तुम्हाला अतिशय प्रिय असलेली व्यक्ती खदखदून हसत आहे.
३. तुम्हाला अतिशय प्रिय असलेल्या व्यक्तीचे डोळे.
४. फळानी भरलेली करंडी.
५. तुम्ही रानातील पाऊलवाटेवरून एकटेच चालत आहात.
६. तुम्ही तुमची खोली झाडून स्वच्छ करीत आहात.
७. ज्या शाळेत तुम्ही शिकलात ती शाळा.
८. हिरव्यागार गवताने आच्छादलेला नदीचा तीर.
९. तुम्ही एका दुकानाच्या खिडकीतून आतील वस्तू पाहण्यात गर्क आहात.
१०. चित्रपटगृहातील पांढरा शुभ्र पडदा.
११. कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज.
१२. दिवाळीच्या दिवशी ऐकू येणारे फटाक्याचे आवाज.
१३. तुम्ही गरम पाण्याने स्नान करीत आहात.
१४. तुम्ही खडबडीत दगडी भिंतीवरून हात फिरवीत आहात.
१५. लिंबाच्या सरबताची चव
१६. तुम्ही अरुंद पण उंच जिना चढून जात आहात.
१७. ज्या पिशवीत चार किलो बटाटे आहेत ती तुम्ही उचलीत आहात.
१८. तुम्ही श्रीखंड खात आहात.
१९. खमंग फोडणीचा वास.
२०. हिरव्या चाफ्याच्या फुलाचा वास.

हा प्रयोग पूर्ण झाल्यावर, तुम्ही तुमच्या सर्व गुणांची बेरीज करा व तुम्हाला एकूण किती गुण मिळाले ते पाहा. जर तुम्हाला एकूण ८० गुण मिळाले असतील, तर त्याचा अर्थ असा की, वरील सर्व प्रतिमा तुम्हाला अतिशय सुस्पष्टपणे अनुभवता आल्या होत्या. फारच थोड्या लोकाना वरील प्रयोग केल्यावर एकूण ८० गुण मिळतात, हे लक्षात घ्या; परंतु तुमच्या गुणांची बेरीज जर ६० किंवा त्याहून अधिक झाली असेल तर काल्पनिक अनुभव घेण्याचे सामर्थ्य चांगलेच विकसित झालेले आहे असे म्हटले पाहिजे. तुमच्या

गुणांची बेरीज ३० पेक्षा कमी झाली असेल, तर या पुस्तकाचा फायदा करून घेण्यासाठी तुम्हाला प्रथम बरीच 'साधना' करावी लागेल. ती साधना करण्याचा एक मार्ग म्हणजे तुम्ही तुमच्या मनःपटलावर वरील सूचनांनुसार प्रतिमा रेखाटण्याचा सराव करणे. काही दिवसांनी तुमची या कलेत जरूर तेवढी प्रगती होईल. अर्थात, तुमच्या गुणांची बेरीज ३० पेक्षा अधिक झाली असेल, तर या पुस्तकाचा उपयोग करून तुम्हाला तुमचे जीवन जास्त सुखी व समृद्ध करण्यात अडचण येणार नाही.


काही माणसांना मानसचित्रे रेखाटण्याचे काम अवघड वाटते. कारण त्यांना मनुष्याच्या विचार करण्याच्या प्रक्रियेचे नीट आकलन झालेले नसते. म्हणून त्यांना वारंवार असे समजावून सांगावे लागते की, मनुष्य जेव्हा विचार करतो तेव्हा तो काही फक्त शब्दांच्या अथवा वाक्यांच्या माध्यमाचांच उपयोग करतो असे नाही; त्याच्या विचारप्रवाहात, शब्दबद्ध न झालेले अनेक संवेदनात्मक अनुभवही मिसळलेले असतात. समजा एखादा माणूस आपली नोकरी जाईल या चिंतेने अस्वस्थ झाला असेल तर तो मनातल्या मनात स्वतःला काही वाक्ये सांगत असतो; परंतु त्याच वेळी त्याच्या डोक्यात, खरोखरच आपली नोकरी गेली तर काय होईल यासंबंधी कमी-अधिक स्पष्ट मानसचित्रे धिंगाणा घालीत असतात. उदाहरणार्थ, त्याच्या मनःचक्षूपुढे, त्याच्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या कुटुंबियांचे हवालदिल झालेले चेहेरे, तो स्वतः दुसरी एखादी नोकरी मिळविण्यासाठी अर्ज खरडीत आहे किंवा लाचारी पत्करून कोणाची तरी भेट घेत आहे इत्यादि अनेक प्रतिमा किंवा चित्रे तरळून जात असतात आणि या मानसचित्रांमुळे त्याची चिंता अधिकच तीव्र स्वरूप धारण करू लागते.

माणसाच्या मनोव्यापारात भाषा व प्रतिमा या दोन्ही गोष्टी कशा अंतर्भूत झालेल्या असतात हे खालील प्रयोग करून तुम्हाला स्वतःला अनुभवता येईल.

पहिला प्रयोग म्हणजे, तुमच्या जीवनात जी एखादी घटना तुम्हाला मनसोक्त आनंद प्राप्त करून देत असेल, त्या घटनेचा विचार करा. थोडा वेळ लागला तरी चालेल. आता हे पुस्तक खाली ठेवून त्या घटनेशी निगडित असलेल्या अनेक आठवणींची व संवेदनांची उजळणी करा.

आता दुसरा प्रयोग करून पाहा. तुमच्या जीवनातील जी एखादी घटना तुम्हाला कमालीची चिंताग्रस्त करीत असेल, त्या घटनेचा विचार मनात आणा. आता हे पुस्तक खाली ठेवा. तुम्हाला कोणत्या कल्पना व शारीरिक संवेदना जाणवत आहेत त्यांकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. तसेच, नेमक्या कोणत्या शारीरिक संवेदना तुम्हाला भयभीत व अस्वस्थ करीत आहेत ते समजावून घेण्याचा प्रयत्न करा.

वरील दोन्ही प्रयोग तुम्ही करून पाहिले असतील तर ते प्रयोग करीत असताना तुमच्या मनात काय चालले होते ते समजावून घेणे सुलभ होईल. तुम्ही वरील प्रयोग करीत होतात तेव्हा तुमच्या मनात फक्त काही शब्द आणि वाक्येच वावरत होती काय ? तुमच्या मनःचक्षूपुढे काही आकृत्या किंवा प्रतिमा झरझर सरकत नव्हत्या काय? त्या प्रतिमा स्पष्ट होत्या का अस्पष्ट होत्या, हा मुद्दा गौण आहे. इतके मात्र खरे की, सामान्यतः वरील दोन प्रयोग करून पाहाणाऱ्यांच्या असे लक्षात येते की, त्यांच्या मनोव्यापारात भाषेच्या जोडीने अनेक प्रतिमाही सहभागी होत असतात. त्यावरून असे अनुमान काढता येईल की, वरील दोन प्रयोग करून पाहिल्यामुळे तुम्हालाही तुमच्या मनोव्यापारात वापरणाऱ्या प्रतिमांची जाणीव झाली असेल.



## हुकमी प्रतिमा

तुमच्या मनातील प्रतिमासृष्टी अधिकाधिक सुस्पष्ट व रेखीव करून, तिला तुमच्या हुकमतीखाली आणण्यासाठी पुढे आणखी चार प्रयोग दिले आहेत. ते प्रयोग पुन्हा-पुन्हा करून पाहून, स्वतःच्या इच्छेनुसार हव्या त्या प्रतिमा स्वतःच्या मनःपटलावर रंगविण्याचे कसब तुम्हाला आत्मसात करता येईल. प्रत्येक प्रयोग करताना तुम्ही डोळे मिटून, आरामात खुर्चीत बसा व इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष देऊ नका.

प्रयोग १ :– मूळाक्षरे –

प्रथम अशी कल्पना करा की, तुमच्यापुढे शाळेत असतो तसा एक मोठा फळा आहे व त्या फळ्यावर तुम्ही खडूने 'अ' हे अक्षर लिहीत आहात. लिहिलेत ? आता तुम्ही खडूने 'आ' हे अक्षर फळ्यावर लिहीत आहात, अशी कल्पना करा. झाले लिहून ? आता तुम्ही खडूने 'इ' हे अक्षर फळ्यावर लिहीत आहात, अशी कल्पना करा. याच पद्धतीने, मराठी भाषेतील मूळाक्षरे क्रमाक्रमाने तुम्ही खडूने फळ्यावर लिहीत आहात, अशी कल्पना करा. अशा प्रकारे तुम्ही किती मूळाक्षरे फळ्यावर लिहू शकता ते पाहा.

तुम्ही एकानंतर एक मूळाक्षरे फळ्यावर लिहीत होतात, तेव्हा तुमच्या मनात काय चालले होते बरे ? तुमच्या मनःचक्षूला, अगोदर लिहिलेली अक्षरे अस्पष्टपणे दिसू लागली होती का ? तुमचा अनुभव नीट समजावून घ्या आणि कल्पनेच्या सहाय्याने दर वेळी पहिल्यापेक्षा जास्त मूळाक्षरे लिहिण्याचा प्रयत्न तर कराच; पण ती अक्षरे मनःचक्षूच्या मदतीने अधिकअधिक सुस्पष्ट व रेखीव स्वरूपात पाहाण्याचाही प्रयत्न करा.

प्रयोग २ – विजेचा दिवा –

अशी कल्पना करा की, तुमच्यापुढे एक विजेचा अंधुक दिवा टांगून ठेवला आहे व तो दिवा हळूहळू जास्त प्रकाशमान व झग-

झगीत दिसू लागला आहे. अशा विजेच्या दिव्याची प्रतिमा तुम्ही तुमच्या मन:पटलावर रेखाटलीत काय ? ठीक. आता अशी कल्पना करा की, तो दिवा हळूहळू निस्तेज व अधुक होऊ लागला आहे मग अशी कल्पना करा की, तो दिवा हळूहळू परत इतका प्रकाशमान व झगझगीत होऊ लागला आहे की, त्यामुळे खोलीतील सर्व गोष्टी तुम्हाला स्पष्टपणे दिसू लागल्या आहेत. छान ! आता अशी कल्पना करा की, तो दिवा हळहळू परत अधुक व निस्तेज होत जाऊन परत अगदी पहिल्यासारखा दिसू लागला आहे.

☐ प्रयोग ३ – पुस्तक-निरीक्षण –

तुमच्या हातातील हे पुस्तक नीट पाहून घ्या. त्या पुस्तकाचे अगदी बारकाईने निरीक्षण करा. त्याचा आकार कसा आहे, त्याचे मलपृष्ठ कसे आहे, त्या मलपृष्ठाचा रंग व त्यावर लिहिलेली अक्षरे, त्या पुस्तकाची बांधणी इत्यादी सर्व वैशिष्टये काळजीपूर्वक पाहून घ्या. आता पुस्तक खाली ठेवा व अशी कल्पना करा की, तुम्ही अजूनही ते पुस्तक निरखून पहाण्यात गर्क आहात. तुमच्या मन:पटलावर ते पुस्तक सर्व वैशिष्टयांसहित रेखाटण्याची कोशीस करा. छान ! आता पुस्तक परत हातात घेऊन त्याचे निरीक्षण करा. तुमच्या मन:पटलावर रेखाटले होतेत ते चित्र व आता तुमच्या हातात असलेले पुस्तक, यांची तुलना करा. तुमच्या मन:पटलावरील प्रतिमेत काही तपशील वगळले गेले होते काय ? ठीक. आता परत हाच प्रयोग करून, तुमच्या मन:पटलावरील पुस्तकाची प्रतिमा अधिकाधिक तपशीलवार व रेखीव करण्याचा प्रयत्न करा.

☐ प्रयोग ४ – उद्यानविहार –

अशी कल्पना करा की, तुम्ही एका उद्यानातून फेरफटका मारीत आहात. सर्वत्र सकाळचे कोवळे ऊन्ह पडले आहे. गवतावरील दवबिंदू चमकत आहेत. तुमच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या आहेत. मंद वाऱ्याची झुळुक तुमच्या अंगावरून जात आहे. पूर्वेच्या बाजूने सूर्य हळूहळू वर येत आहे. तुम्ही पायातल्या चपला काढून ठेवून, उद्यानातील गवतावरून सावकाशपणे चालत आहात हिरव्या ओलसर गवताचा स्पर्श तुमच्या पायाच्या तळव्यांना हवाहवासा वाटत आहे. काही पक्षी चिवचिव करीत या झाडावरून त्या झाडावर झेपावत आहेत.

रमतगमत चालताना, तुम्ही खिशातून एक आलेपाकची वडी काढून ती तोंडात टाकली आहे. त्या वडीचा वास तुमच्या नाकात दरवळत आहे आणि तुम्हाला खूप प्रसन्न वाटत आहे. उद्यानात लांबवर पसरलेली हिरवळ व बाजूचे अशोकवृक्ष कोवळ्या सूर्यकिरणात न्हाऊन निघत आहेत. एकूण सभोवतालच्या सर्व दृश्यांनी तुमच्यावर चांगलीच मोहिनी टाकली आहे.

वरील चार प्रयोगासंबंधी जाताजाता आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती म्हणजे या प्रयोगांपैकी पहिले दोन प्रयोग करण्याचा सराव केल्यामुळे काही लोकांचा आत्मविश्वास वाढतो, असा त्यांचा अनुभव आहे, शिवाय त्यांचा असाही अनुभव आहे की, त्या प्रयोगांचा सराव केल्यामुळे त्यांचे आपल्या स्वत:च्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कसबही वृद्धिंगत होते. तसेच, वरील चार प्रयोगांपैकी शेवटच्या दोन प्रयोगांचा वारवार सराव केल्यामुळे, आपल्याला दैनंदिन जीवनातील घटनांना शांतचित्ताने तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, असा काही लोकांचा अनुभव आहे. तेव्हा वरील चार प्रयोग रोज सकाळी व संध्याकाळी फक्त पाच किंवा दहा मिनिटे करून पाहून तुम्हाला काय अनुभव येतो, हे पाहणे उपयुक्त होईल.

आता मुख्य मुद्दा असा की, या प्रकरणात सांगितलेल्या विविध प्रयोगांचा सराव केल्यामुळे, तुमच्या प्रतिमासाधनेला चांगलीच गती मिळेल आणि कल्पनेच्या कुंचल्याने हव्या त्या प्रतिमा आपल्या मन:पटलावर हुकमीपणे रंगविण्याचे कौशल्य तुम्ही संपादन केलेत की, मन:चक्षूच्या सामर्थ्याने आपले जीवन अधिक सुखी व संपन्न करणे तुम्हाला सुलभ होईल. ( क्रमशः )

# अनवट

## गोऱ्यांचेच राज्य हवे !

दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या वंशवादी राजवटीचे पंतप्रधान बोथा सध्या पश्चिम युरोपीय देशाच्या दौऱ्यावर आहेत. नको असलेल्या पाहुण्यासारखे युरोपात त्यांचे आगमन होत आहे. ब्रिटन, फ्रान्समधील वंशवाद–विरोधकांनी बोथांच्या दौऱ्याविरुद्ध निदर्शने आयोजित केली आहेत.

आपली चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी बोथांची ही ट्रिप. आता या वेळी तरी वरवर का होईना उदात्त विचारांचे प्रदर्शन व्हावे की नाही ? पण प. जर्मनीत नामीबियासंबंधी बोलताना बोथा घसरलेच. नामीबियाला संपूर्ण स्वायत्तता देण्याचा विषय आपल्या खिजगणतीत नसल्याचे सूचित करणारा एक प्रस्ताव त्यांनी मांडला. ते म्हणाले की, द. आफ्रिका नामीबियावर दरवर्षी ६५ कोटी ८० लाख रँड (५२.५० कोटी डॉलर्स) खर्च करीत आहे. ज्या देशांना (म्हणजे ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, कॅनडा) आमचे अस्तित्व तेथे पसंत नसेल त्यांनी स्वत: (संयुक्तपणे) या विभागाची जबाबदारी सांभाळावी.'

म्हणजे काहीही होवो, नामीबियात गोऱ्यांचेच राज्य पाहिजे ! वर बोथा म्हणतात– मला माहितेय्–ते पुढे येणार नाहीत. लव्ह–हेट रिलेशन्स म्हणतात ती हीच. अमेरिकेबाबत इस्रायलची सुद्धा हीच गंमत होते !

नामीबियाच्या 'स्वापो' या स्वातंत्र्य-संघटनेने हा प्रस्ताव अर्थातच नाकारला आहे. त्यांचे नेते सॅम नुजोमा म्हणाले की, 'आमचा कारभार आम्हीच सांभाळायचा किंवा विसकटू द्यायचा आहे. त्याला आम्ही तयार आहोत. तेवढ्यासाठी नामीबिया पाश्चात्यांची अजून एक वसाहत होणे आम्हाला नामंजूर आहे.'

## मित्राला मदत

१९८६ संपण्यापूर्वीच पाकिस्तानला चीनकडून जेट बनावटीची शंभर कियांग–५ लढाऊ विमाने मिळणार आहेत. प्रत्येक विमानाची किंमत एक कोटी रुपये आहे. त्यांच्या लढाऊ क्षमतेत वाढ करण्यासाठी एवढीच रक्कम घालावी लागेल.

☐

रशियाच्या मिग–१९ विमानाबरहुकूम कियांग–५ ही सुधारित आवृत्ती आहे. इस्लामाबादेजवळ करमा येथील विमानदलाच्या पुनर्बांधणी कारखान्यात या विमानांचे नूतनीकरण होणार आहे. पाककडे यापूर्वीच कियांग-५ जातीची ५० लढाऊ विमाने आहेत. ☐

# नाटयपंढरी



## □ किमया कामण्णाची !

कामण्णा हा मराठी रंगभूमीवरचा एक चमत्कार होता. कामण्णा कसा तर कामण्णासारखाच. विनोदी नटांचा शहेनशहा ! 'राजराजेश्वर ! इतर विनोदी नटांविषयी लिहिताना वा बोलताना, त्यांची नकळत कामण्णाशी तुलना होतेच. तो त्या भूमिकेत कामण्णाच्या जवळपास आल्यासारखा वाटला, 'त्याने आपल्या भूमिकेत काल कामण्णाची आठवण करून दिली.' असे उल्लेख वरच्यावर अवश्य येतात. कै. शंकर घाणेकर, श्री. वसंत शिंदे, शरद तळवलकर, बाळ कोल्हटकर, राजा गोसावी, चित्तरंजन कोल्हटकर, (आता 'कामण्णा' फारसा करीत नाहीत) हे सारे विनोदवीर कामण्णा या नावाशी नतमस्तक होणारे. 'कामण्णा' ही त्यांची 'नामदेवपायरी !' तिला पाय नाही लागायचा कधी, अर्थात या प्रत्येकाजवळ आपआपली अभिनयाची वेगळी पुरचुंडी आहेच.

हो, पण 'कामण्णा' हा सुद्धा मुखवटाच ! दिनकर ढेरे, या नटाने आपल्या चेहऱ्यावर चढविला नि तो चिरंजीव झाला. १८ ऑक्टोबर १९१९ ला, महेश्वराचा—कामण्णाचा जन्म झाला. (बलवंत संगीत मडळी 'च्या पहिल्या वाढदिवशी 'भावबंधन' रंगभूमीवर आले.) आज तो साठी उलटून सत्तरीची वाटचाल करीत आहे; पण कसा अगदी ताजा टवटवीत आहे. सदा सतेज ! ही किमया त्याच्या जन्मदात्याची——राम गणेशांची तर आहेच; पण त्या शब्दकलेत जीवकळा ओतली ती दिनकर कामण्णांनीच! 'बलवंत संगीत 'चे मा. दीनानाथ, कोल्हटकर, कोल्हापुरे हे मालक तर तिचे प्राणच होते; दिनकर हा तर त्यांच्या प्राणांचा प्राण होता. चिंतामणरावांसारखे श्रेष्ठ नट नि मालक, दिनकर कामण्णांविषयी मोठ्या मोकळेपणाने नि आदराने लिहितात. 'नाटकाच्या (वीरविडंबन) यशाचे श्रेय लेखननैपुण्याप्रमाणेच दिनकरच्या (उत्तराच्या) अभिनयकौशल्यालाही द्यावे लागेल.. त्याचे अलौकिक नाट्य या उत्तराच्या भूमिकेतच पहायला मिळे...त्याच्यासारख्या असामान्य नटाची मूर्ति, त्याला एकदा पाहिलेला प्रेक्षक कधीच विसरणार नाही, विसरू शकणार नाही.' आणखी एका प्रसंगी तेच लिहितात, 'रंगलेल्या दिनकररावांच्या (कामण्णा) शरिराचा रोम अन् रोम, बोलण्याच्या स्वराचा कणन् कण, ही प्रेक्षकांवर हास्यरसाचे फवारे उडविण्याची कारंजीच होती. ईश्वराने रंगदेवतेला बहाल केलेली ती एक हास्यरसाची देणगी होती.'

'बलवंत 'च्या वाजत्या-गाजत्या नाटकातले दिनकर हे एक चलनी नाणे होते. हुकुमाचा एक्का होता. वीरविडंबन (उत्तर) उग्रमंगल (विद्याधर) भावबंधन (महेश्वर—कामण्णा) राजसंन्यास (जिवाजी) सहजता हा जसा दिनकररावांचा विशेष, तसेच समयसूचकता ही त्यांची खास जमेची बाजू. खेळ चालू असता, प्रसंग विरोधी भूमिकेशी नी नाटकाशी चपखळ बसणारी वाक्ये ते सहज बोलत नि प्रेक्षकात खसखस पिके. ब्लॅक आउटच्या (Black out) काळात ते भावबंधनाचा खेळ चालू असता, इंदूबिंदूच्या प्रवेशात, तो वचन देत नाही, तेव्हा इंदु 'काका' असे म्हणत जाऊ लागते. तोच कामण्णा म्हणत, 'इंदा, बाहेर जाऊ नको. काळोखात सापडायची नाहीस !' तिच्या काळेपणाची अशी आणखी टर चिंतामणरावांच्या गैरहजेरीत कुणी तरी दुसऱ्या कलावंताने (मला वाटते बहुतेक नटवर्य मामा पेंडसे असावे) भावबंधनमध्ये घनःश्याम केला. त्याला सिगरेट ओढण्याची सवय नसल्याने, घनःश्याम—कामण्णाच्या प्रवेशात, चिंतामणरावांची सिगरेट पेटविण्याची स्टायलिश अॅक्शन त्याला जमेना नि सिगरेट पेटेना ! सहाजिकच तो गांगरला. त्याला सावरून घेण्यासाठी कामण्णा लगेच म्हणाला, 'घनःश्यामा, अरे एवढे प्लॅनिंग (कारस्थान) रचतोस, नि साधी सिगरेट तुला पेटेना ? थांब मी लावतो काडी !' झाले, प्रवेश सुरळीत पुढे गेला.

चित्रपटात नामांकित नट बावरले; पण दिनकर कामण्णा तिथेही सराइतासारखे वावरले. 'माझी लाडकी', 'नारदनारदी', 'पहिला पाळणा' असे त्यांचे अनेक बोलपट गाजले. ते जिथे गेले तिथे पैशाचा पाऊस पडला. अगदी अखेर अखेर 'राजाराम संगीत' गाजविली. लोंढ्यांनी गंधर्वथाटात 'राजाराम 'ची स्थापना केली. ती कोसळण्याच्या अवस्थेत असता, 'दिनकर कामण्णा' ही संजीवनी लाभली. कर्जाच्या खाईत सापडलेली राजाराम संगीत मंडळी, लोंढे बंद करण्याच्या विचारात होते; पण केवळ दिनकर कामण्णांमुळे, सतत चार—चार महिने भावबंधनच्या, तुफान उत्पन्नाच्या खेळांनी कंपनीचे लाखा-दोन लाखाचे कर्ज तर फिटलेच; पण कंपनीही नव्या जोमाने उभी राहिली; शेवटी दिनकर कामण्णांनीच जगाच्या रंगभूमीवरून अखेरची एक्झिट (Exit) घेतली नि सारे संपले! दिनकर गेला कामण्णा अमर झाला !

एका विनोदी नटाने आपल्या अभिनयसामर्थ्याने नाट्यसंस्थेचा गोवर्धनपर्वत पेलून धरल्याचे रंगभूमीच्या इतिहासातले हे एकमेव उदाहरण असावे !

वा. रा. ढवळे

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


# फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू

आवृत्ती : दुसरी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

अन्याय, जुलुम–जबरदस्ती व भ्रष्टाचाराची सीमा झाली की क्रांती अटळ ठरते. क्यूबन क्रांती हे त्याचे ढोबळ उदाहरण. संपूर्ण लॅटिन अमेरिका ढवळून काढणाऱ्या या क्यूबन क्रांतीचा इतिहास.

राजहंसची दोन नवी विज्ञान प्रकाशने

# तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय

विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी
–तुम्हाला विरबल बनवू शकणाऱ्या !

तुम्हाला माहीत हवेत, करता येतील असे अनेक गमतीदार वैज्ञानिक प्रयोग–
–तुम्हाला जादूगार बनविणारे !

आज अतराळयुगात, साऱ्या विश्वात मानवाने केलेला मुक्त संचार. जो तुम्ही समजावून घ्यायला हवा.
–नाहीतर तुमचा रिप व्हॅन विंकल बनेल !

□

# । विज्ञानेश्वरी ।

परग्रहावरून येणाऱ्या संदेशासारख्या अनेक नव्या गोष्टी तुमचा मित्र बनून तुमच्या कानात सांगणारी !

विज्ञानेश्वरीतील काही अध्याय आहेत–

- झोपा आणि विद्वान् व्हा.
- युरी गिलरला जमाल गोटा मिळतो त्याची गोष्ट
- पिरॅमिडचे गुपीत
- तुमच्या नशिबाचे गणित
- भेदिले सूर्यमंडळा .

लेखक : **दत्तप्रसाद दाभोळकर**

**किमत : प्रत्येकी वीस रुपये**

रुपये चाळीस पाठवल्यास दोन्ही पुस्तके घरपोच मिळतील.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०